CMYK
सोलापूर
# तरुण भारत
SOLAPUR TARUN BHARAT
न मे कर्मफले स्पृहा
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित
•आज धनत्रयोदशी•
लातूर
शनिवार, १८ ऑक्टोबर २०२५ । वर्ष ३ रे अंक २२९ । पाने १२ । किंमत रु. ६/-
■ RNI No. MAHMAR/2023/86477 ■ Postal Regd No. SLP/32/2024-2026.
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

दर्बी
क्लॉथ मार्केट
सुटींग । शर्टिंग । लिनन । सिल्क
१०६, गोल्डफिंच पेठ, (नवी पेठ) सोलापूर.
9130008644 | 9422459645




# काँग्रेस माओवादी दहशत लपवायचे : मोदी

**• संविधानाचे पुस्तक कपाळी लावणारे माओवाद्यांचे रक्षक; नाव न घेता गांधीवर टिकास्त्र**



**नवी दिल्ली, दि.१७ ऑक्टोबर**

त्यांच्या राजवटीत काँग्रेस पक्षाने माओवादी दहशतीला लपवत होते. देशातील जवळजवळ प्रत्येक मोठे राज्य नक्षलवादी हिंसाचार आणि माओवादी दहशतीच्या विळख्यात होते, असे टिकास्त्र पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सोडले. पंतप्रधान मोदी यांनी शुक्रवारी एका वृत्तवाहिनीच्या वर्ल्ड ग्लोबल समिटमध्ये भाषण केले. त्यावेळी त्यांनी काँग्रेसवर हल्लाबोल केला.

काँग्रेस नेते राहुल गांधी यांचे नाव न घेता मोदी म्हणाले, मी मोठ्या जबाबदारीने बोलतो. संविधान कपाळावर घेऊन नाचणारे अजूनही माओवाद्यांना संरक्षण देण्यात दिवसरात्र गुंतलेले आहेत. दहशतवादी हल्ल्यांनंतर भारत आता गप्प बसत नाही. आता, भारत शत्रूला सर्जिकल-एअर स्ट्राइक आणि ऑपरेशन सिंदूरने प्रत्युत्तर देतो. भारत थांबण्याच्या मनःस्थितीत नाही. आम्ही थांबणार नाही. १४० कोटी देशवासी एकत्र वेगाने पुढे जातील. ऑपरेशन सिंदूरची जगभरात मोठ्या प्रमाणात चर्चा झाली आहे. नक्षलवाद, प्रत्यक्षात माओवाद, मी तुम्हाला दहशतवादाची कहाणी सांगतो. काँग्रेसच्या राजवटीत शहरी नक्षलवादी परिसंस्था अजूनही काही प्रकारे वर्चस्व गाजवते. आपल्या देशात दहशतवादाची चर्चा झाली. काँग्रेसच्या राजवटीत माओवादी दहशतवादावर पडदा टाकण्यात आला. या दहशतीचे अनेक बळी दिल्लीत आले. त्यांना अपंगत्व आले. ते माओवादी दहशतीचे बळी होते. त्यापैकी अनेकांचे दोन्ही पाय कापण्यात आले. ते सात दिवस हात जोडून आमचा संदेश जगाला पोहोचवण्याची विनंती करत राहिले.

**काँग्रेसने बँकांना जनतेपासून दूर केले**

पंतप्रधान मोदी म्हणाले की, काँग्रेसने देशातील जनतेपासून बँकांना दूर केले. गरीब लोक बँकांच्या दाराशी जाण्यासही घाबरत होते. २०१४ मध्ये जेव्हा आमचे सरकार सत्तेत आले तेव्हा देशातील ५० टक्के लोकसंख्येकडे बँक खाते नव्हते. लोकसंख्येचा एक मोठा भाग यापासून वंचित होता. त्यांना जास्त व्याजदर द्यावे लागले. आम्ही हे सर्व बदलले आहे. आम्ही बँकिंग क्षेत्राचे लोकशाहीकरण केले आणि त्यात सुधारणा केल्या. आम्ही ५० कोटी जनधन खाती उघडली. जगातील एकूण बँक खात्यांपेक्षा भारतात जास्त बँक खाती आहेत.

# विखे आला आणि सर्व महाराष्ट्रामध्ये विखार पसरवून गेला : भुजबळ



**बीड, दि.१७ ऑक्टोबर**


विखे आला आणि सर्व महाराष्ट्रामध्ये विखार पसरवून गेला. गेला तर गेला पण जीआर काढला, अशी टीका मंत्री छगन भुजबळ यांनी बीडच्या महाएल्गार सभेत बोलताना केली आहे. मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील हे गरज नसताना मनोज जरांगेंकडे जातात. भाजपाने आपल्या लोकांना आवरावे. मराठा समाज आणि आमच्यात अंतर पडले ते अंतर अंतरवलीच्या दरीद्री पाटलामुळे, अशी टीकाही भुजबळांनी केली आहे.

बीडमधील महाएल्गार सभेत ते बोलत होते. मराठा आणि कुणबी या दोन वेगळ्या जाती आहेत, हा निर्णय उच्च न्यायालयाने दिला आहे, सर्वोच्च न्यायालयाने देखील सांगितले आहे की, मराठा समाज हा सामाजिकदृष्ट्या मागास नाही असे भुजबळ म्हणाले.

भाजपच्या सगळ्या नेत्यांना सांगतोय, ओबीसीच्या ताकदीवर तुम्हाला १४५ आमदार मिळाले आहेत. त्यामुळे यावर मार्ग काढा असे भुजबळ म्हणाले. भुजबळ यांनी विजय वडेट्टीवार यांच्यावर देखील टीका केली. नगरला आले नाहीत, पंढरपूरला आले नाहीत, बीडला आले नाहीत, कुठला दबाव तुमच्यावर आहे. तुम्ही सांगितले होते तुमच्याबरोबर आहे. मग तुम्ही का नाही आलात? असा सवाल भुजबळांनी केला.

**ओबीसीच्या मुळावर उठलेल्यांना आडवे करा**

छगन भुजबळ म्हणाले, आरक्षण सामाजिक दृष्ट्या मागासलेल्यांसाठी आहे. तो गरिबी हटावचा कार्यक्रम नाही. हिशोब करा राज्यात ५४ टक्के ओबीसी,१३ टक्के दलीत, ७ टक्के आदिवासी, ३ टक्के ब्राह्मण त्यानंतर मुस्लिम आणि जे शिल्लक राहतात तो मराठा समाज, अशी माहिती भुजबळ यांनी दिली. तसेच आता दुहेरी लढाई लढणार, एक न्यायालयात आणि दुसरी रस्त्यावरची लढाई. आम्ही पक्षाच्या दावणीला बांधलो नाही. इथे फक्त ओबीसीसाठी लढा देत आहोत. पक्षाचे काम आल्यावर आम्ही त्यासाठी लढू. जे जे ओबीसीच्या मुळावर उठले असतील त्यांना आडवे करा, असा इशारा भुजबळांनी दिला.



सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्त्वाचे...

### सांगली बँकेच्या कर्मचाऱ्यांना एक महिन्याच्या पगारीएवढा बोनस

**बँकेचे चेअरमन गणेशराव गाडगीळ यांची माहिती**

**सांगली, दि. १७ ऑक्टोबर-**
सांगली अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड या अग्रगण्य शेड्युल सहकारी बँकेने २000 कोटीचा एकत्रित व्यवसायाचा टप्पा पार केला आहे. २०२४-२५ या आर्थिक वर्षात उल्लेखनीय कामगिरी नोंदवत तब्बल रु.१४.५० कोटी इतका निव्वळ नफा मिळवला आहे. त्यामुळे कर्मचाऱ्यांना दिवाळी बोनस म्हणून एक पगार देणार असल्याची माहिती बँकेचे चेअरमन गणेशराव गाडगीळ यांनी दिली. संचालक मंडळाच्या बैठकीत संचालक एच.वाय.पाटील, शैलेंद्र तेलंग, सागर घोंगडे, संजय धामणगावकर व अन्य संचालक यांनी बोनस देण्यासंबंधी सूचना केली. त्यानुसार या बैठकीत त्यांनी कर्मचाऱ्यांसाठी हा निर्णय जाहीर केला. बऱ्याच वर्षानंतर बोनस जाहीर झाल्यामुळे कर्मचारी वर्गात आनंदाचे व उत्साहाचे वातावरण झाले. बँकेने डिजिटल बँकिंग, ग्राहक सेवा आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर यावर भर देत आपली सेवा गुणवत्ता अधिक मजबूत केली आहे. येत्या काळात बँक नवीन शाखा विस्तार, ग्राहक अनुकूल योजना व नव्या डिजिटल सेवा सुरू करण्याच्या दिशेने कार्यरत आहे. या भरघोस बोनस घोषणेने कर्मचाऱ्यांनी संचालक मंडळाचे आभार मानले. बँकेन दिवाळी निमित्त वाहन कर्ज केवळ ८.२० टक्के व गृह कर्ज केवळ ७.७५% इतक्या अल्पदरात मिळणार आहे. तरी या फेस्टिवल कर्ज योजनांचा लाभ घ्यावा, असेही आवाहन बँकेने केले आहे.

### पतीबरोबरच्या तक्रारीनंतर पत्नीचा आत्महत्येचा प्रयत्न

**सोलापूर, दि. १७ ऑक्टोबर-**
पतीबरोबर झालेल्या भांडणाचा राग मनात धरून पत्नीने राहत्या घरात ओढणीने दरवाज्याला बांधून गळफास घेऊन आत्महत्येचा प्रयत्न केला. हा प्रकार शुक्रवारी मध्यरात्री उत्तर सदर बझार येथे घडला.राधा सनी आंबेवाले (वय ३०) असे महिलेचे नाव आहे. राधा हिचे तिच्या पतीबरोबर घरगुती कारणातून भांडण झाले. यानंतर संतापलेल्या राधा या विवाहितेने पहाटे ३.३० च्या सुमारास राहत्या घराच्या दरवाजाला ओढणी बांधून गळफास घेण्याचा प्रयत्न केला. हा प्रकार नातेवाईकांच्या लक्षात येताच, त्यांनी राधा यांना गळफासातून सोडविले. त्यानंतर रवि चौधरी यांनी उपचारास दाखल केले, परंतु शुध्दीवर असलेल्या विवाहितेला बोलता येत नसल्याचे डॉक्टरांनी सांगितल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

### घरासमोर बसल्याच्या कारणातून महिलेसह दोघांना मारहाण

**सोलापूर, दि. १७ ऑक्टोबर-**
घरासमोर बसल्याच्या कारणातून मोदी येथे महिलेसह दोघांना मारहाण करण्यात आली. हा प्रकार गुरुवारी सायंकाळी सातच्या सुमारास घडला.योगेश संजप्पा म्हेत्रे (वय ३०) व आरती लक्ष्मण बरे (वय २८, दोघे रा. मोदी) असे मारहाण झालेल्या दोघांची नावे आहेत. योगेश आणि आरती हे दोघे मोदी येथील भीमसिंग म्हेत्रे यांच्या घरासमोर बसले होते. तेव्हा आमच्या घरासमोर का बसला असे विचारून भीमसिंग व राजेश नरसिंग म्हेत्रे यांच्यासह इतर दोन जणांनी प्लॉस्टिक ट्रे व लाकडाने मारहाण केली. यात योगेशच्या डोक्याला जखम झाली तसेच आरती हिच्या सर्वांगास मार लागल्याने दोघे शासकीय रुग्णालयात दाखल झाल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

### गच्चीतून तोल जाऊन पडल्याने तरुणाचा मृत्यू

**सोलापूर, दि. १७ ऑक्टोबर-**
राहत्या घराच्या गच्चीतून अचानक तोल जाऊन पडल्याने तरुणाचा मृत्यू झाला. हा प्रकार पंढरपूर येथील आदर्श नगर येथील शहनाई गार्डनजवळ गुरुवारी दुपारी १२ च्या सुमारास घडला. कालेश्वर शिवनारायण मेश्राम (वय ३० , रा. पंढरपूर) असे तरुणाचे नाव आहे. कालेश्वर हा त्याच्या शहनाई गार्डनजवळील घराच्या गच्चीत थांबला होता. अचानक तोल जाऊन तो खाली पडल्याने त्याच्या डोक्याला जखम झाली. पंढरपूर व मोहोळ येथील सरकारी रुग्णालयात उपचार करून दुपारी चारच्या सुमारास भाऊ दिनेशकुमार याने दाखल केले. परंतु उपचारापूर्वी तो मृत पावल्याचे डॉक्टरांनी घोषित केल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

### सर्पदंशाने महिलेचा मृत्यू

**सोलापूर, दि. १७ ऑक्टोबर-**
घरात झोपलेल्या महिलेचा सर्पदंशाने मृत्यू झाला. ही घटना मोहोळ तालुकयातील डिकसळ येथे गुरुवारी रात्री ११.३० वाजता घडला.मंगल नारायण थिटे (वय ६०, रा. डिकसळ ता मोहोळ) असे महिलेचे नाव आहे. गुरुवारी रात्री ११.३० च्या सुमारास मंगल या डिकसळ येथील त्यांच्या राहत्या घरी झोपी गेल्या होत्या. त्यावेळी त्यांच्या डाव्या पायाला सापाने दंश केला. त्यानंतर मध्यरात्री १.३० वाजता मुलगा धनाजी याने उपचारास दाखल केले. परंतु उपचारापूर्वीच त्या मृत पावल्याचे डॉक्टरांनी घोषित केल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

### प्रकाशाचा उत्सव साजरा करताना विद्युत सुरक्षेचे नियम पाळा

**सोलापूर, दि. १७ ऑक्टोबर-**
प्रकाशाचा आणि आनंदाचा सण दीपावली साजरा करताना नागरिकांनी वीज वापरताना विशेष काळजी घेणे अत्यावश्यक आहे. दिवे, सजावट, फटाके आणि विद्युत उपकरणे वापरताना निष्काळजीपणामुळे अपघात होऊ शकतात. तरी दीपावलीचा आनंद साजरा करताना वीज सुरक्षेचे नियम काटेकोरपणे पाळावेत, असे सर्व नागरिकांना महावितरणकडून आवाहन करण्यात येत आहे. विद्युत सुरक्षेसंदर्भात खालील काही महत्वाच्या सूचना देण्यात येत आहेत. सुरक्षित वीज वापर करताना विद्युत रोषणाई व आकाशदिव्यांसाठी वापरण्यात येणारे विजेची वायर्स, प्लग, मल्टी-प्लग, एक्स्टेंशन बोर्ड इत्यादी योग्य दर्जाचे आणि आयएसआय प्रमाणित असावेत. अधिक भार टाळताना एका सॉकेटमध्ये अनेक उपकरणे जोडू नका. त्यामुळे वायरिंगवर अधिक भार येऊन शॉर्टसर्किट होण्याची शक्यता वाढते. विजेच्या तारा आणि जोडणी ओलसर ठिकाणी ठेवू नका. पाण्याच्या संपर्कात आल्यास विजेचा धक्का बसण्याचा धोका संभवतो. फटाके फोडताना विद्युत खांब, तारा, ट्रान्सफॉर्मर यांच्या जवळ जाणे टाळावे. कोणताही विजेसंबंधी अपघात झाल्यास स्थानिक महावितरण कार्यालयाशी संपर्क साधावा. किंवा मध्यवर्ती ग्राहक सुविधा केंद्राच्या टोल फ्री क्रमांकावर १८००-२३३-३४३५, १८००-२१२-३४३५, १९१२ संपर्क साधावा.

# दोन सराईत आंतरराज्य गुन्हेगारांना अटक; दोघे अद्यापही फरार

## अवंती नगरात चाकूचा धाक दाखवून जबरी चोरी प्रकरण; चारचाकी, दुचाकीसह अंगठी, रोख रक्कम जप्त

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१७ ऑक्टोबर-**
सोलापुर शहरातील अवंती नगर येथील अपार्टमेंटमधील दोन फ्लॅटचा दरवाजा तोडून घरातील लोकांना शस्त्राचा धाक दाखवून रोख रक्कम व सोन्याचे दागिने जबरदस्तीने चोरणाऱ्या टोळीतील दोघां सराईत आंतरराज्य गुन्हेगारांना फौजदार चावडी पोलिसांनी अटक केली. या दोघांकडून पोलिसांनी चारचाकी, दुचाकी व सोन्याची अंगठी, रोख रक्कम असा दीड लाख रुपयांचा मुद्देमाल हस्तगत केला असून तीन गुन्हे उघडकीस आणले आहेत.

मेरबानसिंग मायासींग दुधानी (वय ३४, रा. विजापुर गुरुनानक कॉलनी, जर्मन फैक्टरीच्या जवळ विजापुर, कर्नाटक) आणि हरेश विजयकुमार रामत्री (वय ३२, रा. जुवेल विस्टा बिल्डींग, बदलापुर वेस्ट, ठाणे) अशी अटक करण्यात आलेल्यांची नावे आहेत. या टोळीकडून शहरातील फौजदार चावडी, जोडभावी पेठ आणि सदर बझार पोलिस ठाण्यातील चोरीचे गुन्हे उघडकीस आले आहेत.

११ ऑक्टोबर रोजी पहाटे अडीचच्या सुमारास अवंती नगर हौसींग सोसायटी येथील एका बिल्डींग मध्ये चार शस्त्र धारी चोरट्यांनी बिल्डींगमधील सर्व फ्लॅटच्या दरवाजाला बाहेरुन कड्या लावुन तिसऱ्या व दुसऱ्या मजल्यावरील फ्लॅटचा दरवाजा जबरदस्तीने तोडुन घरात घुसून घरातील लोकांना शस्त्राचा धाक दाखवून जबरी चोरी केली होती. याबाबत फौजदार चावडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता.



११ ऑक्टोबरच्या रात्रीच सोलापूर शहरातून एक चारचाकी अल्टो कार तसेच दोन मोटारसायकल देखील चोरीस गेल्या होत्या. या माहितीच्या आधारे पोलिसांनी जबरी चोरीच्या गुन्ह्याचा तपास करताना शहराच्या विविध भागातील सी.सी.टी.व्ही फुटेजची तपासणी करून तसेच तांत्रीक माहीतीच्या आधारे माहीती संकलीत करुन जबरी चोरी करणारे चार चोरट्यांपैकी एकाची ओळख पटविली. ओळख पटविण्यात आलेला गुन्हेगार हा मेरबानसिग असुन तो विजापुर येथे राहत असून तो दरोडयाच्या गुन्हयामध्ये ७ वर्षे शिक्षा भोगून तीन महिन्यांपुर्वीच ठाणे जेलमधुन सुटला असल्याची माहिती पोलिसांना मिळाली.

या माहितीच्या आधारे पोलिसांच्या पथकाने विजापूर येथे जाऊन मेरबानसिंग याचा शोध घेऊन त्यास ताब्यात घेतले. मेरबानसिंग याच्याकडे करण्यात आलेल्या तपासात त्याचा साथीदार हरेश रामत्री यास ताब्यात घेण्यात आले. पोलिसांनी अटक केलेल्या दोन आरोपींकडून चोरीच्या दोन मोटारसायकली, एक अल्टो कार तसेच गुन्हयात चोरीस गेलेल्या दागीन्यांपैकी एक सोन्याची अंगठी व रोख रक्कम असा १ लाख ५२ हजार रुपयांचा मुददेमाल हस्तगत केला आहे. तसेच गुन्हयात वापरलेला चाकु, कटावणी, दोन लोखंडी रॉड हे देखील हस्तगत करण्यात आले आहेत. या दोन्ही आरोपींचे इतर दोन साथीदार अजून फरार असून त्यांची नावे निष्पन्न झाली आहेत. ही कारवाई पोलिस आयुक्त एम राजकुमार, उपायुक्त विजय कबाडे, सहायक आयुक्त प्रताप पोमण, पोलिस निरीक्षक महादेव राऊत, तानाजी दराडे यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलिस निरीक्षक क्षिरसागर, हवालदार चुंगे, पोलिस नाईक शिवानंद भिमदे, कृष्णा बडुरे, विनोद व्हटकर, अमोल खरटमल, विनोद पुजारी, शशिकांत दराडे, अजय चव्हाण, आतीश पाटील, नितीन मोरे, किशोर तुकुवाले, सुरज सोनवलकर, सुधाकर माने, पंकज घाडगे, अयाज बागलकोटे, पूजा बोरकर यांनी केली.

# ७५ बसस्थानकांवर मोफत वाचन कट्टा

## पंतप्रधान मोदींच्या पंचाहत्तरीनिमित्त एसटीचा अनोखा उपक्रम

> मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळवून देणाऱ्या पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या पंचाहत्तरी निमित्त आम्ही जनतेसाठी ज्ञानाची ही 'अनमोल भेट' देत आहोत. वाचन संस्कृती आणि मराठी साहित्याचा प्रचार हा आमचा लोकाभिमुख उपक्रम आहे.
> - प्रताप सरनाईक, परिवहन मंत्री

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ ऑक्टोबर-**
पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या पंचाहत्तरीनिमित्त महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाने एक आगळावेगळा, लोकाभिमुख आणि संस्कारमूल्ये जपणारा उपक्रम हाती घेतला आहे. राज्यातील प्रमुख ७५ एसटी बसस्थानकांवर मोफत वाचनालय उभारून ज्ञान, साहित्य आणि संस्कृतीचा दिवा जनतेसाठी प्रज्वलित करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

एसटी महामंडळाच्या मुख्यालयात झालेल्या ३०९ व्या संचालक मंडळाच्या बैठकीत या निर्णयाची घोषणा परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी केली. या बैठकीस परिवहन आयुक्त विवेक भीमनवार, तसेच उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. माधव कुसेकर उपस्थित होते. मंत्री सरनाईक म्हणाले, विद्यमान खासदार श्रीकांत शिंदे आणि ज्येष्ठ नेते विनय सहस्रबुद्धे यांच्या संकल्पनेतून हा उपक्रम आकाराला आला आहे. मोदीजींच्या ७५ व्या वाढदिवसाचे औचित्य साधून सर्वसामान्य नागरिकांसाठी 'मोफत खुले वाचनालय' उभारण्यात येणार आहे. या वाचनालयांमध्ये वि.स. खांडेकर, कुसुमाग्रज, पु.ल. देशपांडे, नामदेव ढसाळ, व.पु. काळे, विश्वास पाटील अशा नामवंत साहित्यिकांच्या कृती उपलब्ध असतील. तसेच एमपीएससी व यूपीएससी परीक्षेची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी मौल्यवान संदर्भग्रंथ ठेवण्यात येणार आहेत.हा 'वाचन कट्टा' मराठी भाषेचा समृद्ध वारसा जपणारा ठरेल आणि समाजात वाचन संस्कृतीचा नवा सुवर्णप्रकाश पसरवेल, असे प्रतिपादन मंत्री सरनाईक यांनी केले.



# वकिल व भोंदूबाबासह चौघांना दोन दिवसांची कोठडी

## टेक्स्टाईल कारखानदाराची सव्वा कोटीची फसवणूक

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १७ ऑक्टोबर-**
गुप्तधनाच्या हंड्याच्या आमिषापोटी टेक्स्टाईल कारखानदाराची सव्वा कोटी रूपयांची फसवणुक केल्याप्रकरणी जेलरोड पोलिस ठाण्यातील गुन्ह्यात न्यायालयीन कोठडीत असलेल्या वकिल व भोंदूबाबासह चौघांना एमआयडीसी पोलिस ठाण्यातील गुन्ह्यात न्यायालयाने दोन दिवस पोलिस कोठडीत ठेवण्याचा आदेश दिला.

मोहम्मद कादर शेख (रा. आदिलशाही नगर, जर्मन बेकरीजवळ, विजापूर, कर्नाटक), आयुब साहेबलाल रचभरे (वय ५०, रा. तेलंगी पाच्छा पेठ, सोलापूर), ॲड. सचिन रंगनाथ गायकवाड (वय ४६, रा. शिवाजी चौक, दक्षिण कसबा, सोलापूर), दाऊद इब्राहीम पठाण (वय ५०, रा. दक्षिण सदर बझार, सोलापूर) अशी पोलिस कोठडी मिळालेल्यांची नावे आहेत. याबाबत राजू विनायक आडम (वय ३७, रा. प्लॉट नं. ४६ अ, कोंडा नगर, अक्कलकोट रोड, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. राजू आडम यांचा सन २०२२ मध्ये अक्कलकोट रोडवरील एमआयडीसीमधील भद्रावती कंम्पाऊंट येथे सविता टेक्स्टाईल नावाचा कारखाना होता. या व्यवसायामध्ये आडम यांना अडचणी येत असताना त्यांचे नातेवाईक गोविंद वंगारी यांनी सप्टेंबर २०२३ मध्ये मोहम्मद कादर शेख या भोंदूबाबास आडम यांच्या कारखान्यात नेले. त्यावेळी भोंदूबाबा मोहम्मद शेख याच्यासोबत असलेल्या आयुब रचभरे, ॲड. सचिन गायकवाड, दाऊद पठाण या टीमने आडम यांस गुप्तधनाचे आमिष दाखवून कारखान्यातून गुप्तधनाचे हंडे काढून देण्यासाठी ५ सप्टेंबर २०२३ ते मार्च २०२४ या कालावधीत १ कोटी २६ लाख ३४ हजार ६०० रुपये घेतले व आडम यांची फसवणुक केली. म्हणून एम आयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या गुन्ह्यात मोहम्मद शेख व इतरांना एमआयडीसी पोलिसांनी जेलमधून ताब्यात घेतले व न्यायालयात हजर केले. न्यायालयाने चौघांना दोन दिवस पोलिस कोठडीत ठेवण्याचा आदेश दिला. पो.नि. वाघमारे तपास करीत आहेत.

# पूरबाधित कुटुंबियांना जीवनावश्यक वस्तूंच्या किटचे वाटप

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ ऑक्टोबर-**
सप्टेंबर २०२५ मध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे सोलापूर जिल्ह्यातील ११५ गावांतील १५,११४ कुटुंबे पूरपरिस्थितीमुळे बाधित झाली आहेत. या कुटुंबांचे जीवनावश्यक साहित्य भिजल्यामुळे वापरण्यायोग्य राहिलेले नाही. त्यामुळे बाधित कुटुंबांना तातडीने मदतीची आवश्यकता निर्माण झाली आहे. पालकमंत्री सोलापूर यांच्या सुचनेनुसार जिल्हा प्रशासनाने आपत्ती व्यवस्थापन कार्यक्रमांतर्गत आवश्यक मूलभूत व जीवनावश्यक वस्तूंचा समावेश असलेले एकात्मिक किट तयार करून पूरबाधित कुटुंबांना पुरवठा करण्याचे नियोजन केले आहे.

किटमध्ये २५ वस्तूंचा समावेश असून त्यामध्ये ८ मूलभूत वस्तू एका पिशवीत व १७ जीवनावश्यक वस्तू दुसऱ्या पिशवीत ठेवण्यात येणार आहेत. दोन्ही पिशव्या एकत्र करून एक मोठी पिशवी तयार करण्यात येणार आहे. सदर किटचा पुरवठा १५,११४ बाधित कुटुंबांना करण्यात येणार असून त्यासाठी खालील प्रमाणित संचलन प्रक्रिया निश्चित करण्यात आली आहे: यासाठी ग्रामसेवक, तलाठी, ग्रामपंचायत कर्मचारी व कोतवाल हे सदस्य म्हणून नियुक्त असून, त्यांच्या देखरेखीखाली किट वाटप करण्यात येईल. तर पुरवठा निरीक्षण अधिकारी संबंधित गावांचा रूट पुरवठादारास देतील. पुरवठादार त्या रूटनुसार प्रत्येक गावात किट पोहोच करेल. ग्रामस्तरीय समितीमध्ये सदस्य सचिव म्हणून तलाठी हे पुरवठादाराकडून किट प्राप्त करून त्याची पोहोच घेतील व ती जिल्हा पुरवठा कार्यालयास सादर करतील. किट पूरग्रस्तांना वाटप होईपर्यंत सुस्थितीत ठेवण्याची जबाबदारी पुरवठादाराची राहील. किट वाटपाच्या पूर्वी गावात दंवडी देऊन लाभार्थ्यांना वाटपाची माहिती दिली जाईल.

किट वाटपानंतर लाभार्थी व समिती सदस्यांच्या स्वाक्षरीसह पोहोच घेऊन ती जिल्हा पुरवठा कार्यालयास सादर करण्यात येईल. कोणतीही उणीव किंवा गैरप्रकार आढळल्यास त्याबाबतचा अहवाल तहसीलदार व जिल्हा पुरवठा अधिकारी यांना सादर करावा.

**किटमध्ये समाविष्ट वस्तू**

मूलभूत वस्तू (८): टूथब्रश (२), दंतमंजन पुडी (१), पेस्ट (१), खोबरेल तेल (२०० मि.ली.१), फणी (१), कंगवा (१), अंगाचे साबण (२), कपडे धुण्याचा साबण (१), बिस्फोट पुडे (३). जीवनावश्यक वस्तू (१७) गव्हाचा आटा (५ किग्रॅ), साखर (५ किग्रॅ), चहापत्ती (२५०ग्रॅ), हरभरा दाळ (२ किग्रॅ), रवा (३ किग्रॅ), बेसन पीठ (१ किग्रॅ), स्वयंपाक तेल (२ किग्रॅ), मिठ (१किग्रॅ), तिखट/गरम मसाला (१०० ग्रॅ), हळद/जीरे (१०० ग्रॅ), डालडा (५०० ग्रॅ), शेंगदाणे (१ किग्रॅ), पोहे (२ किग्रॅ), गुळ (१ किग्रॅ), काडीपेटी (१ मोठा बॉक्स), अगरबत्ती (१ लहान पाकीट), मेणबत्ती (१ मोठे पॅकेट).

### चक्कर येऊन पडल्याने एकाचा मृत्यू

**सोलापूर, दि. १७ ऑक्टोबर-**
बाथरूमला गेलेल्या एकाचा अचानक चक्कर येऊल पडल्याने मृत्यू झाला. हा प्रकार उत्तर सोलापूर तालुकयातील बीबी दारफळ या गावात शुक्रवारी दुपारी ३.३० च्या सुमारास घडला.वामन मच्छिद्र कांबळे (वय ६५, रा. बीबी दारफळ ता. उ सोलापूर) असे मृत पावलेल्या व्यक्तीचा मृत्यू झाला. वामन हे शुक्रवारी दुपारी ३.३० च्या सुमारास राहत्या घरात बाथरूमला गेले होते. बाथरूममध्ये अचानक पाय घसरून ते पडले. त्यातच ते बेशुध्द पडल्याने त्यांना सायंकाळी पाच वाजता किरण कांबळे याने उपचारास दाखल केले, परंतु उपचारापूर्वीच ते मृत पावल्याचे डॉक्टरांनी घोषित केल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

# 'भगवा आतंकवाद' हे काँग्रेसने रचलेले कुभांड

## समीर कुलकर्णी यांचा घणाघात : मालेगाव प्रकरणातून निर्दोष सुटलेल्या धर्मयोद्ध्यांचा कोल्हापुरात सत्कार

**तभा वृत्तसेवा,**
**कोल्हापूर, दि.१७ ऑक्टोबर-**
मालेगाव बॉम्बस्फोट' हे 'भगवा आतंकवाद' अस्तित्वात असल्याचे सिद्ध करण्यासाठी तत्कालीन काँग्रेस सरकारने रचलेले एक मोठे कुभांड होते. देशातील अन्वेषण यंत्रणा स्वतंत्रपणे काम न करता, तत्कालीन सत्ताधाऱ्यांच्या तालावर नाचत होत्या. त्यामुळे मालेगाव आणि त्यानंतर झालेल्या अनेक बॉम्बस्फोटांचा तपास करण्याऐवजी तत्कालीन काँग्रेसी राज्यकर्त्यांनी त्यात नाहक हिंदुत्वनिष्ठांना गुंतवले, असा घणाघात मालेगाव स्फोट प्रकरणातून निर्दोष मुक्त झालेले समीर कुलकर्णी यांनी केला.

हिंदु जनजागृती समितीच्या वतीने कोल्हापूर येथील 'देवल क्लब'मध्ये आयोजित 'मालेगाव स्फोटात निर्दोष ठरलेल्या धर्मयोद्ध्यांच्या आणि त्यांच्या अधिवक्त्यांच्या सत्कार' समारंभात ते बोलत होते. या कार्यक्रमासाठी ८०० हून अधिक हिंदू उपस्थित होते. कार्यक्रमात धर्मवीर कुलकर्णी आणि मेजर रमेश उपाध्याय यांचा विशेष सत्कार करण्यात आला. तसेच हिंदु विधीज्ञ परिषदेचे अध्यक्ष अधिवक्ता वीरेंद्र इचलकरंजीकर, अधिवक्ता समीर पटवर्धन, अधिवक्ता प्रीती पाटील आणि हिंदुत्वनिष्ठ लेखक विक्रम भावे यांचाही सन्मान करण्यात आला.

कार्यक्रमाच्या प्रारंभी सत्कारमूर्तींची वाहनातून सभास्थळापर्यंत वाजत-गाजत मिरवणूक काढण्यात आली. यावेळी सनातन संस्थेच्या सद्गुरु स्वाती खाडये, हिंदु एकताचे जिल्हाध्यक्ष दीपक देसाई आणि शहरप्रमुख गजानन तोडकर, महाराष्ट्र मंदिर महासंघाचे अशोक गुरव, शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख उदय भोसले आणि किशोर घाटगे, उद्धव बाळासाहेब पक्षाचे उपजिल्हाप्रमुख संभाजीराव भोकरे आणि करवीर तालुकाप्रमुख राजू यादव, स्वातंत्र्यवीर सावरकर साहित्य आणि विज्ञान मंडळाचे अध्यक्ष नितीन वाडीकर, उद्योजिका मनिषा वाडीकर, श्री शिवप्रतिष्ठान हिंदुस्थानचे जिल्हा कार्यवाह सुरेश यादव यांच्यासह अनेक प्रतिष्ठित मान्यवर उपस्थित होते. या वेळी कार्यक्रमाचे प्रास्ताविक हिंदु जनजागृती समितीचे सुनील घनवट यांनी केले. तर विपुल भोपळे आणि अमोल कुलकर्णी यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. यावेळी मोठा प्रतिसाद मिळाला.




**मोठ्या लोकांची नावे घेतली नाही म्हणून आमची अटक - मेजर रमेश उपाध्याय**

मालेगाव स्फोटादिवशी मी मुंबईत होतो, तरीही मला अटक करून मारहाण करण्यात आली. प.पू. सरसंघचालक डॉ. मोहन भागवत, प्रवीण तोगाडिया, श्री. श्री. रविशंकर, योगी आदित्यनाथ यांची नावे घेण्यासाठी माझ्यावर दबाव टाकला गेला; पण मी शेवटपर्यंत त्यांची नावे घेतली नाहीत. त्यामुळे आम्हाला जाणीवपूर्वक गोवण्यात आले. आमचे सामाजिक आणि आर्थिक आयुष्य उद्ध्वस्त केले. केवळ राजकीय फायद्यासाठी आमच्यावर अन्याय झाला, असा धक्कादायक गौप्यस्फोट मालेगाव बॉंबस्फोटातून निर्दोष मुक्त झालेले तथा भारतीय सैन्य दलातील मेजर रमेश उपाध्याय यांनी कोल्हापुरात केला.

**अन्याय झाला तरी हिंदुत्वाचे कार्य सोडणार नाही - लेखक विक्रम भावे**

डॉ. नरेंद्र दाभोलकर हत्या प्रकरणात कोणताही संबंध नसताना मला आणि अधिवक्ता संजीव पुनाळेकर यांना अटक करण्यात आली. हत्येनंतर १५ मिनिटांतच तत्कालीन मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी ही हत्या 'गोडसेवादी' लोकांनी केल्याचे जाहीर केले होते. यावरून पुरोगाम्यांचे आरोप किती बेगडी व नियोजित असतात, हे स्पष्ट होते. दडपशाही करून तुम्ही आम्हाला छळू शकाल; पण आम्ही हिंदुत्वाचे कार्य सोडणार नाही, हिंदुत्व आमच्या नसानसात भिनलेले आहे. त्यामुळे त्यापासून आम्हाला वेगळे करताच येणार नाही असे ठाम प्रतिपादन 'मालेगाव स्फोटामागील अदृष्ट हात' व 'दाभोलकर हत्या व मी' या पुस्तकांचे लेखक विक्रम भावे यांनी केले.

**काँग्रेसी, साम्यवादी व जिहादी यांद्वारेच 'भगवा आतंकवाद'चा अपप्रचार - सुनील घनवट**

काँग्रेससारख्या निधर्मी शासनकर्त्यांनी साम्यवादी आणि जिहादी शक्तींसोबत मिळून देशात 'भगवा आतंकवाद' असल्याचा पद्धतशीर अपप्रचार केला. यासाठी मालेगाव २००८, समझौता बॉम्बस्फोट, मडगाव स्फोट २००९, दाभोलकर-पानसरे हत्या अशा अनेक प्रकरणांमध्ये निष्पाप हिंदुत्वनिष्ठांना गोवण्यात आले. या षड्यंत्राला बळी पडलेल्यांच्या पाठीशी उभे राहणे प्रत्येक हिंदूचे कर्तव्य आहे, असे प्रतिपादन हिंदु जनजागृती समितीचे महाराष्ट्र व छत्तीसगड राज्यांचे संघटक श्री. सुनील घनवट यांनी केले.

**साम्यवाद्यांनी केलेल्या १४ हजार हत्यांविषयी कुणी का बोलत नाही - अधि. विरेंद्र इचलकरंजीकर**

याप्रसंगी हिंदु विधीज्ञ परिषदेचे अध्यक्ष अधिवक्ता वीरेंद्र इचलकरंजीकर म्हणाले, ''दाभोलकर, पानसरे, कलबुर्गी आणि गौरी लंकेश यांची हत्या झाल्यानंतर गळा काढला जातो; मात्र साम्यवाद्यांनी देशात १४ हजारांहून अधिक हत्या केल्या, याविषयी कुणी का बोलत नाही ? आपल्याला समाजात हिंदूंच्या विरोधात चालू असलेली इकोसिस्टीमच्या विरोधात लढा द्यावा लागेल.

# तरुण भारत

न मे कर्मफले स्पृहा

शनिवार, १८ ऑक्टोबर २०२५







## विचारपुष्प



निसंघाचे ईश्वरी कार्य यशस्वी होईलच. हा जगन्नाथाचा रथ असून, पुढे जाणारच आहे. प्रगतिपथावर असणारा हा जगन्नाथाचा रथ ओढण्यात आपण सहभागी झालो तर आपल्याला पुण्य लाभेल. यश मिळण्यास लागणारा कालावधी काही प्रमाणात कमी होईल. यासाठी आपण उपयुक्त साधन, उपयुक्त माध्यम कसे होऊ शकतो, याची काळजी आपण निश्चितच केली पाहिजे.

**बाबासाहेब आपटे**
रा. स्व. संघाचे प्रथम प्रचारक

# २०८ माओवाद्यांनी केला शस्त्रत्याग

## छत्तीसगडसाठी ऐतिहासिक दिवस : मुख्यमंत्री साय



**रायपूर, १७ ऑक्टोबर**

छत्तीसगडमध्ये माओवादाच्या विरोधातील लढ्याला मोठे यश मिळाले आहे. येथे एकाचवेळी २०८ माओवाद्यांनी शरणागती पत्करत शस्त्रे ठेवली. आजचा दिवस केवळ बस्तर किंवा छत्तीसगड नव्हे तर, संपूर्ण देशासाठी ऐतिहासिक आहे, अशी प्रतिक्रिया छत्तीसगडचे मुख्यमंत्री विष्णुदेव साय यांनी व्यक्त केली.

शरणागती पत्करणाऱ्या माओवाद्यांमध्ये ११० महिला आणि ९८ पुरुषांचा समावेश आहे. प्रतिबंधित भाकपा (माओवादी) संघटनेच्या विविध पदांवरील माओवाद्यांचा यात समावेश आहे. या माओवाद्यांनी शरणागती पत्करताना १५३ शस्त्रे ठेवली. ही माओवाद्यांची देशातील सर्वांत मोठी शरणागती ठरली आहे.

हिंसाचाराचा मार्ग सोडून समाजाच्या मुख्य प्रवाहात प्रवेश करणाऱ्या या माओवाद्यांचे स्वागत आदिवासी समुदायाच्या नेत्यांनी पुष्पवर्षाव करून केले. त्यानंतर त्यांनी मुख्यमंत्री विष्णुदेव साय यांच्यासमोर शस्त्रे ठेवली.

शरण आलेल्या माओवाद्यांमध्ये केंद्रीय समितीचा अधिकृत प्रवक्ता रूपेशचाही समावेश आहे. रूपेशचे खरे नाव सतीश उर्फ आसन्ना असून, त्याच्यावर लाखो रुपयांचे बक्षीस आहे. तो बस्तर भागातील रहिवासी आहे. २० वर्षांपूर्वी त्याने नक्षल चळवळीत प्रवेश केला होता. प्रचार, भरती तसेच जंगलात नवीन तळ निर्माण करण्याची जबाबदारी त्याच्यावर होती. भूपेशसोबत तो देखील मागील काही महिन्यांपासून सुरक्षा यंत्रणांच्या संपर्कात असल्याची माहिती सूत्रांनी दिली. (वृत्तसंस्था)

### शरण आलेले माओवादी नेते

शरण आलेले माओवादी प्रतिबंधित भाकपा (माओवादी) संघटनेत विविध पदांवर कार्यरत होते. त्यापैकी एक केंद्रीय समितीचा सदस्य आहे. चार दंडकारण्य विशेष क्षेत्रीय समितीचे, एक क्षेत्रीय समितीचा, २१ विभागीय समितीचे, ६१ क्षेत्रीय समितीचे, ९८ पक्ष सदस्य आणि २२ पीएलजीए/आरपीसी तसेच इतर कार्यकर्ते होते. शरणागती पत्करणाऱ्या माओवाद्यांमध्ये केंद्रीय समितीचा सदस्य रूपेश, डीकेएसझेडसीचा सदस्य भास्कर उर्फ राजमन मडावी, रनिता, राजू सलाम, धन्नू वेट्टी उर्फ संटू आणि क्षेत्रीय समिती सदस्य रतन एलमचा समावेश आहे.

### माओवाद्यांनी सोपविलेली शस्त्रे

| शस्त्रे | संख्या | | |
|---|---|---|---|
| एके-४७ रायफल | १९ | .३०३ रायफल | ३६ |
| एसएलआर रायफल | १७ | कार्बाईन | ०४ |
| इन्सास रायफल | २३ | बीजीएल लाँचर | ११ |
| इन्सास एलएमजी | ०१ | १२ बोअर बंदूक | ४१ |
| | | पिस्तूल | ०१ |

# अखेर 'तेजस'ची भरारी

**नाशिक, १७ ऑक्टोबर**

स्वदेशी तंत्रज्ञानाचा वापर करून तयार करण्याल आलेल्या पहिल्या तेजस-एमके-ए१ या लढाऊ विमानाने येथील हिंदुस्थान एरोनॉटिक्स लिमिटेडच्या धावपट्टीवरून आकाशात भरारी घेतली.

दीपावली महोत्सवातील वसू बारस हा पहिला दिवस भारतासाठी विशेष ठरला आहे. संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांच्या उपस्थितीत तेजस-एमके-ए१ विमानाने उड्डाण केले. गेल्या महिन्यात २१ सप्टेंबरला मिग-२१ विमानांच्या दोन स्क्वाड्रन निवृत्त झाल्या. एकूण ४० विमाने कमी झाल्याने हवाई दलातील स्क्वाड्रनची संख्या ३० वर आली. लढाऊ विमानांची तूट भरून काढण्यासाठी तेजस-एमके-१ ए विमानांच्या निर्मितीला वेग देण्यात आला आहे. अमेरिकन कंपनी जनरल इलेक्ट्रिकने इंजिन देण्यात उशीर केल्याने उत्पादनाच्या क्षमतेवर परिणाम झाला आहे. सध्या हवाई दलात तेजस एमके-१ च्या दोन स्क्वाड्रन कार्यरत आहेत. हवाई दलाने २०२१ मध्ये तेजसची आधुनिक आवृत्ती तेजस एमके-१ ए च्या ८३ विमानांची मागणी नोंदविली आहे. २०२९ पर्यंत ही विमाने हवाई दलाला मिळण्याची शक्यता आहे. (वृत्तसंस्था)



# गुजरातमध्ये नवीन मंत्रिमंडळाचा शपथविधी

**१९ नवीन चेहऱ्यांना संधी** • **हर्ष सांघवी झाले उपमुख्यमंत्री** • **रवींद्र जडेजाची पत्नी रिवाबाला मंत्रिपद**

**गांधीनगर, १७ ऑक्टोबर**

गुजरातमध्ये शुक्रवारी मुख्यमंत्री भूपेंद्र पटेल यांच्या नेतृत्वात नवीन मंत्रिमडळाने शपथ घेतली. हर्श सांघवी यांना उपमुख्यमंत्रिपद देण्यात आले. हर्ष सांघवी हे तीन वेळा आमदार राहिले असून, ते मजुरा विधानसभा मतदारसंघाचे नेतृत्व करतात. गुजरातचे राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी २५ आमदारांना मंत्रिपदाची शपथ दिली.

यासह मुख्यमंत्री भूपेंद्र पटेल यांच्यासह मंत्रिमंडळातील सदस्यांची संख्या २६ झाली आहे. मागील वर्षी काँग्रेस सोडून भाजपात दाखल झालेले अर्जुन मोढवाढिया यांनाही मंत्रिपद मिळाले आहे. क्रिकेटपटू रवींद्र जडेजाची पत्नी रिवाबा जडेजाचा मंत्रिमंडळात समावेश करण्यात आला. आमदार झाल्यावर तीन वर्षांतच तिला मंत्रिपद मिळाले आहे. या व्यतिरिक्त विसनगरये आ. ऋषिकेश पटेल, प्रफुल्ल पनशेरिया आणि कुंवरजी बावलिया यांचाही मंत्रिमंडळात समावेश करण्यात आला. २०२७ मध्ये गुजरात विधानसभेच्या निवडणुका होणार आहे. त्यासाठी मंत्रिमंडळातील फेरबदल अत्यंत महत्त्वपूर्ण आहेत. आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठीही सामाजिक समीकरणांचा अंदाज घेण्याची तयारी भाजपा करीत असल्याची माहिती सूत्रांनी दिली. (वृत्तसंस्था)



# आईने 'यकृत' देऊन वाचविले सात वर्षाच्या बालिकेचे प्राण

**मुंबई, दि. १७ ऑक्टोबर -**

सात वर्षांची देवांशी गेल्या अनेक महिन्यांपासून यकृताच्या गंभीर आजाराशी झुंज देत होती. डॉक्टरांनी अखेर 'यकृत प्रत्यारोपण शस्त्रक्रिया' हा एकमेव पर्याय असल्याचे सांगितले. तसेच उपचारासाठी २० लाख खर्च असल्याचे सांगितले. मात्र, भाजीपाला विक्रीचा छोटा व्यवसाय करणाऱ्या कुटुंबापुढे या उपचाराचा खर्च परवडणारा नसल्याने 'मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रूग्णालय मदत कक्ष'चा कुटूंबीयांना आर्थिक आधार मिळाला. तसेच देवांशीच्या आईने तिला यकृत दिल्यानंतर भाग देवून तिच्यावर यशस्वी उपचार करण्यात आले.



वाशिम जिल्ह्यातील मंगरुळपीर तालुक्यातील वरूड (बु) येथे राहणारे रवींद्र गावंडे हे भाजीपाला विक्रीचा व्यवसाय करून कुटुंबाचा उदरनिर्वाह करतात. त्यांची मुलगी देवांशी पोटदुखी, ताप, मळमळ होणे आदींमुळे सतत आजारी पडत होती. पालकांनी सुरूवातीला मंगरूळपीर आणि अकोला येथे तिच्यावर उपचार केले. परंतु तिच्या प्रकृतीत सुधारणा होत नसल्याने अखेर तिला नागपूर येथे हलविण्यात आले. वैद्यकीय तपासणीनंतर, तज्ज्ञ डॉक्टरांनी तिचे यकृत गंभीर स्वरूपात बाधित झाल्याचे निदान केले. तसेच यकृत प्रत्यारोपण शस्त्रक्रिया' गरजेचे असल्याचे सांगितले. शस्त्रक्रियेसाठी २० लाख रुपये खर्चाचा अंदाज त्यांनी वर्तविला होता.दरम्यान, देवांशीच्या वडिलांना मित्रांकडून मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधीबाबत माहिती मिळाली. त्यांनी कक्षाकडे धाव घेतली.

## महत्त्वाचे

### सलग तिसऱ्या सत्रात शेअर बाजारांत तेजी

**मुंबई** : ब्ल्यू चिप बँकिंग आणि तेल कंपन्यांच्या समभागांची झालेली दमदार खरेदी तसेच मोठ्या प्रमाणात आलेल्या विदेशी गुंतवणुकीच्या बळावर सलग तिसऱ्या सत्रात आज शुक्रवारी शेअर बाजारांत तेजी कायम राहिली. मुंबई शेअर बाजारात निर्देशांक ४८४ अंकांनी वाढून ८३,९५२ वर बंद झाला. २७ जूनपासून निर्देशांकाने ही पातळी पाहिली नव्हती. दिवसभराच्या सत्रात निर्देशांकाने ८४,१७२ अंकांपर्यंत उसळी घेतली होती. आजच्या सत्रात राष्ट्रीय शेअर बाजाराचा निफ्टी १२४ अंकांनी वधारून २५,७०९ या पातळीवर बंद झाला. हा ५२ आठवड्यांचा उच्चांक आहे. एशियन पेंट्सचे समभाग ०.४९ टक्क्याने वधारले. महिंद्रा अॅण्ड महिंद्रा, भारती एअरटेल, आयटीसी, हिंदुस्तान युनिलिव्हर, आयसीआयसीआय बँक आणि रिलायन्स इंडस्ट्रिजला आजच्या सत्रात फायदा झाला.

### दोन माओवादी झारखंडमध्ये शरण

**छतरा** : माओवाद्यांचा फुटीरतावादी गट तृतीय संमेलन प्रस्तुती समितीच्या दोन माओवाद्यांनी शुक्रवारी छतरा जिल्ह्यात पोलिसांसमोर शरणागती पत्करली, अशी माहिती अधिकाऱ्यांनी दिली. कुणाल उर्फ कुलदीप आणि रोहिणी गंझू उर्फ रोहिणी अशी त्यांची नावे आहेत. कुणाल हा टीएसपीएसचा एरिआ कमांडर होता, असे पोलिसांनी सांगितले. त्यांनी पत्करलेल्या शरणागतीच्या माध्यमातून झारखंडला माओवाद्यांपासून मुक्त करण्याच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल पडले आहे, असे बोकारे रेंजचे पोलिस महानिरीक्षक सुनील भास्कर यांनी सांगितले.

# मैनोद्दीन हत्तुरे दोन जिल्ह्यातून दोन वर्षांकरिता तडीपार

**सोलापूर, दि. १७ ऑक्टोबर -**

दंगा व मारामारी करणे, मुलीला जबरदस्तीने पळवून नेणे, जीवे ठार मारण्याचा प्रयत्न करणे यासारखे गुन्हे दाखल असलेल्या मैनोदीन म. रफीक हत्तुरे (वय ३२, रा. हत्तुरे कॉम्प्लेक्स, बेगम पेठ) यास सोलापूर व धाराशिव या दोन जिल्ह्यातून दोन वर्षाकरिता तडीपार करण्याचा आदेश पोलीस उपायुक्त विजय कबाडे यांनी दिला आहे. हत्तुरे यांच्याविरुद्ध २०१६, २०२१, २०२२ व २०२५ मध्ये जमाव जमवून दंगा व मारामारी करणे, मुलीला जबरदस्तीने पळवून नेणे, जीवे ठार मारण्याचा प्रयत्न करणे यासारखे गुन्हे दाखल असल्याने त्याच्याविरुद्ध जेल रोड पोलीस ठाण्याकडून तडीपारचा प्रस्ताव पोलीस उपायुक्त कबाडे यांना सादर करण्यात आला होता. त्या प्रस्तावाच्या अनुषंगाने पोलीस उपायुक्त कबाडे यांनी हत्तुरे यास सोलापूर व धाराशिव या दोन जिल्ह्यातून दोन वर्षांकरिता तडीपार केले आहे.



# बीसीसीआयला १०० कोटींचा नफा

**मुंबई** : आशिया कप जिंकल्यानंतर भारताला ट्रॉफी मिळाली नसली तरी भारतीय क्रिकेट नियामक मंडळाला (इउउख) सुमारे १०० कोटींचा फायदा झाला आहे, असा दावा ढजख च्या अहवालात करण्यात आला आहे. २८ सप्टेंबर रोजी झालेल्या अंतिम सामन्यात भारताने पाकिस्तानला हरवून आशिया कपचे विजेतेपद जिंकले. भारतीय संघाने मोहसीन नक्वी यांच्याकडून ट्रॉफी स्वीकारण्यास नकार दिला. यामुळे संतप्त झालेल्या नक्वी यांनी ट्रॉफी आणि पदके सोबत घेतली. परिणामी, भारतीय संघाला ट्रॉफी आणि पदकांशिवाय परतावे लागले.

# भारत-अमेरिकेत लवकरच व्यापार करार : गोयल

**नवी दिल्ली, १७ ऑक्टोबर**

मुक्त व्यापार करारावरील भारत आणि अमेरिकेत कित्येक दिवसांपासून चर्चेचे गुऱ्हाळ सुरू आहे. मात्र, आता यावरील तोडगा दृष्टीपथात असल्याची माहिती केंद्रीय व्यापार मंत्री पीयूष गोयल यांनी दिली. व्यापार करारावर दोन्ही देशांमधील चर्चा वेगाने पुढे जात आहे.

भारताचे चर्चा करणारे एक पथक सध्या अमेरिकेत आहे. त्यांच्या सतत बैठका होत आहेत, असे पीयूष गोयल यांनी सांगितले.

भारत आणि अमेरिका यांच्यात व्यापार कराराबाबत सक्रिय चर्चा सुरू आहे. आम्ही मागील तीन वर्षांत अनेक विकसित देशांसोबत मुक्त व्यापार करार केले आहेत. आम्ही अमेरिका, युरोपीय संघ, चिली, पेरू, न्यूझीलंड आणि ओमानसोबत व्यापार कराराबाबत चर्चा करीत आहोत, असे पीयूष गोयल यांनी सांगितले. (वृत्तसंस्था)

# हमासने रक्तपात थांबवावा; अन्यथा कारवाई करणार

## आठ नागरिकांच्या हत्येवरून डोनाल्ड ट्रम्प यांचा इशारा

**वॉशिंग्टन, १७ ऑक्टोबर**

दहशतवादी संघटना हमासने गाझा पट्टीत रक्तपात थांबवावा अन्यथा अमेरिका कारवाईसाठी सैन्य पाठवेल. हमासच्या कृतीने शांतता कराराच्या अंमलबजावणीला अडथळा येऊ शकते. त्यांनी तत्काळ शस्त्रे जमा करावी आणि पॅलेस्टाईन सरकारच्या कामकाजात ढवळाढवळ बंद करावी, असा इशारा अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी दिला.



गाझात आठ नागरिकांच्या हत्येनंतर संताप व्यक्त करीत ट्रम्प यांनी समाज माध्यमावर केलेल्या पोस्टमध्ये म्हटले की, हमासने गाझामध्ये हत्याकांड सुरूच ठेवले तर आम्हाला कारवाई करण्यासाठी पुढाकार घ्यावा लागेल. शांतता कराराची अंमलबजावणीत अडथळा आणणारी कृती हमासने यापुढे केल्यास अमेरिकेचे सैनिक गाझात प्रवेश करेल आणि त्यांचा नायनाट करूनच तेथून माघारी परतेल. एकतर त्यांनी शस्त्रांचा त्याग करावा अन्यथा त्यांना आम्हाला निःशस्त्र करावे लागले, शांतता भंग करण्याचा प्रयत्न कुठल्याही परिस्थितीत सहन केला जाणार नाही. इस्त्रायलला मदत केल्याच्या आरोपावरून हमासने गाझात नागरिकांना रस्त्यावर रांगेत उभे करून त्यांना गोळ्या घातल्या. यावरून ट्रम्प यांनी हमासला इशारा दिला आहे. (वृत्तसंस्था)

### इस्रायलला मदत केल्याच्या आरोपात हत्येचे सत्र सुरूच

हमास आणि इस्रायलच्या शांतता करारानंतर हमासने गाझात पॅलेस्टाईन नागरिकांना लक्ष्य करून त्यांची हत्या करण्याचे सत्र सुरूच ठेवले आहे. इस्रायलच्या लष्करांना मदत केल्याच्या आरोपात नागरिकांवर गोळीबार केल्याच्या अनेक घटना दोन दिवसांत समोर आल्या. त्यात २२ पेक्षा अधिक नागरिकांना जीव गमवावा लागला.

# महापालिका प्रभागनिहाय मतदार यादी विभाजनाचे काम सुरु

## महापालिका आयुक्तांचे मार्गदर्शन : संबंधित कर्मचाऱ्यांना दिले प्रशिक्षण

**सोलापूर, दि. १७ ऑक्टोबर -**

राज्य निवडणूक आयोगाच्या सूचनांनुसार प्रभागनिहाय मतदार यादी विभाजनाचे कार्य अचूकता, पारदर्शकता व वेळबद्धता या तत्वांवर आधारित असावे. नागरिकांच्या अधिकाराशी निगडित हे अत्यंत महत्त्वाचे काम असल्याने प्रत्येक कर्मचाऱ्याने जबाबदारीने व प्रामाणिकपणे ते पार पाडावे, असे निर्देश महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी दिले.

महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५ करिता राज्य निवडणूक आयोगाने १ जुलै २०२५ रोजी अस्तित्वात असलेल्या विधानसभा मतदार यादीच्या आधारे प्रभागनिहाय मतदार यादी विभाजनाचा कार्यक्रम जाहीर केला आहे. या आदेशानुसार सोलापूर महानगरपालिकेच्या अंतिम प्रभाग रचनेनुसार एकूण २६ प्रभागांकरिता प्रभागनिहाय मतदार यादी विभाजनाचे काम सुरु करण्यात आले आहे. या काम काजाच्या अनुषंगाने प्रत्येक प्रभागाकरिता स्वतंत्र टीम नियुक्त करण्यात आली असून, नियुक्त कर्मचाऱ्यांना आज सोलापूर महानगरपालिका कौन्सिल हॉल येथे मतदार यादी विभाजनासंदर्भात सविस्तर प्रशिक्षण देण्यात आले. या बैठकीस अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे, उपआयुक्त तैमूर मुलाणी, सहाय्यक आयुक्त गिरीश पंडित, सहाय्यक अभियंता रामचंद्र पेंटर तसेच निवडणूक विभागाचे अधिकारी आणि प्रशिक्षणार्थी कर्मचारी उपस्थित होते. या प्रशिक्षण सत्रास आयुक्त डॉ. ओम्बासे यांनी उपस्थित राहून सर्व संबंधित कर्मचाऱ्यांना मार्गदर्शन केले. आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे म्हणाले, राज्य निवडणूक आयोगाच्या सूचनांनुसार मतदार यादी विभाजनाचे कार्य अचूकता, पारदर्शकता व वेळबद्धता या तत्वांवर आधारित असावे. नागरिकांच्या अधिकाराशी निगडित हे अत्यंत महत्त्वाचे काम असल्याने प्रत्येक कर्मचाऱ्याने जबाबदारीने व प्रामाणिकपणे ते पार पाडावे, असे निर्देश त्यांनी दिले. या कामासाठी नियुक्त टीमकडून प्रभागनिहाय घरोघरी जाऊन सर्वेक्षण करून, प्रभागाच्या निश्चित हद्दीनुसार मतदारांची माहिती पडताळून पाहणी करण्यात येणार आहे. या प्रक्रियेद्वारे अंतिम मतदार यादीत समाविष्ट होणाऱ्या मतदारांची नोंद तपासून, प्रभाग निहाय मतदार याद्या करण्यात येणार आहे.

# शहरातून तीन दुचाकींची चोरी

**सोलापूर, दि. १७ ऑक्टोबर -**

शहरातील वेगवेगळ्या भागातून चोरट्यांनी तीन दुचाकी चोरून नेल्या. अंबादास गणपती व्हनकडे (वय ३३, रा. कुमठे गाव, मड्डी वस्ती. सोलापूर) यांनी त्यांची एमएच १३ सीएन ७०२५ क्रमांकाची दुचाकी ही ११ ऑॅक्टोबर रोजी दुपारी मुरारजी पेठेतील ओयासिस मॉल येथे हॅन्डल लॉक करून पार्क केली होती. ती २० हजार रुपये किंमतीची दुचाकी चोरट्याने चोरून नेल्याची नोंद फौजदार चावडी पोलिस ठाण्यात करण्यात आली आहे. हवालदार कसबे पुढील तपास करीत आहेत.

स्वप्नील शिवशंकर म्हंता (वय २३, रा. जोडभावी पेठ, कन्ना चौक, सोलापूर) यांनी त्याची एमएच १३ सीझेड १९५४ क्रमांकाची दुचाकी ही १२ ऑक्टोबर रोजी रात्री रेल्वे स्टेशन येथील विश्व हॉटेलसमोर हॅन्डल लॉक करून पार्क केली होती. ती ५० हजार रुपये किंमतीची दुचाकी चोरट्याने चोरून नेल्याची नोंद सदर बझार पोलिस ठाण्यात करण्यात आली आहे. हवालदार सरतापे पुढील तपास करीत आहेत.




अर्चना राजू बेळेनवरू (वय ४०, रा. जुना देगाव नाका, सोलापूर) या महिलेने त्यांची एमएच १३ डीएन ४४८९ क्रमांकाची दुचाकी ही १३ ऑक्टोबर रोजी रात्री घराजवळ हॅन्डल लॉक करून पार्क केली होती. ती ७० हजार रुपये किंमतीची दुचाकी चोरट्याने चोरून नेल्याची नोद सलगर वस्ती पोलिस ठाण्यात करण्यात आली आहे. हवालदार वाल्मिकी पुढील तपास करीत आहेत.

# भारतासोबत कायदेशीर सहाय्य कराराला नेपाळची मान्यता

## सुशीला कार्की यांच्या अध्यक्षतेत झालेल्या बैठकीत निर्णय

**काठमांडू, १७ ऑक्टोबर**

नेपाळच्या अंतरिम सरकारने गुरुवारी भारतासोबत परस्पर कायदेशीर सहाय्य कराराला मान्यता दिली. या कराराचे उद्दिष्ट दोन्ही देशांमधील गुन्हेगारी प्रकरणांमध्ये सहकार्य मजबूत करणे आहे. हंगामी पंतप्रधान सुशीला कार्की यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला.



माहिती आणि प्रसारण मंत्री जगदीश खरेल यांनी सांगितले की या कराराद्वारे नेपाळ केवळ भारतासोबतच नव्हे, तर इतर देशांसोबतही कायदेशीर सहकार्य वाढवू शकेल.

या करारामुळे अंमली पदार्थांची तस्करी, मानवी तस्करी, बनावट चलन आणि इतर सीमापार गुन्ह्यांना आळा घालण्यास मदत होईल. त्यामुळे गुन्हेगारांना भारत किंवा नेपाळचा सुरक्षित क्षेत्र म्हणून वापर करणे देखील कठीण होईल.

या बैठकीत नेपाळ सरकारने ११ देशांमधील त्यांचे राजदूत परत बोलावण्याचा निर्णय घेतला. या देशांमध्ये चीन, जर्मनी, इस्रायल, मलेशिया, कतार, रशिया, सौदी अरेबिया, स्पेन, ब्रिटन, अमेरिका आणि जपान यांचा समावेश आहे. राजदूतांना ६ नोव्हेंबरपर्यंत नेपाळला परत येण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. हे पाऊल नेपाळच्या परराष्ट्र धोरणातील फेरबदलाचा भाग असल्याचे सांगण्यात आले. (वृत्तसंस्था)

# अमेरिकेच्या माजी राष्ट्रीय सुरक्षा सल्लागारावर आरोप निश्चित

## गोपनीय दस्तावेजाचा गैरवापर

**वॉशिंग्टन, १७ ऑक्टोबर**

अमेरिकेचे माजी राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार जॉन बोल्टन यांच्यावर देशाच्या सुरक्षेशी संबंधित गोपनीय दस्तावेजाचा गैरवापर केल्याचा ठपका ठेवण्यात आला. त्यांच्यावर १८ प्रकरणांमध्ये आरोप निश्चित करण्यात आले.



तपास यंत्रणांच्या नोट्समध्ये असलेली संवेदनशील माहिती त्यांनी कुटुंबीयांना ई-मेलवर पाठविल्याचा आरोप तपास यंत्रणांनी केला. याप्रकरणी दोषी आढळल्यास ७६ वर्षीय बोल्टन यांना जन्मठेपेची शिक्षा होऊ शकते. २०२१ मध्ये इराणी हॅकर्सनी बोल्टनचे ई-मेल अकाऊंट हॅक केले होते. तपास संस्था एफबीआयने २०२२ पासून या प्रकरणाची चौकशी सुरू केली आणि आता त्यांच्याविरुद्ध औपचारिक आरोप निश्चित करण्यात आले आहेत.

बोल्टनवर आरोप झाल्यानंतर अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांनी प्रतिक्रिया देताना म्हटले की, तो एक वाईट माणूस आहे आणि तुम्ही जे पेराल तेच उगवेल. बोल्टन यांनी २०१८ ते २०१९ पर्यंत ट्रम्प प्रशासनात राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार म्हणून काम केले.

राजीनामा दिल्यानंतर, बोल्टन यांनी ट्रम्पवर तीव्र हल्ला चढवला आणि एक पुस्तक लिहिले, जे ट्रम्प यांनी निवडणुकीपूर्वी रोखण्याचा प्रयत्न केला. एफबीआयने बोल्टन यांच्या घराची तपासणी केली; त्यात अनेक छापील गोपनीय कागदपत्रे आढळून आली. (वृत्तसंस्था)

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत

https://epaper.dainiktarunbharat.com/



## अग्रलेख...

# कर्नाटक सरकारचे डोके फिरले आहे काय?

देशातील सर्वांत जुन्या आणि 'वयोवृद्ध' अशा काँग्रेस पक्षाला म्हातारचळ लागले आणि त्याचे डोके फिरले की काय, अशी शंका येण्यासारखा निर्णय कर्नाटक सरकारने घेतला आहे. काँग्रेस पक्ष राष्ट्रीय स्तरावर असो, की राज्य पातळीवर, जे निर्णय घेत आहे, त्यामुळे त्याच्या शहाणपणाची कीव करावीशी वाटते. २०१४ च्या लोकसभा निवडणुकीत पहिल्यांदा काँग्रेस पक्षाला मोठी ठेच लागली, तरी त्याचे डोळे उघडत नाही, याचे आश्चर्य वाटते. बरे, ही ठेच पहिल्यांदा लागली असे नाही तर त्यानंतर २०१९ आणि २०२४ च्या लोकसभा निवडणुकीतही लागली. पण त्यापासून काँग्रेस पक्षाने काही धडा घेतला, असे दिसत नाही. सलग तीन लोकसभा निवडणुकीत नुसती हार नव्हे, तर दारुण पराभव झाल्यानंतरही काँग्रेस पक्षाला शहाणपण येत नाही, याला काय म्हणावे? २०१४ आणि २०१९ च्या लोकसभा निवडणुकीत तर विरोधी पक्षनेतेपद मिळू शकेल, एवढ्या जागाही काँग्रेस पक्ष जिंकू शकला नव्हता. २०१४ च्या लोकसभा निवडणुकीत पराभव झाल्यानंतर काँग्रेस पक्षाने आपल्या वागणुकीचे, आपल्याकडून झालेल्या चुकांचे आत्मपरीक्षण करायला पाहिजे होते. पण काँग्रेस पक्षाने तसे काही केले नाही. तसे करण्याची त्याला आवश्यकताही वाटली नाही. आपल्या पराभवाचे आत्मपरीक्षण न करता काँग्रेस पक्ष त्याचे खापर निवडणूक आयोगावर मतदारयाद्यांच्या मुद्यावरून खोटेनाटे आरोप करून फोडत आहे. अजूनही हा कार्यक्रम संपलेला नाही. वर्गात सर्व विषयात सातत्याने अनुत्तीर्ण होणारा विद्यार्थी आणि काँग्रेस पक्ष यांच्यात काही फरक नाही. हा विद्यार्थी जसा आपल्या अनुत्तीर्ण होण्याचे खापर शिक्षकांवर फोडतो, त्यांनी वर्गात नीट शिकवले नाही, असे म्हणतो, तशी गत काँग्रेस पक्षाची झाली आहे. काँग्रेस पक्ष अशाच चुका वारंवार करीत आहे. आता कर्नाटकमधील काँग्रेस सरकारने सार्वजनिक स्थळांवरील रा. स्व. संघाच्या कार्यक्रमांवर विविध प्रकारचे निर्बंध घालण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे यापुढे कर्नाटकात संघाला परवानगीविना सार्वजनिक पथसंचलन काढता येणार नाही, तसेच सार्वजनिक ठिकाणी कार्यक्रमही घेता येणार नाहीत. देशात ज्या मोजक्या राज्यांत काँग्रेसचे सरकार आहे, त्यातील एक राज्य कर्नाटक आहे. रा. स्व. संघाने आपली १०० वर्षे नुकतीच पूर्ण केली. रा. स्व. संघ ही राष्ट्रवादाच्या भावनेने ओतप्रोत असलेली राष्ट्रभक्त नागरिक निर्माण करणारी आणि राष्ट्रवादी विचारांची देशातीलच नव्हे तर जगातील सर्वांत मोठी सांस्कृतिक संघटना आहे. अशा संघटनेला विविध माध्यमांतून त्रास देण्याचा प्रयत्न कर्नाटकातील सिद्धरामय्या सरकार करत आहे, याचे विनाशकाले विपरीत बुद्धी या शब्दांतच वर्णन करावे लागेल. राहुल गांधी ज्या पक्षाचे नेते आहेत, त्या पक्षाकडून यापेक्षा वेगळी अपेक्षाही करता येणार नाही. तरी बरे, संपूर्ण देशात आज काँग्रेसची सत्ता नाही. देशात काँग्रेसची सत्ता असती तर काँग्रेसने संघावर थेट चौथ्यांदा बंदी घालायलाही मागेपुढे पाहिले नसते.

कर्नाटकातील एक मंत्री प्रियांक खडगे यांनी वास्तवात संघावर बंदी घालण्याचीच मागणी एका पत्रातून मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांच्याकडे केली होती. प्रियांक हे काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष आणि राज्यसभेतील विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खडगे यांचे चिरंजीव. काँग्रेसच्या राष्ट्रीय अध्यक्षाचे दिवटे चिरंजीव असल्यामुळे प्रियांक यांच्या पत्राची दखल मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांना घ्यावी लागली असावी. कारण काहीही असेल, पण हा निर्णय शंभर टक्के चुकीचा आणि निषेधार्ह आहे. रा. स्व. संघाने तीन वेळा बंदीचा अनुभव घेतला आणि प्रत्येक वेळी तो अजिंक्य ठरला. अशा प्रकारच्या निर्बंधांमुळे संघाच्या कामांवर आपल्याला नियंत्रण आणता येईल, असे स्वप्न काँग्रेस पाहत असेल तर ते दिवास्वप्नच होय. संघावर पहिली बंदी १९४८ मध्ये राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या हत्येनंतर घातली गेली. दुसरी बंदी १९७५ मध्ये आणिबाणीच्या काळात तर तिसरी बंदी रामजन्मभूमी आंदोलनात अयोध्येत वादग्रस्त ढांचा पडल्यानंतर १९९२ मध्ये घालण्यात आली. यातल्या कोणत्याच बंदीने संघाचे काहीच बिघडले नाही. उलट ज्यांनी संघावर बंदी घातली, त्यांनाच त्याची राजकीय किंमत भविष्यात चुकवावी लागली. प्रत्येक बंदीनंतर संघ आणखी झळाळून निघाला, संघाचे काम वाढले. आगीतून सोने जसे झळाळून निघते, तसे संघाचे झाले. सिद्धरामय्या सरकारने संघावर निर्बंध लादले असले तरी ते न्यायालयात टिकणार नाहीत. जनतेत जो काही रोष निर्माण झाला तो तर आहेच. कर्नाटकातील जनताच संघावरील हे निर्बंध झुगारून देईल, यात शंका नाही. आपल्या प्रत्येक कार्यक्रमासाठी संघाला आता कर्नाटकात तेथील सरकारची परवानगी घ्यावी लागेल आणि सरकार अशी परवानगी देणार नाही तेव्हा हा रोष अधिक वाढेल. मुळात संघ कोणतेही बेकायदेशीर काम करीत नाही. संघाची शाखा लावायला, हिंदुत्वाचे प्रतीक असलेल्या भगव्या ध्वजाला प्रणाम करायला कर्नाटकातील जनतेला आता तेथील सरकारची परवानगी घ्यावी लागेल का, हा मूलभूत असा प्रश्न आहे. उद्या मंदिरात जायलाही जनतेला तेथील काँग्रेस सरकारची परवानगी घ्यावी लागेल की काय, असे दिसते. संघात जाणे, भगव्या ध्वजाला प्रणाम करणे हा कर्नाटकातील काँग्रेसच्या सरकारच्या दृष्टीने गुन्हा असेल, बेकायदेशीर काम असेल तर तेथील जनता असा गुन्हा एकदा नाही तर वारंवार करायलाही तयार आहे. स्वातंत्र्य आंदोलनाच्या काळात देशातील जनतेने महात्मा गांधींच्या नेतृत्वात सविनय कायदेभंग आंदोलन केले होते. प्रसंगी कर्नाटकात तसेही घडेल आणि तेव्हा काँग्रेसला फार अडचणीचे होईल. केंद्रातील मोदी सरकारवर हुकूमशाहीचा आरोप करणाऱ्या कर्नाटकातील काँग्रेस सरकारने या निर्णयातून आपल्याच हुकूमशाहीचे दर्शन देशाला घडवले आहे. संघावर निर्बंध आणून कर्नाटकातील काँग्रेस सरकारने आपल्या हाताने आपल्या पायावर धोंडा पाडून घेतला आहे.

संघ आणि संघ परिवारातील विविध संघटनांच्या कामकाजात आणि कार्यक्रमातही सहभागी होण्यास राज्यातील सरकारी कर्मचारी आणि अधिकाऱ्यांवर बंदी घालावी, अशी मागणीही प्रियांक खडगे यांनी मुख्यमंत्र्यांकडे केली आहे. सरकारी कर्मचारी आणि अधिकाऱ्यांना संघ आणि संघ परिवारातील संघटनांना वर्गणी द्यायलाही त्यांनी मनाई केली आहे. यावरून प्रियांक खडगे आणि काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खडगे यांचे डोके फिरले, असे म्हणावेसे वाटते. कारण अशी मागणी करण्यापूर्वी प्रियांक यांनी आपल्या वडिलांशी म्हणजे मल्लिकार्जुन खडगे यांच्याशी निश्चितच संवाद साधला असावा. स्वातंत्र्य आंदोलनात लोकमान्य टिळकांनी ब्रिटिश सरकारच्या अन्याय वागणुकीमुळे संतापून सरकारचे डोके ठिकाणावर आहे का, असा प्रश्न विचारणारा जहाल अग्रलेख लिहिला होता. टिळकांनी सरकारला डोके आहे, हे गृहीत धरून ते ठिकाणावर आहे का, असा प्रश्न विचारला होता. आपण कर्नाटकातील सिद्धरामय्या सरकारला आणि काँग्रेसच्या राष्ट्रीय नेतृत्वाला डोके ठिकाणावर आहे का, असा प्रश्न विचारू शकत नाही. कारण त्यांना डोकेच नाही. डोके असते आणि डोक्याचा वापर कसा करायचा हे माहिती असते, तर सिद्धरामय्या सरकारने असा बिनडोक निर्णय घेतलाच नसता.

कर्नाटकपाठोपाठ इतर काँग्रेसशासित राज्यांमध्ये असे निर्णय भविष्यात होण्याची शक्यता दिसते. काँग्रेसच्या नेतृत्वाच्या डोळ्यांत संघ खुपतो. देशातील राष्ट्रभक्त जनतेला संघाबद्दल काय वाटते, यापेक्षा काँग्रेसच्या राष्ट्रीय नेतृत्वाला संघाबद्दल काय वाटते, हे त्यांच्या वतीने राज्य सांभाळणाऱ्यांसाठी महत्त्वाचे आहे. देशातील जनतेच्या संयमाची आणि सहनशीलतेची परीक्षा पाहणारे असे निर्णय घेत काँग्रेस नेतृत्वाच्या गुडबुकमध्ये राहताना आपण देशातील जनतेच्या बॅडबुकमध्ये चाललो आहोत, याचे भान काँग्रेसच्या नेत्यांनी ठेवले पाहिजे. अशाच बंदीच्या हव्यासाने काँग्रेसला रसातळाला पोहोचविले, हेही त्यांनी लक्षात ठेवले पाहिजे. डोके असेल तर ते ताळ्यावर आणावे आणि नसेलच तर कुणाचाच इलाज नाही!

## यंगिस्तान

# सोशल मीडियावरील झुंडशाही

**जयेश शत्रुघ्न मेस्त्री**

हनुमान जेव्हा समुद्र उल्लंघन करत होता तेव्हा सिंहिका नावाची राक्षसी त्याला गिळण्याचा प्रयत्न करू लागली. हनुमान तिच्यावर इतका जोराचा मुष्टिप्रहार करतो की लगेच मरते. पुढे सुरसा नावाची राक्षसी त्याच्यासमोर उभी राहते. त्याला गिळण्याचा प्रयत्न करते. तर हनुमान आपला आकार तिच्या तोंडापेक्षा मोठा करतो. हे पाहून सुरसा हनुमंतापेक्षा दुप्पट आकाराचा जबडा करते. पुन्हा हनुमान मोठा होतो तर सुरमा आपला जबडा त्याच्यापेक्षा मोठा करते. हनुमानाला कळतं की आपण कितीही मोठा आकार केला तरी ती त्याच्या दुप्पट आकार मोठा करेल. मग हनुमान आपला आकार लहान करतो आणि तोंडात प्रवेश करून दुसऱ्या मार्गाने बाहेर पडतो. मग सुरसासमोर हात जोडून उभा राहतो आणि रामकार्यासाठी चाललो आहे, मला जाण्याची अनुमती दे, अशी विनवणी करतो. सुरसाला हनुमानाचा नम्रपणा आवडतो. ती त्याला जाऊ देते. याच प्रवासात मेरु पर्वत जेव्हा प्रकट होऊन हनुमानाला विश्रांती करण्याची विनंती करतो तेव्हा हनुमान विनम्रपणे विश्रांती घेण्यास नकार देतो आणि म्हणतो की, 'रामकार्यासाठी जात आहे, या कार्यात विश्रांती कसा घेऊ?' पण आपण आपल्या या दैवताकडून काही शिकतो की नाही असा प्रश्न आहे. सोशल मीडियाच्या युगात, एखादी घटना घडली की ती लगेच व्हायरल होते. लोकांच्या प्रतिक्रिया येतात, चर्चा होतात आणि कधीकधी ते ट्रोलिंगमध्ये रूपांतरित होते. अलिकडेच 'कौन बनेगा करोडपती' या लोकप्रिय कार्यक्रमात एक दहा वर्षांचा मुलगा आला होता. तो कार्यक्रमात अमिताभ बच्चन यांच्याशी बोलताना उद्धटपणे वागत होता. बच्चन साहेब बोलण्याआधीच त्यांचं वाक्य कापत तो मध्येच बोलत होता. मला रुल्स वगैरे समजवू नका असेही म्हणाला. या मुलाने सर्वांचंच लक्ष वेधून घेतलं, पण नकारात्मकदृष्ट्या. पण अमिताभ बच्चन यांनी ही परिस्थिती अतिशय शांतपणे आणि प्रेमळपणे हाताळली. सोशल मीडियावर या मुलाला आणि त्याच्या पालकांना ट्रोल करण्यात आले. गलिच्छ कमेंट्स, अपमानास्पद भाषा वापरण्यात आली. त्याच्या पालकांच्या संस्कारांवर प्रश्न उपस्थित केले गेले. मात्र ट्रोल करताना काही लोकांनी मुलासाठी अपशब्द वापरले. काही लोकांनी तर अतिशय गलिच्छ टीका केली. इतकेच नव्हे, तर पालकांनाही ट्रोल केले गेले. त्यांच्या संस्कारांवर प्रश्न उपस्थित केले. कदाचित पालकांची चूक असेल. मुलगा उद्धटपणे बोलत असताना ते हसत होते. कदाचित त्यांना त्याच्या आत्मविश्वासाचा अभिमान वाटत असेल. अनेक गोष्टी यात असू शकतात. सोशल मीडियावर प्रसिद्ध संगीतकार कौशल इनामदार यांनी एक महत्त्वाचा मुद्दा मांडला आहे. त्यांनी सोशल मीडियावर पोस्ट करून म्हटले की, 'या मुलाला तीव्र असा एडीएचडी (अटेन्शन डेफिसिट हायपरॲक्टिव्हिटी डिसऑर्डर) असू शकतो.' एडीएचडी ही एक अशी मानसिक समस्या आहे, ज्यात मुले अतिउत्साही, आवेगपूर्ण वागतात आणि बऱ्याचदा त्यांच्यात एकाग्रता कमी असल्याचे दिसून येते. खरं पाहता अशा मुलांना समजून घेणे गरजेचे असते, ट्रोल करणे नव्हे. अमिताभ बच्चन यांनी त्या मुलाला अतिशय योग्य प्रकारे हाताळले, ज्यामुळे मुलाच्या मनावर नकारात्मक परिणाम झाला नाही. पण सोशल मीडियावर ट्रोलर्सनी याचा विचार केला नाही. ते फक्त मजा घेण्यात व्यस्त होते. खरंच, एडीएचडीसारख्या स्थितीचा विचार करणे महत्त्वाचे आहे. आजकाल अनेक मुले या विकाराने प्रभावित असतात. त्यांना औषधे, थेरपी आणि प्रेमाची गरज असते. ट्रोलिंगमुळे त्यांचे मानसिक स्वास्थ्य बिघडू शकते. मी मुलांना बालनाट्याचे प्रशिक्षण देत असल्यामुळे अनेक मुलांना मी भेटत असतो. त्यामुळे अशी आगाऊ मुलं मी खूप पाहिली आहेत. पण पूर्णपणे दोष हा त्या मुलांचा किंवा पालकांचा नसतो. आजची जीवनशैलीच तशी झाली आहे. आपण भारतीय मूल्यांपासून, आपल्या मूलभूत संस्कारापासून दूर जात आहोत. त्यामुळे अशा समस्या समाजात पुढे आणखी पाहायला मिळणार आहेत. मात्र लहान मुलांना ट्रोल करताना भाषेचा स्तर राखणे आवश्यक आहे. तो फक्त दहा वर्षांचा आहे. त्याच्या मनात कदाचित काही वेगळे चालले असेल. त्याला ते सांगता येत नसेल. दुसरी गोष्ट प्रत्येकाच्या घरात लहान मुले असतात. त्यांची मुले कधीच उद्धट वागत नाहीत का? कधीच चुकीचे बोलत नाहीत का? आणि उद्या या ट्रोलर्सची मुले त्यांना एकटे सोडून परदेशात जाणार नाहीत, याची हमी देता येणार आहे का? मग दुसऱ्यांच्या संस्कारांवर का बोलायचे? लक्षात घ्या, हे ट्रोलिंग केवळ या एका घटनेपुरते मर्यादित नाही. सोशल मीडिया ट्रोलर्स कशावरही भाष्य करतात. उदाहरण घ्यायचे तर गायक राहुल देशपांडे यांना वैवाहिक जीवनात घटस्फोट घ्यावा लागला आणि हा अनुभव त्यांनी सोशल मीडियावर शेअर केला. त्यानंतर त्यांच्यावर प्रचंड टीका झाली. लोकांनी त्यांच्या वैयक्तिक जीवनावर कमेंट्स केल्या, अपमान केले. '१७ वर्षांच्या नात्यानंतर घटस्फोट? काय संस्कार?' अशा प्रकारच्या प्रतिक्रिया आल्या. पण वैयक्तिक आयुष्य हे वैयक्तिक असते. अर्थात हा अनुभव सोशल मीडियावर का शेअर केला, असाही प्रश्न उपस्थित होऊ शकतो. पण ही चावडी झाली आहे. आता प्रश्न असा आहे की, हे ट्रोलिंग का होते? त्यामागे काय कारणे आहेत? सोशल मीडियावर अनेक खाते बनवता येतात आणि मग या फेक प्रोफाईल्सवरून अपमानास्पद कमेंट्स करणे सोपे जाते. दुसरे म्हणजे, समूहाची मानसिकता. म्हणजेच झुंडीचे मानसशास्त्र. एखादी पोस्ट व्हायरल झाली की, लोक त्यावर कमेंट करतात आणि जणू एक लाट पसरते. नव्हे त्सुनामीच येते. तुम्ही जर व्यक्त झाला नाहीत तर हा मोठा गुन्हाच ठरणार आहे जणू. तुम्ही मत व्यक्त केले नाही तर कुणी तुम्हाला शिक्षाच करणार आहे जणू. तिसरे म्हणजे, स्वतःच्या अपयशाचे खापर दुसऱ्यावर फोडणे, ही मानसिकता असते. ट्रोलर्स बहुतेक वेळा स्वतःच्या जीवनात असमाधानी असतात, म्हणून दुसऱ्यांना खाली खेचण्याचा प्रयत्न करतात. पण याचे परिणाम काय? विशेषतः लहान मुलांसाठी... ट्रोलिंगमुळे मुले नैराश्यग्रस्त होऊ शकतात, त्यांचा आत्मविश्वास कमी होऊ शकतो. काही लोकांनी त्या मुलाला समर्थनही दिले. 'तो फक्त एक लहान मुलगा आहे, त्याला ट्रोल करू नका.' असेही काही लोक म्हणाले. हा समंजसपणा हवा. लहान मूल आहे. चुका करायला आणि सुधारायला खूप वाव आहे, हे जास्त महत्त्वाचं. आपण मोठी माणसं काय प्रभू रामचंद्रांप्रमाणे आदर्श जीवन जगत आहोत काय? आपण नाही का चुका करत? समाज म्हणून आपण काय करू शकतो हे पाहिलं पाहिजे. सर्वप्रथम, सोशल मीडियावर संयम बाळगणे. एखादी घटना पाहिली की लगेच कमेंट करू नये. विचार करावा की, हे लहान मूल आहे, त्याच्या मागे काही कारण असू शकते. दुसरे, पालकांनी मुलांना शिष्टाचार शिकवणे. तिसरे, एडीएचडीसारख्या विकारांबाबत जागरूकता वाढवणे. चौथे, कायद्याने ट्रोलिंगवर नियंत्रण ठेवणे. भारतात सायबर कायदे आहेत, पण त्यांची अंमलबजावणी कठोर करणे गरजेचे आहे.

हे लक्षात घेतले पाहिजे की, प्रत्येक मूल महत्त्वाचे आहे. त्याच्याकडून चुका होत असतील, पण ट्रोलिंग हे उत्तर नाही. अमिताभ बच्चन यांच्यासारखा वयोवृद्ध आणि प्रचंड यशस्वी माणूस जर संयम ठेवू शकतो तर आपण खूप लहान आहोत. हनुमंत हा आपला देव आहे. त्याच्याकडूनही आपण शिकलं पाहिजे की कोणत्या प्रकरणात तलवार उचलायची, कोणत्या प्रकरणात छडीचा वापर करायचा आणि कधी संयमाने, प्रेमाने गोष्टी हाताळायच्या. सोशल मीडियावरील या झुंडशाहीला आवर घालायलाच हवा.

writerjayeshmestry@gmail.com

## वेध

**हेमंत सालोडकर**

# रात्रीही राहणार गुन्हेगारांवर नजर

गणेशोत्सवापासून दिवाळीपर्यंत दोन-तीन महिने सतत सण-उत्सवाचे वातावरण असते. लोकांमध्ये वेगळाच उत्साह असतो. प्रत्येकाच्या घरात चैतन्य पसरलेले असते. बाजारपेठाही वस्तू, खाद्यपदार्थांनी सजलेल्या असतात. कपडे, वस्तू, खाद्यपदार्थ घेण्यासाठी लोकांची घाई चाललेली असते. त्यासाठी बाजारात, रस्त्यांवर आबालवृद्ध मोठ्या संख्येने बाहेर निघतात. सण म्हटला की, महिलांमध्ये तर वेगळाच उत्साह संचारलेला असतो. तसाही प्रत्येक सण महिलांसाठी खास असतो. दिवाळीला कपडे, दागिन्यांची खरेदी मोठ्या प्रमाणात केली जाते. बाजारात जाताना जवळच बक्कळ पैसे असतात. अशावेळी गुन्हेगार सक्रिय होतात आणि हात साफ करून जातात. सण-उत्सवांशिवाय इतरही काळात गुन्हेगार सक्रिय राहतातच. मग अशा गुन्हेगारांना वठणीवर आणण्यासाठी पोलिसांना आपला खाक्या दाखवावा लागतो. त्यासाठी वेगवेगळे प्रयोग करावे लागतात. त्यातही काही सराईत गुन्हेगार असतात. त्यांच्यासाठी तर विशेष उपाययोजना आखाव्या लागतात. गुन्हेगारांच्या टोळ्यांसाठी खास उपाय योजले जातात. दिवसाचे गुन्हे करणारे वेगळे, रात्रीचे वेगळे अशा गुन्हेगारांसाठी मग पोलिस कंबर कसतात आणि त्यांना ताळ्यावर आणण्यासाठी गनिमी कावा वापरण्यात येतो. नागपुरात तर पोलिस आयुक्त डॉ. रवींद्रकुमार सिंगल यांनी गुन्हेगारांसाठी खास 'उपचार' शोधले आहेत. रात्रीच्या वेळी होणारे गुन्हे लक्षात घेता नागपुरातील परिमंडळ चारमध्ये 'मिशन नाईट वॉच' ही विशेष मोहीम सुरू करण्यात आली. या मोहिमेअंतर्गत नियमांचे उल्लंघन करणाऱ्या २१७ ढाबे-हॉटेल्स मालकांवर मागील महिनाभरात कारवाई करण्यात आली. मुदतीपेक्षा जास्त वेळ बार सुरू राहणे किंवा दारूची विक्री करणे या प्रकरणांत या कारवाया झाल्या. विशेष म्हणजे ही मोहीम पोलिस उपायुक्त रश्मिता राव यांनी राबविली. रात्रीच्या वेळेस होणाऱ्या घरफोडी व गैरप्रकारांवर आळा बसावा यासाठी ३० ऑगस्टपासून 'मिशन नाईट वॉच' ही मोहीम सुरू झाली. यासाठी परिमंडळ स्तरावर व्हॉट्सॲप ग्रुप तयार करण्यात आला. त्यात सर्व पोलिस ठाण्यांचे ठाणेदार व दोन कर्मचारी होते. प्रत्येक ठाण्यातील रात्रपाळीतील अधिकाऱ्यांना दररोज त्यात समाविष्ट करून दुसऱ्या दिवशी काढण्यात येत होते. याअंतर्गत रात्री अधिकारी, कर्मचारी मुदत संपल्यावरदेखील सुरू असलेले आस्थापना बंद करणे, आरोपींच्या घराची झडती घेणे, घरफोडीच्या ठिकाणी सायरनसह पेट्रोलिंग करणे असे उपक्रम करत आहेत. विशेष म्हणजे कर्तव्यावरील अधिकाऱ्यांना नियोजित ठिकाणावरून फोटोदेखील टाकावे लागतात. सूचनांप्रमाणे कारवाई न करणाऱ्या अधिकाऱ्यांना लेखी खुलासादेखील मागविण्यात येत आहे. दररोजच्या कारवाईचा अहवाल सकाळी १० वाजेपर्यंत तयारदेखील होतो. या मोहिमेअंतर्गत पोलिसांनी सर्व पोलिस ठाण्यांच्या हद्दीतील घरफोडी व वाहनचोरीची ठिकाणे निश्चित केले. त्याआधारे क्राईम मॅपिंगवर भर देण्यात आला. विशेष म्हणजे एकटे राहणाऱ्या ज्येष्ठ नागरिकांच्या वास्तव्याच्या ठिकाणी क्यूआर कोड लावण्यात आले असून बिट मार्शल्सद्वारा त्यांचे पंचिंग केले जाते. मोहीम राबविताना कर्मचारी आणि अधिकाऱ्यांसाठी काही सूचना करण्यात आल्या आहेत. आस्थापना तपासून कारवाई, घरफोडीच्या रेकॉर्डवरील आरोपींची तपासणी, सायरन पेट्रोलिंग व संशयितांची तपासणी आणि गुडमॉर्निंग पेट्रोलिंग असा हा क्रम आहे. त्यामुळे गुन्हेगारांना आता गुन्हे करताना दहावेळा विचार करावा लागेल. नागपूर जिल्ह्यात मध्यप्रदेशातून प्रवेश करताना दारू वाहतूक करणे, गोवंश तस्करीचे प्रमाणही वाढले होते. त्यावर अशा कारवायांमुळे आता बऱ्याच प्रमाणात चाप बसला आहे. 'मिशन नाईट वॉच' ही मोहीम सुरू झाल्यावर ऑगस्टच्या तुलनेत सप्टेंबरमध्ये घरफोडीच्या गुन्ह्यांमध्ये मोठ्या प्रमाणात घट झाली आहे.

राज्य सरकारने नक्षलवाद संपवण्याचा संकल्प केला तसेच राज्यातील आणि नागपूर शहरातील गुन्हेगारी संपवण्याचा विडा उचलला आहे. याचा परिणाम म्हणून पोलिस सक्रिय झाले आणि त्यांनी गुन्हेगारांना धाक वाटावा अशी कारवाई सुरू केली आहे. आता भविष्यात गुन्हेगारांना कोणताही गुन्हा करताना पहिले पोलिस आठवतील अशीच ही 'मिशन नाईट वॉच' ही मोहीम आहे. सण, उत्सवाच्या काळातच नव्हे तर नेहमीसाठी ही मोहीम सुरू राहावी, ही अपेक्षा.

९८५०७५३२८१

## मुंबई वार्तापत्र

# अडाण्यांचा धिंगाणा!

**नागेश दाचेवार**

यांना संविधान कळत नाही, कायदा कळत नाही, संवैधानिक रचना कळत नाही, निवडणूक प्रक्रिया कळत नाही, मतदारयाद्यांची व्यवस्था समजत नाही, राज्याचे-केंद्राचे अधिकार समजत नाहीत, केंद्र आणि राज्य सूचीतले अंतर समजत नाही, न्यायिक प्रक्रिया कळत नाही, प्रचलित कायद्याने केली जाणारी प्रक्रिया यांना उमजत नाही, निव्वळ तमाशा करणे आणि धिंगाणा घालणे तेवढे बरोबर कळते, बावळटपणाची मुजोरी करणे यांना चांगले जमते!.. याला केवळ अडाण्यांचा धिंगाणा तेवढे म्हणता येईल.

आता विरोध करायला आणि राजकारण करायला काही मिळालं नाही म्हणून विरोधक मतचोरीचा मुद्दा चघळताना दिसत आहेत. मतदारयादी सदोष असल्याचा डांगोरा पिटणाऱ्या या विरोधकांना लोकसभेच्या निवडणुकीत महाराष्ट्रात निर्विवाद यश मिळाले होते. तेव्हा यांनी या यादीवर आक्षेप नोंदविला नाही. मात्र, त्याच यादीतील लोकांनी विधानसभेत जेव्हा यांना अस्मान दाखवले तेव्हा मात्र, यांना सदोष आणि निदोष याद्या, मतचोरी वगैरे कळू लागले. विरोधकांना ट्रम्पचे आधार कसे काढता येते, एकाच घरात अनेकांचे मतदान असल्याचे कळले, एका व्यक्तीचे चार-चार ठिकाणी नाव असल्याचे कळले, एकाच व्यक्तीने दोन-दोन ठिकाणी मतदान केल्याचे यांना कळले. मात्र, मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र यांची भूमिका आणि राज्य निवडणूक आयोगाची भूमिका काय असते एवढे नाही कळले. खरे तर, केंद्रीय आणि राज्य आयोगाच्या अधिकारांची विभागणी केलेली असते. ही बाब एवढे वर्षे सत्तेत आणि ५० वर्षे राजकारणात राहिलेल्या शरद पवारांसारख्या स्वतःला महाराष्ट्रातल्या राजकारणातला चाणक्य म्हणवून घेणाऱ्या, मुख्यमंत्रिपदावर राहिलेल्या ठाकरे आणि काँग्रेससारख्या राष्ट्रीय पातळीवरील मोठ्या पक्षाच्या मोठ्या नेत्यांना कळली नाही, याचे आश्चर्य वाटते.

''भारतीय जनता पक्ष निवडणुका घ्यायला घाबरत आहे'' ते ''निवडणुका पुढे ढकला''पर्यंतचा मविआचा प्रामुख्याने उद्धव ठाकरेंचा, उबाठा नेत्यांचा थक्क करणारा प्रवास बघितल्यावर यांच्या जीवाची होत असलेली कालवाकालव लक्षात येते. ५-७ वर्षे निवडणुका घेतल्या नाहीत, अजून २-४



महिने निवडणुका पुढे ढकलल्या तर काय फरक पडणार आहे. मतदारयाद्या निर्दोष असायला हव्यात, त्याशिवाय निवडणुका घेणे ही लोकशाहीची थट्टा ठरेल वगैरे वगैरे मूर्खांचे तर्क लावताना हे लोक दिसत आहेत. यांना बेसिक नागरिकशास्त्र कळत नाही हे जेव्हा सिद्ध होते, तेव्हा मात्र खऱ्या अर्थाने लोकशाहीची थट्टा होत आहे असे म्हणता येईल. मात्र, सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानंतर आता निवडणुका होऊ घातल्या आहेत. त्यामुळे आता त्या दोन-चार महिने पुढे ढकलण्याचे अधिकार आता केंद्रीय निवडणूक आयोग असो किंवा राज्य कोणालाही नाही. सरकारी यंत्रणांना असे परस्पर निर्णय देखील घेता येत नाहीत. विरोधकांना संविधान मान्य नाही, संविधानाने स्थापित झालेल्या संवैधानिक संस्था ते मानत नाहीत. न्यायालये आणि त्याचे अधिकार मानत नाहीत. मात्र, हा देश संविधानाने, कायद्याने चालतो आणि येथील संवैधानिक संस्था, शासकीय कार्यालये आणि सामान्य नागरिक हे न्यायालयाचे निर्देश पाळतात. हेच सत्य आहे.

सर्वोच्च न्यायालयाने, आता अजून मुदत देणार नाही, काय ते ३१ जानेवारीपूर्वी एकदाचे सर्व संपवा, असे निर्देश दिले आहेत. हे दिलेले निर्देश शरद पवार, राज ठाकरे आणि उद्धव ठाकरेंना माहिती नाहीत? तरी जर मुदत वाढवून पाहिजे असेल तर यांनी सर्वोच्च न्यायालयात धाव घ्यावी. निवडणूक पुढे ढकलण्याचे निर्देश निवडणूक आयोगाला देण्याची विनंती सर्वोच्च न्यायालयाला करावी. ज्यांना अधिकारच नाहीत त्यांच्या दारावर जाऊन उगाच छाती बडवण्यात काय अर्थ? बरे एवढे करून भाजपा किंवा त्यांच्या सहकारी पक्षांचे काय वाकडे होणार आहे? राज्यात त्यांची सत्ता आहे. पुन्हा दोन-चार महिने या सर्व संस्थांवर एकछत्री सत्ता राबविता येईल त्यांना. मात्र, त्याचवेळी तुमचे काय? आजचे मरण उद्यावर जाईल, एवढेच. यातून केंद्र आणि राज्यात सत्तेबाहेर असताना किमान स्थानिक पातळीवर तरी आपल्या कार्यकर्त्यांना सत्ता मिळण्याची संधीदेखील हे लोक हिरावून घेत आहेत. मुळात काय तर, संजय राऊत, उद्धव ठाकरे आणि पूर्ण महाविकास आघाडीची पराभवाच्या भीतीने गाळण उडाली असून त्या निराशेतून असले प्रकार ते करत आहेत. यांचा दुटप्पी चेहरा आणि पितळ उघडे पडले आहे. कारण बिहारमध्ये मतदारयाद्यांत सुधारणा करण्यासाठी विशेष सुधारणा पडताळणी मोहीम (एसआयआर) राबविण्यात आली. त्याचा यांनी कडाडून विरोध केला. आणि महाराष्ट्रात तेच करण्याची मागणी करताना हे बाळबोध लोक दिसत आहेत. बरं हे करत असताना थेट एसआयआर करा असे देखील म्हणायला दचकत आहेत. काय ही केविलवाणी आणि दयनीय स्थिती विरोधकांची झाली आहे?

बरं यातली सर्वांत मोठी गंमत म्हणजे, ज्या माणसाचा एकही आमदार नाही, तो माणूस निवडणूक आयोगाकडे गेलेल्या मविआच्या शिष्टमंडाळाचा प्रमुख झाला. तो आयोगाच्या बैठकीत आयोगाला धारेवर धरतो, पत्रकार परिषदेत प्रमुख भूमिका मांडतो आणि विशेष म्हणजे मविआमध्ये याला घ्यायचे की नाही हे अद्याप ठरले नसताना, निर्णय झालेला नसताना, याचं घेणं-देणं नसताना तोच माणूस मविआचा चेहरा झाला, व्हॉईस झाला, फुटेज खाऊन गेला आणि हे लोक बावळटासारखे बघत बसले. मुळात आता निवडणुका समोर उभ्या ठाकल्या असून, यांच्या पायाखालची जमीन सरकू लागली आहे. दोन्ही ठाकरे एकत्र येऊनही यांना समोर पराभव दिसू लागला आहे. मुंबई महापालिका यांच्यासाठी सोन्याचं अंडं देणारी कोंबडी आहे. ती देखील हातची जात असल्याचे लक्षात आल्यामुळे, हे लोक आता भांबावले आहेत. केंद्र, राज्य आणि आता स्थानिक पातळीवरही सुपडा साफ झाला तर, कार्यकर्ते सांभाळणे कठीण होईल, अशा एक नव्हे अनेक समस्यांनी हे ग्रस्त झाल्याने असे अडाणीपणाचे धिंगाणे चालविले आहेत.

९२७०३३३८८६

### धन्वंतरी जयंती

धनत्रयोदशीच्या दिवशी धन्वंतरी जयंती सुद्धा असते. धन्वंतरी देवतेचा जन्म देव आणि दानव यांनी केलेल्या समुद्रमंथनांमधून झाला आहे. धन्वंतरी देवतेला चार हात असून तिच्या एका हातात अमृतकलश, दुसऱ्या हातात जळू, तिसऱ्या हातामध्ये शंख, चौथ्या हातामध्ये चक्र असते. या चारही गोष्टींचा उपयोग करून अनेक व्याधींना आणि रोगांना बरे केले जाते. धन्वंतरी देवता ही देवांचा वैद्य आहे. वैद्य मंडळी या दिवशी धन्वंतरी देवतेचे पूजन करतात. कडुलिंबाची पाने आणि साखर एकत्र करून त्याचा प्रसाद बनवला जातो आणि त्याचा नैवेद्य धन्वंतरी देवतेला दाखवला जातो. कडुलिंबाची पाच-सहा पाने रोज खाल्ली तर आरोग्य चांगले राहते.

**वैद्य प्रकाश जोशी**/ नागपूर

### खाद्यपदार्थ घेताना सतर्क राहा

दिवाळी हा आपला सर्वांत मोठा सण मानला जातो. देशभरात हा सण आनंदात आणि उत्साहात साजरा होतो. अनेक औद्योगिक उलाढाली या दिवसात होत असतात. त्यात कपडे, इलेक्ट्रिक, इलेक्ट्रॉनिक वस्तू, दागिने, अनेक प्रकारच्या भेटवस्तू याची देवाणघेवाण, खरेदी-विक्री होत असते. या सर्वांत अग्रक्रम लागतो तो खाद्यपदार्थांचा. त्यात चॉकलेटपासून तर मिठाई, खवा, पनीरसारख्या दुग्धजन्य पदार्थांच्या विक्रीवर जास्त भर असतो. त्यामुळे त्यात भेसळीची शक्यता वाढते.

सण महाराष्ट्राचा, संकल्प अन्नसुरक्षिततेचा या प्रशासनाने राबविलेल्या विशेष मोहिमेअंतर्गत पाहणी केली असता विविध अन्नपदार्थांचा मोठ्या प्रमाणावर साठा जप्त केल्याचे वृत्त समोर आले आहे. दिवाळीत निकृष्ट पदार्थांची विक्री केल्याचे आढळल्यास विक्रेत्यांवर कारवाई करण्याचा इशारा प्रशासनाने दिला आहे. परंतु ग्राहक म्हणून आपल्या आरोग्याबाबत आपण सजग होणे आवश्यक आहे. कुठलाही पदार्थ खरेदी करताना खाद्यपदार्थाच्या आवरणावर बेस्ट बीफोर तपासून अधिकृत विक्रेत्याकडून खरेदी करावी. त्याचे बिल घ्यावे आणि नाशवंत पदार्थांचा लवकर वापर करावा तसेच थंड ठिकाणी ठेवावे. ही सावधगिरी बाळगावी. काही अपाय झाला आणि विक्रेत्यांवर कारवाई झाली तरी आपल्या प्रकृतीची हानी कशी भरून काढणार? आजकाल घरोघरी उद्योजिका फराळाच्या पदार्थांची विक्री करतात. त्यांच्याकडून फराळ घेण्यावर भर द्यावा आणि काही त्रुटी असल्यास त्वरित त्यांना कळवावे.

**स्नेहल खंडागळे**/नागपूर

## वाचक पत्रे

### सोन्याच्या किमती किती वाढणार?

भारतामध्ये विशेषत: या महाराष्ट्रामध्ये सोन्याची किंमत गगनाला भिडली आहे. सोनं एवढं महाग कसं झाले हा संशोधनाचा विषय आहे परंतु गेल्या वर्षी १० ग्रॅम म्हणजेच १ तोळा पन्नास हजारावर होतं. ते आता या वेळेला एक लाख ३० हजारावर गेलं आहे. एवढं महाग सोनं कसं खरेदी करणार हा मोठा प्रश्न आहे. नुकताच सोनेरूपी दसरा हा सण येऊन गेला. पण खरेदी फार कमी प्रमाणात झाली.

परंतु आता दिवाळी, पाडवा येतोय. दिवाळीनंतर लग्नाचा हंगाम येतोय. तेव्हा लग्नाकरिता सोनं घेणं किती अवघड जाणार आहे हा मोठा प्रश्न आहे. लग्नात सोनं हा फारच महत्त्वाचा विषय असतो. सोन्याची देवाणघेवाण चालते. त्यावेळी मोठा प्रश्न निर्माण होणार आहे. भारतात काही राज्यांत सोन्याच्या खाणी आहेत असं कळतं. मग सोनं जातं कुठं? सरकार याकरिता काही करेल का आणि सोन्याचा भाव कमी होईल का?

**शिरीष बने**/९२२४२९९२३०

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास ९८५०७५३२८१
या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

## आजचे संघगीत-१६

शनिवार, १८ ऑक्टोबर २०२५

### असु अम्ही सुखाने पत्थर पायातील

असु अम्ही सुखाने पत्थर पायातील
मंदीर उभविणे हेच आमुचे शील ॥धृ.॥

आम्हास नको मुळी मान मरातब काही
कीर्तीची आम्हा हाव मुळीही नाही
सर्वस्व अर्पिले मातृभूमिचे ठायी
हे दैवत अमुचे ध्येयमंदिरातील ॥१॥

वृक्षांच्या शाखा उंच नभांतरि जावो
विश्रांतिसुखाते विहगवृंद वरि घेवो
जरि देईल टकरा नाग बलाने देवो
करु अमर पाजुनी रस पाताळातील ॥२॥

जरि असले अमुचे रूपहि ओंगळवाणे
सोसून टाकिचे घाव बदलवू जिणे
गुणसुमने आम्ही विकसित करु यत्नाने
पावित्र्ये जीवन का न होइ तेजाळ ॥३॥

**गीत - म. द. उपाख्य बापू महाशब्दे**

# जिल्हा परिषदेत कामचुकार कर्मचाऱ्यांची होणार गोची

## झेडपीच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांना ओळखपत्र बंधनकारक



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ ऑक्टोबर-**

जिल्हा परिषदेच्या कार्यालयातील कर्मचाऱ्यांचा कामकाज म्हणजे 'आओ जायो घर तुम्हारा' असल्यासारखे आहे. अधिकारी व कर्मचारी कार्यालयीन वेळेत कार्यालय सोडून अन्यत्र फिरताना दिसतात. त्यांच्याकडे ओळखपत्र नसल्याने त्यांना ओळखणे मुश्कील होते. नागरीक व लाभार्थी कामासाठी कार्यालयात वारंवार चकरा मारल्यानंतरही अधिकारी व कर्मचारी यांची भेट होत नाही.

याबाबत अनेक संघटना व नागरीकांनी तक्रार केल्यावर सुधारणा झाली नाही. त्यामुळे शासनाने परिपत्रक काढून अधिकारी व कर्मचारी यांच्या प्रथमदर्शनी भागात ओळखपत्र सक्तीचे आणि बंधनकारक केले आहे. त्यामुळे कामचुकार कर्मचाऱ्यांवर कारवाई होणार असल्याचे सांगण्यात येते. शासकीय कार्यालयांत नागरिकांना अनेकदा अधिकारी आणि कर्मचाऱ्यांची ओळख पटत नाही. तसेच कर्मचारी भासवून खासगी व्यक्तींचीही लुडबूड सुरू असते. यामुळे अनेक गैरप्रकार आणि वादही होतात. या पार्श्वभूमीवर जिल्हा परिषद, पंचायत समिती, ग्रामपंचायत कार्यालयातील शासकीय अधिकारी-कर्मचाऱ्यांनी दर्शनी भागावर ओळखपत्र न लावल्यास शिस्तभंगाची थेट कारवाई करण्यात येणार आहे. त्यासंदर्भातील परिपत्रक शासनाने जिल्हा परिषदेच्या सामान्य प्रशासन विभागाला पाठविले आहे.

### ओळखपत्र नसल्यास शिस्तभंगाची कारवाई

जिल्हा परिषद मुख्यालयातील अधिकारी, कर्मचारी, पंचायत समिती, ग्रामपंचायत कार्यालय, पंचायत समिती व जिल्हा परिषद अंतर्गत येत असलेल्या सर्वच शासकीय कार्यालयातील अधिकारी, कर्मचारी यांनी ओळखपत्रे लावणे बंधनकारक आहे. न लावल्यास शिस्तभंगाची कारवाई करण्यात येणार आहे.

**- स्मिता पाटील**
**उपमुख्य कार्यकारी अधिकारी सामान्य प्रशासन प्रशासन, जिल्हा परिषद**

### कामचुकार कर्मचाऱ्यांमध्ये येणार शिस्त

जिल्हा परिषदेचे अनेक अधिकारी व कर्मचारी कार्यालय सोडून ओळखपत्र खिशात ठेऊन अन्यत्र फिरत असतात. त्यामुळे लाभार्थी व नागरीकांची गैरसोय होते. या निर्णयामुळे कामचुकार कर्मचाऱ्यांना शिस्त लागण्यास मदत होणार आहे. तसेच त्यांच्यावर इतर लोकांचाही नजर असणार आहे.

**- सचिन व्हनमाने,**
**तालुका कार्याध्यक्ष, युवक काँग्रेस दक्षिण सोलापूर**

जिल्हा परिषदेचे एकूण कर्मचारी... ११,४१९
जिल्हा परिषदेचे गट अ अधिकारी ..... १३
जिल्हा परिषदेचे गट ब अधिकारी....... १३

दरम्यान, अधिकारी किंवा कर्मचाऱ्याने ओळखपत्र घातल्यास कार्यालयात काम करणारा कर्मचारी कोण आहे? हे नागरिकांना कळते. कर्मचारी आणि अधिकाऱ्यांमध्ये शिस्तीचे दर्शन घडते, शासकीय कार्यालयांमध्ये सुरक्षितता राखली जाते. शासनाने पारदर्शकता, आणि शिस्त व सुरक्षितता वाढवण्यासाठी हा नियम केल्याचे सांगण्यात येत आहे. या निर्णयाची जबाबदारी कार्यालय प्रमुख व विभागप्रमुखांवर असणार आहे, यापूर्वीही शासनाने २०१४ व २०२३मध्ये असेच परिपत्रक काढले होते. मात्र त्याची अंमलबजावणी न झाल्याने पुन्हा नव्याने आदेश काढण्यात आला आहे.

## महत्वाचे...



### विश्व हिंदू परिषदेतर्फे वसुबारसनिमित्त गो-पूजन

**सोलापूर,दि.१७ ऑक्टोबर-**

विश्व हिंदू परिषदेच्या वतीने दिपावलीपर्वातील वुसबारसेनिमित्त विजापूर रोडवरील इंचिगिरी मठात अमेरिकास्थित येथील टी.आर. चिप्पा यांच्या हस्ते गो-पूजन करण्यात आले. इंचगिरी अध्यात्म संप्रदयाच्या विद्यमाने झालेल्या गो-वत्स पूजन करण्यात आले. यावेळी मठाच्या प्रमुख हभप पुष्पलता ताई महाराज, डॉ. माधुरी पारपल्लीवार, राजेश वाडीशेरला, रेवणसिद्ध व्हानमराठे, श्री रेड्डी, विश्व हिंदू परिषेदेचे जिल्हाध्यक्ष हभप अभिमन्यु डोंगरे महाराज, यादगिरी महाराज, राजेश यनगंटी, डॉ. उमाशंकर कुंभारे, जयदेव सुरवसे, अविनाश माने, चन्नबसवेश्वर सोलापूरे, रमेश बेंबळकर, चंद्रकांत कुलकर्णी उपस्थित होते.



### महाराष्ट्र स्टेट उर्दू साहित्य अकादमीतर्फे इलियास शेख यांना आदर्श उर्दू शिक्षक पुरस्कार

**सोलापूर, दि. १७ ऑक्टोबर-**

एम. ए. पांगल अँग्लो उर्दू हायस्कूल व ज्युनियर कॉलेजमधील नामांकित विज्ञान व उर्दू विषयाचे प्रखर वक्ते शिक्षक इलियास अब्दुल लतीफ शेख यांना महाराष्ट्र स्टेट उर्दू साहित्य अकादमी मुंबईतर्फे नामांकित उर्दू पत्रकार शुऐब हाशमी यांच्या हस्ते शालेय स्तरावरील 'आदर्श उर्दू शिक्षक पुरस्कार' प्रदान करण्यात आला. शेख यांना उर्दू साहित्य अकादमी पुरस्कार मिळाल्याबद्दल जिल्हा परिषद विस्तार अधिकारी अतहर परवेज दफेदार, माझी सुपरवायझर मुमताज शेख, म ाजी केंद्रप्रमुख मौलाली लोकापल्ली, माजी मुख्याध्यापक युसुफ शेख, संस्थेचे मुख्याध्यापक डॉ. हारून रशीद बागबान, उपमुख्याध्यापिका सुरैया जागीर यांनी त्यांचे अभिनंदन केले.



### हिंगुलांबिका शाळेत वस्तूंचे प्रदर्शन

**सोलापूर, दि. १७ ऑक्टोबर-**

साखर पेठ येथील बाहुसार शिक्षण प्रसारक मंडळ संचलित हिंगुलांबिका प्राथमिक शाळेत दिवाळीनिमित्त कला व कार्यानुभव विषयांतर्गत विविध वस्तूंच्या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आलेले होते. या कार्यशाळेत विद्यार्थ्यांनी पणती, आकाश कंदील, ग्रीटिंग कार्ड, किल्ले, विविध चित्रे, मातीच्या विविध वस्तू, फुलदाणी व घरातील सजावटीच्या विविध वस्तू तयार करण्यात आले. या तयार केलेल्या वस्तूंचे प्रदर्शन भरविण्यात आले. या वस्तू प्रदर्शनाचे उद्घाटन संस्थेचे अध्यक्ष बापू ढगे व विद्यानिकेतन प्रशालेचे मुख्याध्यापक गोपी नवले, पर्यवेक्षक शंकरगिरी गिरी यांच्या हस्ते करण्यात आले. यामध्ये ५०० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. शेवटी सर्व विद्यार्थ्यांना गोड खाऊ वाटप करण्यात आले.

### नवऱ्याला ठार मारण्याची धमकी देऊन विवाहितेवर अत्याचार; गुन्हा दाखल

**सोलापूर, दि. १७ ऑक्टोबर -**

नवऱ्याला ठार मारण्याची धमकी देऊन विवाहितेवर अत्याचार करणाऱ्याविरुध्द एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत पिडीत महिलेच्या फिर्यादीवरुन ऋषि पाणीभाते (रा. स्वागत नगर, कुमठा नाका, सोलापूर) याच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यातील पिडीता व ऋषि पाणीभाते यांची ओळख असून आपल्याला आर्थिक अडचण असल्याचे सांगून ऋषि याने पिडीतेस सांगितले होते. त्यावेळी पिडीतेने ऋषि यास रोख ३ लाख रुपये, पिडीतेचा सोन्याचा नेकलेस व मंगळसूत्रे असे दागिने देऊन मदत केली होती. या व्यवहारानिमित्त ऋषि हा पिडीतेच्या घरी येत-जात होता. ऑगस्ट २०२४ ते सप्टेंबर २०२५ ऋषि याने पिडीतेच्या घरी येऊन तु मला आवडतेस असे म्हणून तिच्याशी जवळीक साधत पिडीतेचा नकार झुगारून तिच्याशी जबरदस्तीने शरीरसंबंध केले. तसेच याबाबत कुणाला काही सांगितले तर पिडीता व तिच्या नवऱ्यास ठार मारण्याची धमकी दिली. म्हणून एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस निरीक्षक वाघमारे पुढील तपास करीत आहेत.

### जावयाला मारहाण करणाऱ्या सासऱ्यासह पाचजणांवर गुन्हा दाखल

**सोलापूर, दि. १७ ऑक्टोबर -**

जावयाला मारहाण करणाऱ्या सासऱ्यासह पाचजणांवर फौजदार चावडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत पुष्पा अशोक कांबळे (रा. उमा नगरी, मुरारजी पेठ) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून प्रभाकर भालेकर, अनिता भालेकर, सुधाकर भालेकर, अलका भालेकर, समीक्षाचे चुलत भाऊ (रा. सोलापूर) यांच्याविरुध्द गुन्हा दाखल झाला आहे. १५ ऑक्टोंबर पुष्पा कांबळे या राहत्या घरी असताना त्यांचा मुलगा व सून यांच्यात वाद सुरु होता. त्यावेळी पुष्पा कांबळे यांच्या सुनेने बेडरूम बंद करून आत गेली असता मुलाने दरवाजा लाथ मारून उघडला. त्यामुळे कांबळे यांच्या सुनेने तिच्या वडीलांना व नातेवाईकांना फोन करून बोलावून घेतले. सुनेच्या वडीलांनी जावयास शिवीगाळ करून लाथाबुक्क्यांनी मारहाण करून त्यास जखमी केले. आहे. स. पोलिस निरीक्षक चंदनशिवे पुढील तपास करीत आहेत.




**मध्य रेल्वे तर्फे**
**दिवाळी आणि छठ पूजा २०२५ साठी विशेष रेल्वे सेवा चालविण्यात येत आहे**

| ट्रेन क्र. | स्टेशन | | तारीख | | दिवस | फेऱ्या |
|---|---|---|---|---|---|---|
| | पासून | पर्यंत | पासून | पर्यंत | | |
| ०१००८ | लातूर | लोकमान्य टिळक ट. | २८.०९.२०२५ | ३०.११.२०२५ | रविवार | १० |
| ०१४२९ | लातूर | हडपसर | २६.०९.२०२५ | २८.११.२०२५ | सोमवार, मंगळवार, बुधवार, शुक्रवार | ३७ |

विशेष ट्रेनचे बुकिंग सर्व संगणकीकृत आरक्षण केंद्रांवर आणि www.irctc.co.in या वेबसाइटवर आधीच सुरू झाले आहे.
तपशीलवार वेळापत्रक आणि थांब्यांविषयी माहितीसाठी, प्रवासी कृपया www.enquiry.indianrail.gov.in ला भेट देऊ शकतात किंवा एनटीईएस ॲप डाउनलोड करू शकतात.
मध्य रेल्वे
www.cr.indianrailways.gov.in
centralrailwayindia Central_Railway
तिकिटांसाठी UTS ॲप डाउनलोड करा
AK-556



**मध्य रेल्वे तर्फे**
**दिवाळी आणि छठ पूजा २०२५ साठी विशेष रेल्वे सेवा चालविण्यात येत आहे**

| ट्रेन क्र. | स्टेशन | | तारीख | | दिवस | फेऱ्या |
|---|---|---|---|---|---|---|
| | पासून | पर्यंत | पासून | पर्यंत | | |
| ०१४१८ | छत्रपती शाहू महाराज ट. | छत्रपती शिवाजी महाराज ट. | २४.०९.२०२५ | २६.११.२०२५ | बुधवार | १० |
| ०१४५१ | छत्रपती शाहू महाराज ट. | कलबुरगि | २४.०९.२०२५ | ३०.११.२०२५ | सोमवार, मंगळवार, बुधवार, गुरुवार, शनिवार, रविवार | ५८ |

विशेष ट्रेनचे बुकिंग सर्व संगणकीकृत आरक्षण केंद्रांवर आणि www.irctc.co.in या वेबसाइटवर आधीच सुरू झाले आहे.
तपशीलवार वेळापत्रक आणि थांब्यांविषयी माहितीसाठी, प्रवासी कृपया www.enquiry.indianrail.gov.in ला भेट देऊ शकतात किंवा एनटीईएस ॲप डाउनलोड करू शकतात.
मध्य रेल्वे
www.cr.indianrailways.gov.in
centralrailwayindia Central_Railway
तिकिटांसाठी UTS ॲप डाउनलोड करा
AK-555


### जाहीर प्रसिध्दीकरण

दि. किरकोळ अर्ज-०१/२०२५
नि.नं. ८

**बार्शी येथील मा. दिवाणी न्यायाधिश सो. व स्तर यांचे न्यायालयात**

१) श्रीमती अनिता भ्र. हनुमंत शिंदे
वय-५४ वर्षे, धंदा-शेती व घरकाम,
रा.नारी, ता. बार्शी जि.सोलापूर
२) सौ. विद्या भ्र. ज्ञानेश्वर चव्हाण
वय ३३ वर्षे, धंदा- शेती व घरकाम, **-- अर्जदार**
रा. बार्शी ता. बार्शी जि. सोलापूर
३) सौ. सुप्रिया भ्र. संदीप लोमटे
वय ३५ वर्षे, धंदा शेती व घरकाम,
रा. खेड, ता. जि.धाराशिव
४) शुभम पि. हनुमंत शिंदे वय २५ वर्षे,
धंदा-शेती व नौकरी रा.नारी
ता. बार्शी, जि. सोलापूर

**विरुध्द**

निरंक **-- गैरअर्जदार**

अर्ज - बॉम्बे रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ अन्वये वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत

ज्या अर्थी,

यातील अर्जदार क्र. १ ही मयत असुन हनुमंत निवृत्ती शिंदे यांची पत्नी असून अर्जदार क्र. २ व ३ या मयताच्या विवाहीत मुली असुन प्रतिवादी क्र. ४ हा मयताचा मुलगा आहे. तसेच मयत हनुमंत निवृत्ती शिंदे यांची आई ही पुर्वीच मयत झालेली आहे. हनुमंत निवृत्ती शिंदे हे दि. २२/०८/२०२२ रोजी अश्विनी हॉस्पीटल सोलापूर येथे मयत झालेले आहेत. अर्जदार क्र. १ ते ४ यांचे शिवाय मयत हनुमंत निवृत्ती शिंदे यांना इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत. त्यामुळे अर्जदार हे मयत हनुमंत निवृत्ती शिंदे यांचे कायदेशीर वारस असल्याचे घोषीत होऊन वारसा प्रमाणपत्र मे. न्यायालयाकडून मिळाणेसाठी अर्जदारांनी प्रस्तुतचा अर्ज या मे. कोर्टात दाखल केलेला आहे.

त्या अर्थी, सदर अर्जदार क्र. १ ते ४ यांचे व्यतिरीक्त मयत हनुमंत निवृत्ती शिंदे यांचे पश्चात इतर कोणाचा वारसाहक्क हित संबंध असलेस त्यांनी सदर जाहीर प्रसिध्दी करणापासून ३० दिवसाचे आत किंवा नेमली ता. २९/११/२०२४ रोजी सदरकामी हजर राहून आपले म्हणणे वा हरकत लेखी स्वरूपात पुराव्यानिशी दाखल करावी मुदतीत कोणाची हरकत वा म्हणणे आले नाही. तर कोणाचे काही म्हणणे नाही असे समजून यातील अर्जदारांना अर्जाप्रमाणे वारस दाखला देणेत येईल.

कळावे हे प्रसिध्दीकरण मे. कोर्टाचे सहीशिक्क्यानिशी दिले असे. ता. १४/१०/२०२५

**सही /-**
**कोर्टाचा शिक्का**

**सही/-**
**सहाय्यक अधिक्षक**
**मा. दिवाणी न्यायालय**
**व. स्तर बार्शी ता. बार्शी**

### जाहीर प्रसिध्दीकरण

नि. - ५
दि. कि.अ.नं. ९३/२०२५
किरकोळ अर्ज ०१/२०२४

**बार्शी येथील मा. दिवाणी न्यायाधिश सो. कनिष्ठ व. स्तर यांचे न्यायालयात**

**श्रीमती शिवगंगा दगडू टकले.** वय ६८ वर्षे,
धंदा-घरकाम. रा मांगडे चाळ, बार्शी, **-- अर्जदार**
ता बार्शी, जि. सोलापूर

**विरुध्द**

१) **वैजिनाथ दगडु टकले**, वय ४५ वर्षे,
धंदा-शेती, रा. मांगडेचाळ, बार्शी,
ता. बार्शी, जि. सोलापूर **-- सा.वाला**
२) **बापू दगडु टकले,** वय ४३ वर्षे, धंदा-शेती, रा. सदर
३) **भाऊ दगडु टकले**, वय ४० वर्षे, धंदा-शेती, रा.सदर
४) **काश्मिरी देवानंद स्वामी**, वय ३८ वर्षे,
धंदा-घरकाम, रा. येवती, ता.जि. धाराशिव

ज्याअर्थी अर्जदार यांचे पती म्हणजेच सावाला नं.१ ते ४ चे वडिल दगडु हरिश्चंद्र टकले हे होते ते दि. २९/०६/२०१९ रोजी बार्शी येथे मयत झालेले आहेत. त्यांच्या पश्चात अर्जदार व सा.वाला हे कायदेशीर होते व आहेत. मयतास अर्जदार सा.वाला हेच वारस असून मयतास अर्जदार सा.वाला शिवाय अन्य कोणीही कायदेशीर वारस नाहीत, मयत दगडु हरिश्चंद्र टकले हे जि.प.धाराशिव अंतर्गत प्राथमिक शिक्षक होते ते रिटायर झालेनंतर पेन्शन मिळत होती त्यांचे पश्चात अर्जदार हिस कुटुंब निवृत्ती वेतन मिळणेची आहे त्याकरीता तसेच अर्जदार यांना त्यांचे कायदेशीर व शासकीय अडचणीचे निवारणाकरीता व अर्जात नमूद मिळकतीचे हक्कपत्रकी नोंद होणेकरीता तसेच कायदेशीर वारस असलेबाबत वारस / हेअरशिप प्रमाणपत्राची संबंधीतानी अधिकारी यांनी मागणी केली असलेने गरज भासलेली आहे सदर वारस/हेअरशिप अर्जदाराकडे नसलेने अर्जदारास अनेक कायदेशीर अडचणीस सामोरे जावे लागत आहे असे कथन करुन अर्जदाराने वारस/ हेअरशिप प्रमाणपत्राची मागणी केली आहे

त्याअर्थी या जाहीर प्रसिध्दीकरणाने कळविण्यात येते की, अर्जदारांचे वर नमूद मागणी संबंधाने, कथनांसंबंधाने वा अन्य कोणाचे कांही कायदेशीर हक्क हितसंबंध, आक्षेप असलेस वा मयतास अन्य कोणी वारस असलेस संबंधीतानी ही नोटीस प्रसिध्द झालेपासून ३० दिवसाचे आत अथवा पुढील नेमले ता.२७/११/२०२५ रोजी मे. कोर्टात स्वतः वा माहितगार ॲडव्होकेट मार्फत हजर होवून आपले म्हणणे, हरकती, तक्रारी लेखी स्वरुपात सादर कराव्यात. मुदतीत कोणाचेही तक्रारी, हरकती न आल्यास प्रकरणी मे. कोर्टाचे पुढील योग्य ते हुकूम होतील.

हे जाहीर प्रसिध्दीकरण आमचे सहीनिशी व मे. कोर्टाचे शिक्क्यानिशी प्रसिध्द केले असे. ता. १६/१०/२०२८

**सही/-**
**वरिष्ठ लिपीक**
**दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, बार्शी**

शिक्का

**सही/-**
**सहा. अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, बार्शी**



### कुंभारी येथे मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानांतर्गत स्वच्छता मोहीम

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ ऑक्टोबर-**

शासनाकडून सूरू करण्यात आलेल्या मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानाचा शुभारंभ दक्षिण सोलापूर तालुक्यातील कुंभारी येथे सरपंच श्रुती निकंबे यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आली. यावेळी गावात प्रभात फेरी, स्वच्छता मोहीम, वृक्ष लागवड उपक्रम राबविण्यात आली. यावेळी जिल्हा परिषद ग्रामीण पुरवठा कार्यकारी अभियंता संजय धनशेट्टी, पालक अधिकारी जे. बी. सुतार, ग्रामपंचायत अधिकारी प्रेमदास पवार, भाजपाचे ज्येष्ठ नेते शिरीष पाटील, रामचंद्र होनराव,उपसरपंच राजशेखर कोरे, माजी उपसरपंच सुरज पाटील, विजयकुमार शबाशे, ग्रामपंचायत सदस्य शिवानंद आंदोडगी पाटील,बाबूशा गाडेकर, नवनाथ काळे उपस्थित होते. यावेळी ग्राम पंचायत परिसर, जिल्हा परिषद शाळा, अंगणवाडी, आरोग्य उपकेंद्र, पल्ला कट्टी चौक, शांती चौक, बसवेश्वर प्रवेशद्वार, महादेव मंदिर,हनुमान मंदिर, स्मशानभूमी मड्डी वस्ती येथील मुख्य रस्त्यांची स्वच्छता करण्यात आली.

### महिलेचा विनयभंग करून मारहाण करणाऱ्या बाप-लेकाविरुध्द गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ ऑक्टोबर-**

विनयभंग झाल्याने तक्रार देण्यासाठी जाणाऱ्या महिलेस म ाराहण करणाऱ्या बाप-लेकाविरुध्द विजापूर नाका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत पिडीत महिलेच्या फिर्यादीवरुन श्रीमंत देसू राठोड (रा. कुमठे गाव, सोलापूर) आणि नरसिंग श्रींमत राठोड (रा. घोडा तांडा, सोलापूर) यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. १६ ऑक्टोबर रोजी यातील पिडीता ही तिच्या बहिणीच्या घरी असताना श्रीमंत राठोड याने तिच्या मनास लज्जा वाटेल असे कृत्य करून तिचा विनयभंग केला. त्याम ुळे पिडीता ही तक्रार देण्यासाठी जात असताना कुमठे गावात श्रीमंत राठोड याने पिडीतेला शिवीगाळ करून लोखंडी वस्तू डोक्यात म ारून जखमी केले. तसेच नरसिंग राठोड याने शिवीगाळ करून लाकडाने मारहाण करून जखमी केले व धमकी दिली. म्हणून विजापूर नाका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस हवालदार बर्हिजे पुढील तपास करीत आहेत.

### नावात बदल

माझे जुने नाव विश्वनाथ सिद्धाराम बाके करक्षक असे होते ते आता बदलून विश्वनाथ सिद्धाराम बाके असे ओळखले जाईल. अक्कलकोट येथील मे. कार्यकारी दंडाधिकारी यांचे समोर प्रतिज्ञा पत्र क्र. ५४३५/२०२५ दिनांक - १६/१०/२०२५

### महावितरण — ई-निविदा सूचना

मान्यताप्राप्त अनुभवी कंत्राटदारांकडून खालील कामाकरिता निविदा मागवण्यात येत आहेत. इतर सर्व निविदा माहिती **https://tender.mahadiscom.in/eatApp** या वेबसाईटवर उपलब्ध आहे. निम्नस्वाक्षरीधारकांकडे कोणतेही कारण न देता निविदा रद्द करणेबाबत अधिकार राखून ठेवले आहेत.

| अ. क्र | निविदा क्रमांक | कामाचे स्वरूप | निविदा रक्कम | अंतिम तारीख |
|---|---|---|---|---|
| 1 | EE/PPR/ T-18/2025 -26 | कार्तिकी वारी देखभाल दुरुस्ती अंतर्गत, पंढरपूर ग्रा 01 व पंढरपूर ग्रा 02 उपविभाग अंतर्गत 11 केव्ही एबी स्विचेस आणि डीओ फ्यूजच्या दुरुस्ती आणि देखभालीचे काम आणि आवश्यक साहित्य/स्पेअर्स पुरवठा आणि संबंधित कामे | 10 लाख | 24.10.2025 |
| 2 | EE/PPR/ T-19/2025 -26 | कार्तिकी वारी देखभाल दुरुस्ती अंतर्गत, पंढरपूर ग्रा 01 व पंढरपूर ग्रा 02 उपविभाग अंतर्गत कट पॉइंटवर 11 केव्ही एचटी लाईन जंपर्सच्या क्रिम्पिंग दुरुस्ती/ रिकंडिशनिंग करणेबाबत | 10 लाख | 24.10.2025 |

ई निविदा, बयाणा रक्कम ऑनलाईन भरून सर्व तपशीलासह व विहित नमुन्यात सादर करावी. **ऑफिसचा पत्ता :-** कार्यकारी अभियंता, पोल फॅक्टरी जवळ, लिंक रोड, पंढरपूर, ता. पंढरपूर जि. सोलापूर

**कार्यकारी अभियंता**
**महावितरण (संवसु) विभाग पंढरपूर**

PRO/BMTZ/133/2025-26

### जाहीर प्रसिध्दीकरण

पुढील नेमली तारीखः २८/११/२०२५
दि.कि.अ.नं. ४५/२०२५

**बार्शी येथील मे. सिव्हील जज्ञ सिनिअर डिव्हीजन यांचे कोर्टात**
**(मे कंटे मॅडम कोर्ट)**

१) **श्रीमती सरोजा विठ्ठल शिंदे,**
वय-४५ वर्षे, धंदा-घरकाम,
२) **सागर विठ्ठल शिंदे,**
वय-३० वर्षे, धंदा नोकरी, **-- अर्जदार**
३) **विशाल विठ्ठल शिंदे,**
वय-२८ वर्षे, धंदा - नोकरी
४) **श्रीमती सावित्रा केरबा शिंदे,**
वय-८९ वर्षे, धंदा घरकाम,
सर्व रा. चिंचोली, ता. बार्शी, जि. सोलापूर

**विरुध्द**

**कोणीही नाही.** **-- सामनेवाला**

ज्याअर्थी अर्जदार नं. १ यांचे पती व अर्जदार नं. २, ३ चे वडिल व अर्जदार नंबर ४ यांचा मुलगा कै. विठ्ठल केरबा शिंदे यांचा मृत्यू दिनांक १६/०६/२०२४ रोजी मौजे चिंचोली, ता. बार्शी, जि. सोलापूर येथे झाला आहे. मयत विठ्ठल केरबा शिंदे हे सोलापूर जिल्हा परिषद सोलापूर यांचे अंतर्गत टोनेवाडी, ता. बार्शी, जि. सोलापूर येथे प्राथमिक शिक्षक म्हणुन नोकरीस होते. त्याच्या पश्चात भविष्य निर्वाह निधीची रक्कम रुपये ७,९९,२६७/- मिळणाऱ्या रक्कमेकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे त्यामुळे त्यांचे पश्चात अर्जदार नं. १ ते ४ हे त्यांचे एकमेव कायदेशीर वारस आहेत. त्यामुळे त्यांनी वारस प्रमाणपत्र मिळणेकरीता मा. दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर बार्शी येथे अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी मयत **कै. विठ्ठल केरबा शिंदे** यांना अर्जदारशिवाय इतर कोणी वारस असेल अथवा त्यांच्या विषयी काही म्हणणे असल्यास या जाहीर प्रसिध्दीकरणापासुन ३० दिवसाच्या आत अथवा नेमलेली तारीख २८/११/२०२५ रोजी मे. कोर्टात हजर राहुन आपले म्हणणे हरकत लेखी स्वरुपात पुराव्यानिशी दाखल करावे. मुदतीत कोणाच्याही हरकती व म्हणणे न आल्यास अर्जदारांना अर्जाप्रमाणे वारस प्रमाणपत्र देण्यात येईल. मा. कोर्टाचे प्रकरणी पुढील यथायोग्य आदेश होतील.

हे जाहीर प्रसिध्दीकरण आमचे सहीनिशी व मे. कोर्टाचे शिक्क्यानिशी प्रसिध्दी केले असे. तारीखः १६/१०/२०२५.

**सही/-**
**कनि. लिपीक**

शिक्का

**सही/-**
**सहाय्यक अधिक्षक, सि. ज. सि. डि. यांचे न्यायालय, बार्शी,**
**ता. बार्शी, जि. सोलापूर**

# ऑस्ट्रेलियाच्या वन-डे संघात ग्रीनच्या जागी मार्नस लॅबुशेन

◆ **पर्थ, १७ ऑक्टोबर**

रविवारपासून येथे सुरू होणाऱ्या तीन सामन्यांच्या एकदिवसीय मालिकेसाठी शुक्रवारी दुखापतग्रस्त अष्टपैलू कॅमेरून ग्रीनच्या जागी मार्नस लॅबुशेनचा ऑस्ट्रेलिया संघात समावेश करण्यात आला आहे.

पुढील महिन्यात सुरू होणाऱ्या अॅशेसपूर्वी निवडकर्त्यांनी दुखापतीतून सावरत असलेल्या कॅमेरून ग्रीनला भारताविरुद्धच्या मालिकेसाठी विश्रांती देण्याचा निर्णय घेतला. त्यामुळे ग्रीनला या मालिकेला मुकावे लागणार आहे.

ग्रीन पुनर्वसनाचा एक छोटासा कालावधी पूर्ण करेल व अॅशेससाठी त्याची तयारी सुरू ठेवण्यासाठी तो शेफील्ड शिल्डच्या तिसऱ्या फेरीत खेळण्यासाठी परतण्याचा प्रयत्न करत आहे, असे क्रिकेट ऑस्ट्रेलियाने एका निवेदनात म्हटले आहे.



ग्रीन वन-डे सामन्यात सामने न खेळणे हे एक सावधगिरीचे पाऊल आहे. त्याच्या जागी लॅबुशेनचा समावेश करण्यात आली. लॅबुशेन आधी जाहीर झालेल्या संघाचा भाग नव्हता, परंतु गुरुवारी क्वीन्सलॅण्डसाठी शेफील्ड शिल्ड सामन्यात त्याने १५९ धावांची उत्कृष्ट कामगिरी केली, त्यामुळे त्याला संघात समाविष्ट करण्यात आले आहे, हे त्याचे देशांतर्गत हंगामातील चौथे शतक आहे.

भारताविरुद्धच्या पहिल्या एकदिवसीय सामन्यासाठी ऑस्ट्रेलियाने तिसरा सक्तीचा बदल केला आहे, यात दुखापतग्रस्त जोश इंग्लिसच्या जागी जोश फिलिप व वैयक्तिक कारणांमुळे अॅडम झाम्पा याच्या जागी मॅथ्यू कुहनेमन खेळणार आहेत. भारताच्या दृष्टिकोनातून मालिकेचे लक्ष विराट कोहली व रोहित शर्मावर यांच्यावर आहे. हे दोघेही मार्चनंतर पहिल्यांदाच राष्ट्रीय कर्तव्यात परतले आहेत. कसोटी निवृत्तीनंतर ते एकाच फॉरमॅटचे खेळाडू झाले आहेत.

**ऑस्ट्रेलिया संघ :** मिचेल मार्श (कर्णधार), झेव्हियर बार्टलेट, कूपर कॉनोली, बेन द्वारशुइस, नॅथन एलिस, जोश हेझलवूड, ट्रॅव्हिस हेड, मॅथ्यू कुहनेमन, मार्नस लाबुशेन, मिचेल ओवेन, जोश फिलिप, मॅथ्यू रेनशॉ, मॅथ्यू शॉर्ट, मिचेल स्टार्क. दुसऱ्या एकदिवसीय सामन्यानंतर : अॅडम झाम्पा, अॅलेक्स केरी, जोश इंग्लिस. (वृत्तसंस्था)

# भारत दौऱ्यासाठी 'अ' संघात बावुमाचा समावेश

**जोहान्सबर्ग, १७ ऑक्टोबर**

दक्षिण आफ्रिकेचा कसोटी कर्णधार टेम्बा बावुमा याला या महिन्याच्या अखेरीस भारत दौऱ्यासाठी देशाच्या अ संघात स्थान देण्यात आले आहे. दुखापती मुळे बावुमा पाकिस्तानविरुद्ध सुरू असलेल्या कसोटी मालिकेत खेळू शकला नाही आणि त्यानंतर होणाऱ्या एकदिवसीय मालिकेसाठी त्याला संघातून वगळण्यात आले आहे. त्यामुळे त्याला पूर्णपणे बरे होण्यासाठी वेळ मिळेल. बावुमाचा अ संघात समावेश केल्याने त्याला केवळ संघात परतण्यास मदत होणार नाही, तर शुभमन गिल व त्याच्या सहकाऱ्यांविरुद्धच्या कसोटी मालिकेपूर्वी तो भारतीय परिस्थितीशी जुळवून घेण्यासही मदत करेल.

तो बेंगळुरूमध्ये खेळल्या जाणाऱ्या दोन प्रथम श्रेणी सामन्यांपैकी दुसऱ्या सामन्यासाठी उपलब्ध असेल, असे समजते. १९ डिसेंबर रोजी संपणाऱ्या या



संपूर्ण दौऱ्यात दक्षिण आफ्रिका दोन कसोटी, तीन एकदिवसीय आणि पाच टी-२० आंतरराष्ट्रीय सामने खेळेल. बॅटर मार्क्स अॅकरमन चार दिवसांच्या संघाचे नेतृत्व करतील, यात झुबेर हमजा व फलंदाज प्रेनेलन सुब्रायन यांचाही समावेश आहे. हे दोघेही सध्या पाकिस्तानविरुद्धच्या कसोटी संघात आहेत. दोन चार दिवसांचे सामने ३० ऑक्टोबर ते ९ नोव्हेंबर दरम्यान बेंगळुरूमधील बीसीसीआय सेंटर ऑफ एक्सलन्स येथे होतील. दक्षिण आफ्रिका अ संघ १३ ते १९ नोव्हेंबर दरम्यान राजकोटमध्ये भारत अ संघाविरुद्ध तीन एकदिवसीय सामने देखील खेळेल.

# हरमनप्रीतची हिलीसारखी मोठी खेळी करण्याची वेळ आलीय् : नासेर हुसेन

◆ **नवी दिल्ली, १७ ऑक्टोबर**

भारतीय महिला क्रिकेट संघाची कर्णधार हरमनप्रीत कौरची विश्वचषकातील कामगिरी उत्तम आहे, परंतु तिने आता तिच्या ऑस्ट्रेलियन समकक्ष अॅलिसा हिलीप्रमाणे मोठी कामगिरी करण्याची वेळ आली आहे, असे मत इंग्लंड संघाचा माजी कर्णधार नासेर हुसेन यांनी शुक्रवारी व्यक्त केले.

आयसीसी महिला वन-डे विश्वचषकात हरमनप्रीतने आतापर्यंत वाईट कामगिरी केली असून तिने चार सामन्यात ७१ धावा केल्या आहेत. तिची उपकर्णधार स्मृती मंधाना (१३४ धावा) आणि प्रतिका रावलने (१८०) अव्वल स्थानावर सर्वाधिक धावा केल्या आहेत.

परंतु दक्षिण आफ्रिका व ऑस्ट्रेलियाविरुद्ध दोन सामन्यांत पराभव झाल्यानंतर भारत अडचणीत सापडला आहे, त्यामुळे यजमान संघ सध्या गुणतालिकेत चौथ्या स्थानावर आहे आणि येथून एक घसरण त्यांच्या घरच्या मैदानावर विश्वचषकातील आशा धुळीस मिळवेल.

भारताचा पुढील सामना रविवारी इंदूर येथे इंग्लंडशी होणार आहे. तिथे हरमनप्रीत कौरच्या नेतृत्वाखालील मधल्या फळीतील खेळाडू चांगली कामगिरी करेल व स्मृती मंधाना व रावल यांना साथ देईल अशी आशा हुसेन यांनी व्यक्त केली.



हरमनप्रीतचा महिला विश्वचषकात एक शानदार रेकॉर्ड आहे. भारताविरुद्धच्या सामन्यापूर्वीच्या शेवटच्या दोन सामन्यांमध्ये अॅलिसा हिलीने केलेल्या कामगिरी प्रमाणेच हरमनप्रीतकडून अशीच अपेक्षा आहे, असे हुसेन भारत-इंग्लंड सामन्यापूर्वी म्हणाले.

या स्पर्धेत भारतीय संघ आपल्या सलामीवीरांवर- मंधाना व रावलवर जास्त अवलंबून आहे असे मला वाटत नाही. कारण, जेव्हा तुम्ही पॉवरप्लेमध्ये फलंदाजी करत असता आणि पॉवरप्लेमध्ये डावाची सुरुवात करत असता, तेव्हा तुमचा स्ट्राइक रेट मधल्या फळीतील फलंदाजांच्या तुलनेत जास्त असेल, तेव्हा स्ट्राइक रेटची तुलना करताना काळजी घ्या, असे हुसेन म्हणाले.

सात वेळा विजेत्या ऑस्ट्रेलियाने उपांत्य फेरीत स्थान मिळवले आहे आणि उर्वरित तीन स्थानांसाठी भारत, इंग्लंड, दक्षिण आफ्रिका आणि न्यूझीलंड यांच्यात चुरस आहे. इंग्लंड व न्यूझीलंडविरुद्ध विजय मिळवल्याने भारताचे उपांत्य फेरीतील स्थान जवळजवळ निश्चित होईल.

दोन पराभवांमुळे आता भारतासाठी उर्वरित प्रत्येक सामना बाद फेरीसारखा झाला आहे, असे ते म्हणाले.

मला वाटते की हरलीन देओल ठीक आहे, ती सातत्यपूर्ण आहे. जेमिमाह रॉड्रिग्जने चांगल्या धावा केल्या आहेत, तर दीप्ती शर्माने सुद्धा क्रमवारीत चांगली कामगिरी केली आहे. (वृत्तसंस्था)

## शुभमन गिलला वन-डे रेटिंग सुधारण्याची संधी

**नवी दिल्ली :** भारतीय क्रिकेट संघ आस्ट्रेलियाविरुद्ध १९ ऑक्टोबरपासून सुरू होणाऱ्या तीन सामन्यांच्या एकदिवसीय मालिकेसाठी सज्ज आहे. यावेळी रोहित शर्मा, विराट कोहली आणि शुभमन गिल एकत्र मैदानावर दिसणार आहेत. शुभमन गिल सध्या आयसीसी एकदिवसीय क्रमवारीत प्रथम क्रमांकावर आहे.



## लोकमंगल प्रशालेच्या तिघींची मैदानी स्पर्धेत कामगिरी

**सोलापूर, दि. १७ ऑक्टोबर-**

अवंती नगर येथील लोकमंगल प्रशालेच्या तिघींनी शालेय शहर मैदानी स्पर्धेत उल्लेखनीय कामगिरी केली.

एस.आर.पी कॅम्प येथे झालेल्या या स्पर्धेत प्रणाली चव्हाण हिने १४ वर्षे वयोगटात १६ मीटर थाळी फेकून सुवर्ण पटकावले. तसेच कार्तिकी दळवी हिनेही १७ वर्षे वयोगटात १८.९५ मीटर भाला फेकत सुवर्ण पटकाविले. अस्मिता मोरे हिने भालाफेकमध्ये तृतीय स्थान मिळविले. दोघींची पुणे विभागीय मैदानी स्पर्धेसाठी निवड झाली. या खेळाडूंना रतिकांत म्हमाणे यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांचे दक्षिण सोलापूर तालुक्याचे आमदार सुभाष देशमुख, अवंती शिक्षण संस्थेचे सचिव प्रदीप साठे व कार्यकारी संचालक अभयसिंह साठे व मुख्याध्यापिका शुभांगी साठे यांनी अभिनंदन केले

## स्वामी विवेकानंद पोलीस पब्लिक स्कूलच्या भक्ती थोरातला तिहेरी मुकुट

**सोलापूर, दि. १७ ऑक्टोबर-**



सोरेगाव येथील एस.आर.पी.एफच्या मैदानावर झालेल्या शालेय शहर मैदानी स्पर्धेत स्वामी विवेकानंद पोलीस पब्लिक स्कूल मॅनेज्ड बाय इंडियन मॉडेल स्कूलच्या भक्ती महेश थोरात हिने १७ वर्षांखालील गटात लांब उडी, १०० मीटर धावणे व १०० मीटर अडथळा शर्यतीत प्रथम क्रमांक पटकावित तिहेरी मुकुट संपादिला. या कामगिरीवर तिची विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली. त्यांच्या या यशाबद्दल शाळेचे कमिटी सदस्य पोलीस आयुक्त एम. राजकुमार, पोलीस उपायुक्त हसन गौहर, सहायक पोलीस आयुक्त सुरेंद्र माळाळे, पोलीस निरीक्षक उदयसिंह पाटील, आय.एम.एस. ग्रुप ऑफ स्कूलचे सचिव अमोल जोशी, श्री साई महिला प्रतिष्ठानच्या सचिवा सायली जोशी, ममता बसवंती व मुख्याध्यापिका स्वाती कारंडे यांनी अभिनंदन केले.

## जिल्हा वरिष्ठ गट नेटबॉल निवड चाचणी आज

**सोलापूर, दि. १७ ऑक्टोबर-**

छत्रपती संभाजीनगर येथे २८ ते ३० ऑक्टोंबर दरम्यान होणाऱ्या राज्य वरिष्ठ नेटबॉल स्पर्धेकारिता जिल्हा निवड चाचणी १८ ऑक्टोबर रोजी दुपारी ४ वाजता भवन जवळील राजर्स इंग्लिश मिडीयम स्कूल येथे होईल. इच्छुक खेळाडूंनी उपस्थित राहावे, असे संघटनेचे सचिव कुद्दूस शेख यांनी कळविले आहे.

# छत्रपती शिवाजीचा इरफान बारगीर विभागीय वेटलिफ्टींग स्पर्धेत प्रथम

### सात खेळाडूंची पुणे विभागीय मैदानी व धनुर्विद्या स्पर्धेसाठी निवड

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ ऑक्टोबर-**

राजगुरूनगर (पुणे) येथे झालेल्या शालेय १९ वर्षाखालील वेटलिफ्टिंग स्पर्धेत छत्रपती शिवाजी सायं कनिष्ठ महाविद्यालयाचा इरफान बारगीर याने वेटलिफ्टिंग प्रकारात २१५ किलो वजन लिफ्ट करून पुणे विभागामध्ये प्रथम क्रमांक मिळविला. या कामगिरीवर त्याची त्याची राज्यस्तरीय स्पर्धे साठी निवड झाली.

तसेच येथे झालेल्या शहर जिल्हा अॅथलेटिक्स स्पर्धेमध्ये ११०मीटर हर्डल्स धावणे स्पर्धेमध्ये मंथन जुपलिंगे याने प्रथम क्रमांक मिळविला. त्याची पुणे



विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली. तसेच शहर धनुर्विद्या स्पर्धेत साईराज हनमे, सिद्धार्थ साखरे, प्रेरणा हरिदास, सर्वज्ञ गाढवे, वैष्णवी पोळ, संस्कृती व्हानमाने या खेळाडूंची पुणे विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली.

त्यांना प्रा संतोष गवळी, मार्गदर्शक दीपक चिकणे, प्रा सचिन गायकवाड यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांचे मराठा समाज सेवा मंडळ संस्थेचे अध्यक्ष माजी महापौर मनोहरपंत सपाटे, उपाध्यक्ष ज्ञानेश्वर सपाटे, सेक्रेटरी प्रा महेश माने, प्राचार्य मंजुश्री सपाटे-पाटील, प्राध्यापक संदीप गायकवाड यांनी अभिनंदन केले.



# शालेय व्हॉलिबॉल स्पर्धेत मेहता शाळेस उपविजेतेपद

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ ऑक्टोबर-**

शालेय शहर व्हॉलिबॉल स्पर्धेत मेहता शाळेने १४ वर्षांखालील मुलांच्या गटात उपविजेतेपद संपादिले. तसेच या संघास बाळकृष्ण पाटील, प्रशांत बिराजदार व अभिषेक राठोड यांचे मार्गदर्शन लाभले. संघाचे मुख्याध्यापिका श्रुती बागेवाडी, शाळा समिती अध्यक्ष राजेश पटवर्धन यांनी अभिनंदन केले.

# राज्य टेबल टेनिस निवड चाचणीसाठी सोलापूरच्या तिघी



### वेदांकिता पाटील, शिवानी सानप व अनुष्का रावत यांचा समावेश

**सोलापूर, दि. १७ ऑक्टोबर-**

अहिल्यानगर येथे झालेल्या पुणे विभागीय टेबल टेनिस स्पर्धेतून राज्य चाचणीसाठी सोलापूरच्या तिघींची निवड झाली. १७ वर्षे मुलींच्या गटात वेदांकिता पाटील प्रथम क्रमांकावर, १९ वर्षे मुलींच्या गटात अनुष्का रावत तिसऱ्या क्रमांकावर तर १४ वर्षे मुलींच्या गटात शिवानी सानप हिची दुसऱ्या क्रमांकावर निवड झाली. पुढील महिन्यात अलिबाग येथे होणाऱ्या राज्य स्पर्धेसाठी ते पात्र झाले आहेत.

त्यांना सोलापूर ज़िल्हा टेबल टेनिस असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. राजीव प्रधान, डॉ. नितीन तोष्णीवाल, झेड. एम. पुणेकर व सर्व खेळाडूंनी अभिनंदन करून पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.



# मंगळवेढ्याच्या इंग्लिश स्कूलला दुहेरी मुकुट

### पुणे विभागीय शालेय सेपक टकरा स्पर्धा : येड्रावची माध्यमिक शाळाही विजेती


**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ ऑक्टोबर-**

शालेय पुणे विभागीय सेपक टकरा स्पर्धेत स्पर्धेत १९ व १७ वर्षाखालील मुलींच्या गटात मंगळवेढ्याच्या इंग्लिश स्कूलने विजेतेपद पटकावित दुहेरी मुकुट संपादिला. मंगळवेढा तालुक्यातील यड्राव माध्यमिक आश्रम शाळेच्या संघाने १४ वर्षाखालील मुलींच्या गटात विजेतेपद मिळवला.

नेहरूनगर येथील जय जवान जय किसान सैनिकी स्कूलच्या मैदानावर या स्पर्धेचे आयोजन केले होते.

अंतिम सामन्याच्या सुरुवातीला खेळाडूंची ओळख जिल्हा संघटनेचे सचिव रामचंद्र दत्तू, प्राचार्य प्रशांत यादव, निवड समिती सदस्य वीरेश अंगडी, रवींद्र चव्हाण, अण्णा वाकडे, क्रीडा शिक्षक संभाजी हेगडे यांच्या हस्ते करण्यात आली.

१४ वर्षाखालील मुलींच्या अंतिम सामन्यात येड्रावच्या माध्यमिक आश्रम शाळेने पुण्याच्या मातोश्री इंग्लिश मीडियम स्कूलचा १५-७, १५-0 असा दणदणीत पराभव केला. १७ वर्षाखालील मुलींच्या गटात मंगळवेढ्याच्या इंग्लिश स्कूलच्या संघाने पुण्याच्या मातोश्री इंग्लिश स्कूलवर १५ ९ १५ १२ अशी मात करत विजेतेपद पटकावला १९ वर्षाखालील मुलींच्या गटात मंगळवेढ्याच्या इंग्लिश स्कूलने पुण्याच्या एसपी कनिष्ठ महाविद्यालयाचा १५-७, १५-१२ असा पराभव करत दुसरा विजेतेपद मिळवला.



## एमआयटी विश्वशांती गुरुकुलचा हर्षल नागणे विभागीय मैदानी स्पर्धेस पात्र

**सोलापूर, दि. १७ ऑक्टोबर-**

येथील एमआयटी विश्वशांती गुरुकुलचा हर्षल नागणे हा विभागीय मैदानी स्पर्धेस पात्र ठरला आहे. के.बी.पी. विद्यालय पंढरपूर येथे झालेल्या स्पर्धेत हर्षलने १४ वर्षाखालील गटात २०० मीटर धावण्याच्या स्पर्धेत त्याने ही कामगिरी केली. हर्षलला क्रीडाशिक्षक राहुल जाधव, अश्विनी पांढरे आणि अजय पारिक यांनी मार्गदर्शन केले. त्याचे मुख्याध्यापिका रेखा पाटील यांनी अभिनंदन केले.

# विंचूर येथे हिवाळी क्रीडा प्रशिक्षणास सुरुवात



**सोलापूर, दि. १७ ऑक्टोबर-**

विंचूर (ता. दक्षिण सोलापूर) येथे जिल्हा परिषद प्राथमिक शाळा विंचूर व विंचूर खो-खो क्लबच्या वतीने दिवाळी क्रीडा प्रशिक्षणास सुरुवात करण्यात आली.

याचे उद्घाटन माजी गटविकास अधिकारी मल्हारी बनसोडे, मंद्रूप पोलीस स्टेशनचे गोपनीय अधिकारी सागर चव्हाण, खोखो क्लबचे अध्यक्ष तथा सरपंच बाळासाहेब पाटील, उपसरपंच पद्मावती फुलारे, कुसुरचे सरपंच मनोहर नरोटे, पोलीस पाटील मल्लिकार्जुन झाडबुके, आदित्य झाडबुके, भीमाशंकर फुलारी यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले. सर्व मान्यवरांच्या शुभहस्ते खो-खो मैदानाचे पूजन करण्यात आले. यावेळी सामाजिक बांधिलकी म्हणून रक्तदान करणाऱ्या क्लबचे सदस्य भीमाशंकर सोनगी, विजयकुमार बिराजदार, विकास पवार, सुरेश म्हेत्रे, रवी परीट, महेश माने, बाळाप्पा कोळी, प्रभूलिंग फडतरे, अमोल साबळे, सोमनाथ कोळी यांचाही सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमास श्रीशैल शिवणे, डॉ. अमोल माने, भीमाशंकर फुलारी, विक्रम जाधव, महादेव कोठे, यल्लाप्पा कोळी, अजिंक्य साबळे, नागनाथ कोळी, बालाजी चव्हाण, सरुबाई देवकते, औदुंबर अंकुशे दशरथ कोळी व ग्रामस्थ उपस्थित होते. कार्यक्रमानंतर खेळाडूंना खाऊ वाटप करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन क्रीडा मार्गदर्शक तुळशीराम शेतसंधी यांनी केले. नागेश फुलारी यांनी आभार मानले



# लिट्ल फ्लावर स्कूल बास्केटबॉल स्पर्धेत उपविजयी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १६ ऑक्टोबर-**

शालेय शहर बास्केटबॉल स्पर्धेत लिट्ल फ्लावर स्कूलने १४ वर्षांखालील मुलांच्या गटात उपविजेतेपद पटकावले. या खेळाडूंना क्रीडा शिक्षक प्रसेनजीत सुर्यवंशी यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांचे मुख्याध्यापिका सिस्टर सिलीन कराकट यांनी अभिनंदन केले.

**संघातील खेळाडू :** अफजान जाविद जमादार (कर्णधार), सोहम संदिप थोरात, सुफियान साजिद सय्यद, रुद्र सतीश जाधव, मोहम्मद अली मुश्ताक शेख, रणवीर राहूल गायकवाड, यशांकूर श्यामसुंदर विन्नू, जय गणेश नारायणकर.

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्वाचे...



### जळोलीत विद्यार्थ्यांनी आकाशकंदील बनवत घेतला स्वनिर्मितीचा आनंद

**करकंब, दि.१७ ऑक्टोबर-**

जि.प.प्रा.शाळा जळोली (केंद्र उंबरे) येथे दिपावली निमित्त विद्यार्थ्यांकडून टाकाऊ वस्तुपासून टिकाऊ आकाशकंदील बनवत स्वनिर्मितीचा आनंद लुटला. यावेळी प्लास्टिक बाटल्या, फूगे, लोकर. कात्री, आदी वस्तूपासून विद्यार्थ्यांना शिक्षकांनी मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनी स्वतः आकाशकंदील तयार केले. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी सदैव प्रयत्नशील असणारी जि.प.प्रा.शाळा जळोली पुढील काळातही विविध उपक्रम राबवणार असल्याचे मुख्याध्यापक अनिल जगताप यांनी सांगितले. त्यांच्या मार्गदर्शनाखाली शिक्षक जयवंत कापसे, नागनाथ गायकवाड, सिध्देश्वर लोंढे, कैलास नरसाळे, बाळू खांडेकर, ज्ञानेश्वर दुधाणे, शिक्षिका देवकी कलढोणे (दुधाणे) यांनी सर्व विद्यार्थी विद्यार्थिनींना मार्गदर्शन केले.

### दिपावालीच्या पार्श्वभूमीवर पोलीस निरीक्षक कुकडे यांचे नागरिकांना आवाहन

**बार्शी, दि.१७ ऑक्टोबर-**

दिपावली सणाच्या पार्श्वभूमीवर बार्शी शहर पोलीस ठाण्याचे पोलिस निरीक्षक बालाजी कुकडे यांनी शहरातील नागरिकांना सण साजरा करताना विशेष दक्षता घेण्याचे आवाहन केले आहे. त्यांनी नागरिकांनी काही महत्त्वाच्या सुरक्षा सूचनांचे पालन करुन सण सुरक्षितपणे साजरा करावा, असे अवाहन केले आहे. पोलीस निरीक्षक बालाजी कुकडे यांनी दिलेल्या सूचनांनुसार घरामध्ये मौल्यवान दागिने, रोकड व इतर किमती वस्तू शक्यतो बँकेच्या लॉकरमध्ये किंवा सुरक्षित ठिकाणी ठेवाव्यात. बाहेरगावी प्रवास करताना घरात मौल्यवान वस्तू ठेवू नयेत. गावापासून दूर असलेल्या वाड्यावस्तीवरील घरे किंवा सोसायट्यांतील नागरिकांनी विशेष सतर्कता बाळगावी. बाजारपेठ किंवा गर्दीच्या ठिकाणी महिला व नागरिकांनी आपल्या पर्स, दागिने यांची काळजी घ्यावी. आपल्या परिसरात संशयास्पद व्यक्ती (ज्यांनी चेहऱ्यावर कापड बांधलेले असेल) किंवा नंबर प्लेट नसलेली / परजिल्ह्यातील वाहन दिसल्यास तात्काळ पोलीस ठाण्यात माहिती द्यावी. मंदिर परिसरात असणाऱ्या दानपेट्या व मौल्यवान दागिन्यांच्या सुरक्षेसाठी सुरक्षा रक्षकांची नेमणूक करावी. पोलीस प्रशासन नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी कटिबद्ध असून, दिवाळीचा सण कोणताही अनुचित प्रकार न होता सौहार्दपूर्ण आणि सुरक्षित वातावरणात साजरा व्हावा, यासाठी नागरिकांनी सहकार्य करावे, असे आवाहन पोलीस निरीक्षक बालाजी कुकडे यांनी केले आहे.



### श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिर समितीच्या गोशाळेत वसुबारस साजरी

**पंढरपूर, दि.१७ ऑक्टोबर-**

श्री क्षेत्र पंढरपूर येथील श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिरे समितीच्या वतीने संचालित गोशाळा परिसरात आज वसुबारस सण मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. दरवर्षीप्रमाणे यंदाही वसुबारस निमित्त गोमातेची विधिवत पूजा, आरती, पुष्पहार अर्पण व नैवेद्य अर्पण अशा पारंपारिक पद्धतीने कार्यक्रम पार पडला. गोशाळेतील सर्व गाईंची स्वच्छता, सजावट तसेच परिसर सुशोभित करण्यात आला होता. भाविकांसाठी दर्शनाची उत्तम व्यवस्था करण्यात आली होती. वसुबारस हा दीपावलीतील पहिला दिवस असून गोमातेच्या पूजनाला विशेष धार्मिक महत्त्व आहे.श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिरे समितीच्या वतीने गोसेवा, संवर्धन आणि पर्यावरणपूरक सण साजरा करण्याचा संदेश या कार्यक्रमातून देण्यात आला. यावेळी समिती सदस्य जळगावकर महाराज, नडगिरे उपस्थित होते.

# दिवाळी सणासाठी इम्पोर्टेड व फॅशनेबल कपड्यांची क्रेझ



**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. १७ ऑक्टोबर-**

दिवाळीत प्रत्येकजण कपड्यांची आवर्जुन खरेदी करतात. यावर्षी केंद्र सरकारने जीएसटी मध्ये कपात केल्यामुळे कपड्यांच्या किंमती कमी झालेल्या दिसत आहेत. त्यामुळे नागरिकांची कपडे खरेदीसाठी बाजारात मोठी लगबग आहे.

बाजार पेठेतील प्रत्येक दुकानदारांनी आपल्या दुकानांमध्ये नवीन नवीन फॅशनेबल तसेच सध्याच्या ट्रेण्डनुसार इम्पोर्टेड विविध कपडे विक्रीसाठी उपलब्ध केले आहेत. मात्र यंदा तरुण, तरुणींमध्ये विशेष क्रेझ ही इम्पोर्टेड कपड्यांची असल्याचे दिसून येत आहे. लेडीज, जेंट्स तसेच तहान मुले, मुली, किशोरवयीन युवक, युवती यांना साजेसे विविध प्रकारची वस्त्र प्रावरणे बाजारात आली आहेत. यंदाच्या वर्षी पाच ते दहा कोटींची उलाढाल बाजारपेठेत होण्याची शक्यता आहे. मात्र, अजून मुलांच्या शाळा सुरू असून तसेच शासकीय, खासगी कर्मचाऱ्यांना दिवाळीचा बोनस मिळाला नसल्याने म्हणावी तेवढी गर्दी दिसून येत नाही. रविवार पासून ग्राहकांची गर्दी दिसून येईल, असा व्यावसायिकांचा अंदाज आहे. ग्रामीण भागातील बहुतांश लोक पंढरपूर शहर परिसरात कापड तसेच तयार कपड्यांच्या खरेदीसाठी येत आहेत. मात्र शेतकऱ्यांना अजून साखर कारखान्यांकडून ऊसाची बिले मिळाली नसल्याने अजून फारशी गर्दी नाही.

**पंढरीत सजली रेडिमेड कपड्यांची दुकाने, जीएसटी घटल्याने वाढली खरेदी**

**महानगरातून रेडिमेड कपड्यांची आवक**



पंढरपूर येथील रेडिमेड कापड बाजारपेठेत मुंबई, कोलकाता, सुरत,बेंगलोर, अहमदाबाद, लुधियाना येथून विविध आकर्षक कपड्याचा माल येत आहे.

**दोन, तीन पिढ्यांपासूनची बाजारपेठेत जुनी दुकाने**

पंढरपूर येथील महात्मा गांधी रोड भागात तसेच नवी पेठ परिसरात मोठमोठी कापडाची तसेच तयार कपड्यांची भव्य वस्त्र दालने आहेत. गांधी रोड येथे १९४८ सालापासून, सुमारे ७६ वर्षांपासून काही दुकाने सुरू असून तिसरी पिढी याच व्यवसायात आहे.

**इम्पोर्टेड कंपड्यांची या वर्षी क्रेझ**

यंदाच्या दिवाळी सिझनमध्ये इम्पोर्टेड पेंट, कार्गो पेंट, शर्ट, फोर वे पेंट, कॅज्युएल शर्ट या कपड्यांना मागणी आहे. लेडीज मध्ये घागरा, प्लाझो, धोती, वन पीस मिडी, लहान मुलांमध्ये इंडो वेस्टर्न, शेरवानी, कुडता, कार्गो पैंट या आधुनिक काळात फॅशनेबल असणाऱ्या कपड्यांना सर्वाधिक मागणी आहे.

केंद्र सरकारने १२ टक्के असणारा जीएसटी पाच टक्के केला असल्याने १ हजार २०० रुपये किंमतीचे वरील कपडे सुमारे ७ टक्क्यांनी स्वस्त झाले आहेत. ग्राहकांना एका मटेरियल मागे ७०ते ८० रुपयांचा फायदा होत आहे. यावर्षी इंपोर्टेड टीशर्ट, कार्गो जीन्स, यांना युवावर्गातून मोठी मागणी आहे. दोन तीन दिवसांनी खरेदीसाठी आणखी गर्दी होईल.

**- आप्पासाहेब सावळे, (सोनाली गारमेंट्स, पंढरपूर)**

## पोकलेन मशीन देण्याच्या बहाण्याने १२ लाखांची फसवणूक

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. १७ ऑक्टोबर-**

पोकलेन मशीन खरेदी करुन देण्याचे आमिष दाखवून बार्शीतील व्यापाऱ्याची तब्बल १२ लाखांची आर्थिक फसवणूक झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. याबाबत बार्शी शहर पोलिसांत तक्रार दाखल करण्यात आली आहे.

विठ्ठल दामोदर आहेर, पाण्याच्या बाटलीचा व्यापार, रा. उपळाई रोड, बार्शी, सध्या रा. घाटकोपर, मुंबई) यांनी बार्शीतील अश्विनकुमार श्रीधर भिल्ल (रा. सुभाषनगर, बार्शी) याच्याविरुद्ध ही तक्रार दिली आहे. सन २०२० मध्ये आहेर यांची ओळख त्यांचे साडूचा मुलगा आकाश बारंगुळे यांच्या माध्यमातून अश्विनकुमार भिल्ल याच्याशी झाली. त्यावेळी भिल्ल याने पोकलेन मशीनच्या व्यवसायात मोठा नफा मिळतो, असे सांगून आहेर यांना भागीदारीत व्यावसाय करण्यास प्रवृत्त केले. त्यानुसार दोघांमध्ये व्यवहार ठरला आणि मशीन खरेदीसाठी डाउनपेमेंट म्हणून आहेर यांनी आरटीजीएसद्वारे ५ लाख ५५ हजार रुपये तसेच रोख ६ लाख रुपये अश्विनकुमार भिल्ल याला दिले.

भिल्ल याने मशीन बुलढाणा जिल्ह्यातील पलोड एंटरप्रायजेसकडून खरेदी केल्याचे सांगितले. मात्र तीन महिने उलटूनही मशीन मिळाले नाही. त्यानंतर आहेर व त्यांच्या नातेवाईकांनी प्रत्यक्ष बुलढाणा व नंतर नागपूर येथे जाऊन चौकशी केली असता पोकलेन मशीन अस्तित्वातच नसल्याचे उघड झाले. पैसे परत मागितल्यावर भिल्ल याने पाच कोरे चेक देऊन दोन महिन्यात पैसे देतो, असे आश्वासन दिले. मात्र दिलेल्या चेकपैकी एक चेक (रक्कम रुपये ३,८०,०००) दोन वेळा बँकेत भरला असता तो निधीअभावी परत आला. त्यामुळे भिल्ल याने फसवणूक केल्याची खात्री पटल्याने आहेर यांनी पोलिसांकडे तक्रार दाखल केली. या प्रकरणी अश्विन कुमार श्रीधर भिल्ल (रा. सुभाषनगर, बार्शी) याच्याविरुद्ध फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्याची मागणी करण्यात आली आहे. पोलिसांनी या प्रकरणाचा पुढील तपास सुरु केला आहे.



## ऑपरेशन पहाट अंतर्गत विविध उपक्रम

**मोहोळ, दि. १७ ऑक्टोबर-**

वंचित पारधी समाजाला मुख्य प्रवाहात आणून त्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी ऑपरेशन पहाट अंतर्गत वैद्यकीय तपासणीसह अन्य कार्यक्रम घेतल्याची माहिती मोहोळचे पोलीस निरीक्षक हेमंत शेडगे यांनी दिली.

पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांच्या संकल्पनेतून, अपर पोलीस अधीक्षक प्रीतम यावलकर, उपविभागीय पोलीस अधिकारी संकेत देवळेकर यांच्या मार्गदर्शनाखाली नरखेड ता. (मोहोळ) येथे ऑपरेशन पहाट अंतर्गत एक सामाजिक उपक्रम यशस्वीपणे पार पडला. शासनाच्या पारधी समाजासाठी विविध कल्याणकारी योजनांची माहिती देण्यात आली. आधार कार्ड, पॅन कार्ड आणि रहिवासी दाखला काढण्यासंदर्भात मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटपही करण्यात आले. याप्रसंगी नरखेडचे सरपंच बाळासाहेब मोटे, येलमवाडीचे सरपंच रमेश शिंदे, डिसकळचे सरपंच पंडित धावणे, प्रशांत मोटे, रणजीत उबाळे आदीसह समाजबांधव उपस्थित होते.

## इतरांना मदत करण्यात जगण्यातला खरा आनंद

**आ.श्रीकांत भारतीय : शेतकरी मोफत रक्त प्रदान सप्ताह व फिरते रक्त संकलन केंद्राचा शुभारंभ**

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. १७ ऑक्टोबर-**

इतरांना मदत करत समाजासाठी जीवन जगण्यामध्ये खरा आनंद आहे. भगवंत ब्लड बँकेने गरजूंसाठी अतिवृष्टीचे भान ठेवत केलेला मोफत रक्त प्रदान सप्ताह आदर्शवत आहे. सतत दहा वर्ष चढत्या क्रमाने प्रगतीपथावर राहणारी संस्था निर्माण करणाऱ्या शशिकांत जगदाळे यांचे कार्य कौतुकास्पद असल्याचे गौरवोद्गार विधान परिषद सदस्य व तर्पण फाउंडेशनचे संस्थापक आमदार श्रीकांत भारतीय यांनी काढले.

येथील यशवंतराव चव्हाण सभागृहात भगवंत ब्लड बँक आयोजित शेतकरी मोफत रक्त प्रदान सप्ताह व फिरते रक्त संकलन केंद्राचा शुभारंभ व लोकार्पणप्रसंगी ते बोलत होते. जिल्हा पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी अध्यक्षस्थानी होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून स्वनाथ फाउंडेशनच्या संस्थापक डॉ. श्रेया भारतीय उद्योजक व बाजार समिती प्रशासक नानासाहेब राऊत, माजी आमदार राजाभाऊ राऊत यांच्या पत्नी कविताताई राऊत, बाजार समिती माजी सभापती रणवीर राऊत, कोमल राऊत, मृणाल राऊत, माजी नगराध्यक्ष असिफ तांबोळी, रमेश पाटील उपस्थित होते.

संयोजक व चेअरमन शशिकांत जगदाळे यांनी प्रास्ताविकातून श्री.भारतीय हे माझ्या आयुष्यातील टर्निंग पॉईट असून मला लाभलेला परिस स्पर्श आहे. त्यांनी दिलेल्या सामाजिक जाणीवांच्या वैचारिक दिशेनुसार काम करत आहे. माजी आमदार राऊत यांनी खंबीर पाठबळ दिल्याचे जगदाळे यांनी यावेळी सांगितले. यावेळी जिल्हा पोलीस अधीक्षक तथा पिंपळगावचे पालक अतुल कुलकर्णी म्हणाले, भगवंत ब्लड बँकेच्या माध्यमातून जगदाळे यांनी केलेल्या कामामुळेच आज वेगवेगळ्या क्षेत्रातील दिग्गज मान्यवर येथे आले आहेत. शेतकरी जागृत होणे गरजेचे आहे. पायाभूत सुविधा निर्मिती बरोबरच शेतीचा विकास आणि रोजगार निर्मिती होणे गरजेचे आहे.गरजूंनी मोफत रक्त प्रदान सप्ताहाचा लाभ घेण्याचे आवाहन त्यांनी यावेळी केले. यावेळी प्रशासक नानासाहेब राऊत, डॉ. श्रेया भारतीय यांचेही भाषण झाले. यावेळी भारतीय दांपत्याचा प्रतिमा देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी प्रशांत कथले, संतोष निंबाळकर, केशव घोगरे, भाजपा तालुका प्रमुख मदन दराडे व बबन गडदे, संदेश काकडे, पंढरपूरचे शिक्षण संस्था चालक डॉ. बी.पी. रोंगे, भाजपा शिक्षक आघाडीचे प्रदेशाध्यक्ष डॉ. प्रशांत कोल्हे, जन्मभूमी प्रतिष्ठानचे संस्थापक नानासाहेब धस, सचिव स्वप्नील धस आदी मान्यवर उपस्थित होते. नीता देव यांनी सूत्रसंचालन केले. किरण कोकाटे यांनी आभार मानले.




> अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांवर कोसळलेले संकट मोठे असून या काळात भगवंत ब्लड बँकेच्या माध्यमातून शशिकांत जगदाळे गरजूंना मोफत रक्त देण्यासाठी करत असलेला उपक्रम व रक्तदात्यांसाठी मोबाईल व्हॅन उपक्रम कौतुकास्पद असून ग्रामीण भागातील युवकांसाठी युथ आयडॉल असणारे शशिकांत जगदाळे यांची वाटचाल कौतुकास्पद असून कायम भगवंत बँकेच्या पाठीशी भविष्यातही राहणार आहे, अशा शुभेच्छा माजी आमदार राजभाऊ राऊत यांनी यावेळी आपल्या संदेशामध्ये दिल्या.

## ससाणे सोसायटीच्यावतीने पूरग्रस्तांना मदत

**करमाळा, दि. १७ ऑक्टोबर-**

येथील श्री रामचंद्र बहुउद्देशीय सामाजिक सेवाभावी संस्था तसेच पुणेच्या हडपसरमधील ससाणे नगरच्या न्यू इंग्लिश स्कूल आणि ज्युनिअर कॉलेजच्या संयुक्त विद्यमाने कमलाई नगरी कार्यालयात पूरग्रस्तांना मदत करण्यात आली.

पूरग्रस्तांना दैनंदिन वापराच्या गरजेच्या वस्तू आणि किराणा सामान जमा केल्या होत्या. शाळेच्या या मदतीमध्ये शाळेचे चेअरमन अजित ससाणे आणि शाळेचे सर्व संचालक, पालक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी वस्तू स्वरूपात गरजू व्यक्तींपर्यंत त्या देण्याची जबाबदारी दिली. त्यानुसार संस्थापक अध्यक्ष जयंत दळवी, उपाध्यक्ष सुनंदा दळवी व सीए भैरवनाथ चौधरी यांनी पुरग्रस्तांना मदत पोहोचवली. यावेळी न्यू इंग्लिश स्कूलचे अध्यक्ष अजित ससाणे, उपाध्यक्ष प्रितम ससाणे, सचिव सचिन ससाणे, खजिनदार नितीन ससाणे, संचालक निलेश ससाणे, सुधिर ससाणे, राजेंद्र ससाणे, गणेश ससाणे, प्रसाद ससाणे यांच्या मार्गदर्शनाखाली प्राथमिकच्या प्राचार्या श्रीया पत्तार, माध्यमिकच्या प्राचार्या भानुमती नायडू, शिक्षिका सुनंदा दळवी, ज्योती फासगे, स्वाती बधे, सिमा सातव, गणेश पाटील, लक्ष्मण नेटके उपस्थित होते.

## निधन वृत्त...

### चंद्रकांत व्हसाळे



**सोलापूर, दि. १७ ऑक्टोबर-**

चंद्रकांत अनंतराज व्हसाळे (वय ८७) यांचे शुक्रवार १७ ऑक्टोबर रोजी वृद्धपकाळाने निधन झाले आहे. त्यांच्यामागे पत्नी २ मुले ३ मुली सुना, नातवंडे, जावई असा परिवार आहे. त्यांचा अंत्यविधी शनिवार १८ ऑक्टोबरला सकाळी ९ वाजता मोदी स्मशानभूमी येथे होणार आहे. ज्ञानोदय प्रशालाचे शिक्षक व भारतीय जैन संघटना जिल्हा अध्यक्ष देशभूषण व्हसाळे यांचे ते वडिल होत.

### आनंद लछमापुरे



**सोलापूर, दि. १७ ऑक्टोबर-**

आनंद यल्लादास लछमापुरे (वय ५२, रा. भुलाभाई चौक) यांचे गुरुवारी सकाळी निधन झाले. त्यांच्या पश्चात वडील, पत्नी, मुलगा आणि मुलगी असा परिवार आहे. त्यांच्या पार्थिवावर १७ ऑक्टोबर रोजी शुक्रवारी सकाळी अंत्यसंस्कार करण्यात आले. भंडारी समाज ज्ञाती संस्थेचे अध्यक्ष यल्लादास लछमापुरे यांचे ते ज्येष्ठ चिरंजीव होत.

### धर्मा हाटकर



**सोलापूर, दि. १७ ऑक्टोबर-**

दक्षिण सोलापूर तालुक्यातील धोत्री येथील शेतकरी धर्मा रामा हाटकर (वय १०८ वर्षे) यांचे गुरुवार दि. १६ ऑक्टोबर रोजी सायंकाळी ७ वाजता मी निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर शुक्रवारी १७ ऑक्टोबर रोजी सकाळी धोत्री येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, तीन मुली, नातवंडे, परतुंड असा परिवार आहे. मातंग समाजाचे नेते सुरेश पाटोळे यांचे ते सासरे होत.

# अंबाजोगाईच्या बहाद्दर प्राध्यापकाची कथा

**अंबाजोगाईची नवी पिढी**

गेली काही वर्षे महाविद्यालयात जाण्याचा योग फारसा आलेला नाही. त्यामुळे कोविड नंतरची महाविद्यालय आणि त्यांची झालेली वाताहत आपल्याला पाहवणार नाही म्हणून फारसा प्रयत्न पण केला नाही. आमच्या गुड मॉर्निंग ग्रुपचे डॉ. कल्याण सावंत सरांनी मला तीन महिने आधी बजावून सांगितले की माझ्या महाविद्यालयात तुम्हाला यावच लागणार आहे. सावंत सर तसा उमदा माणूस. ज्ञान प्रबोधिनीचे पालक त्यामुळे अजून जवळीक. उंचापुरा, तगडा आमच्या ग्राऊंडवर उठून दिसणारा हा तरुण. चुकून सुद्धा कधी ते ग्राऊंडवर यायचे विसरत नाहीत.

दिवस २४ सप्टेंबर सकाळी ९ वाजता मी आढेवेढे घेत सरांच्या बरोबर जायला तयार झालो. प्रवासात माझे पुराण संपले आणि सरांच्या बाबत जाणून घेऊ लागलो. सर धारूरचे. दहावी पर्यंतचे शिक्षण तिथे झाले आणि मग अंबाजोगाई. इथून त्यांची घोडदौड सुरू झाली ती थांबली Phd करूनच. उच्च शिक्षणातील सर्व परीक्षा पहिल्या दमात पास. अभ्यासाच्या शिवाय महाविद्यालयातील सर्वच क्षेत्रात त्यांनी उत्तुंग भरारी घेतली. NSS आणि NCC तर जीव की प्राण.

महाविद्यालयातून बाहेर पडल्यानंतर प्राध्यापक होण्याचे स्वप्न काही दिवसातच पूर्ण आणि तेही देवगिरी महाविद्यालयात. एक जबरदस्त कॉलेज. काही दिवस सरांनी काम केलं आणि त्यांना हाक आली एका अशा महाविद्यालयाची की जिथे वरिष्ठ महाविद्यालयात शिकण्यासाठी बाहेरच्या राज्यातून मुलं येतात. कॉलेज सगळ्यात टॉपचे. अगदी प्राध्यापकांच्या नियुक्तीची कोटी रुपयांची उलाढाल सर्वत्र चालू आहे. या महाविद्यालयात मात्र एक नया पैसा पण नियुक्तीसाठी घेतला जात नाही. सरांची मुलाखत झाली. भरपूर स्पर्धा होती. बाहेर आल्यावर मित्रांनी विचारले कशी झाली मुलाखत ?



' जर महाविद्यालयाचे आधीच कुणाला घायचे ठरले नसेल तर माझी निवड पक्की !! ' काय जबरदस्त आत्मविश्वास !! आणि आत्मविश्वास निवडला गेला.

मी आणि सर कॉलेजमध्ये पोहोचलो. कॉलेज एकदम मुलांनी गजबजलेलं. जिकडे पाहावे तिकडे विद्यार्थी. सकाळी ८ ते सायंकाळी ६ पर्यंत विद्यार्थी महाविद्यालयात त्यानंतर शेवटी मुलांना हकलावे लागते. प्रत्येक महाविद्यालयाचे चैतन्य म्हणजे विद्यार्थी. आज तेच लोप पावत आहे. मुलांनी बहरलेलं महाविद्यालय मी कित्येक वर्षात पहिल्यांदाच पहात होतो. मला एकदम उभारी आली. सर NSS विभागाचे प्रमुख. त्यांनी खास करून हा विभाग मागून घेतलेला. अतिशय चोख आर्थिक व्यवहार आणि वर्षाच्या शेवटी काही तूट आली तर प्राध्यापक ती भरून काढतात हे एक नवलच. NSS विभाग पण विद्यार्थ्यांनी भरून गेला होता. आम्ही येण्याच्या आधीच विद्यार्थ्यांनी सर्व तयारी करून ठेवली होती. आज NSS चा स्थापना दिवस आणि माझे ग्रामीण भागातील अनुभव कथन असा योग होता. मी महाविद्यालयात गेल्यावर पहिल्यांदा स्वच्छता गृहात जातो. विशेष करून विद्यार्थी जे वापरात ते !! त्यावरून बरेच काही कळते. मी इथे मात्र अचंबित झालो. अगदी इस्रायल मधील विश्व महाविद्यालयातील स्वच्छता गृह पण या पेक्षा स्वच्छ नव्हती. बदाम,नाव,चित्र आणि शिव्या तर दूरच.

कार्यक्रम सुरू झाला आणि विद्यार्थ्यांची उपस्थिती चिक्कार अगदी पाचशेच्या वर. प्राचार्य चक्क आपल्या तासावर होते म्हणून थोडे उशिरा आले. सोबत उपप्राचार्य होते. कार्यक्रम जोरदार झाला. मला तर बोलताना प्रचंड ऊर्जा मिळाली. कार्यक्रम संपेपर्यंत कोणताही विद्यार्थी जागचा उठला नाही. NSS च्या कॅम्प मध्ये पूर्ण ९ दिवस ५०च्या वर विद्यार्थिनी निवासी असतात. त्याच सोबत विभागप्रमुख. सावंतसरांना तर राज्य शासनाचा उत्कृष्ट प्रकल्प अधिकारी म्हणून पुरस्कार मिळलेला आहे. गेले कित्येक वर्षे ते ही आघाडी तर सांभाळत आहेतच पण सकाळी ८ ते रात्री ८ असे महाविद्यालयात ते नियमित असतात. रजा नावाची भानगड नाही. याशिवाय Phd च्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन. बाकी पडेल ते काम !! कशाला नाहीच नाही. कार्यक्रम संपल्यावर आम्ही प्राचार्यांच्या सोबत गेलो. त्यांनी प्रेमाचा आग्रह केला आपल्या कँटीन मध्ये जेवून जा !! कुठल्या हॉटेल मध्ये नाही ह !! आणि जेवण अल्पोपहार नाही.

तसा दिवसभर मी महाविद्यालयातच थांबणार होतो. मग उपप्राचार्यांना भेटायला गेलो. मस्त नितळ माणूस. एका प्रथम वर्षाच्या मुलाला त्यांनी चक्क अर्धातास समुपदेशन केले. प्रचंड काम असताना पण मुलांना इतका वेळ देणारे प्राचार्य आणि उपप्राचार्य मी पहिल्यांदा पहात होतो. कँटीन मधील जेवण अप्रतिम होते. मी तसा भोजन आणि चव बहाद्दर !! कमालीची चव अन्नाला. महाविद्यालयातील प्राध्यापक कँटीनची देखरेख करतात. कंत्राटदार नाही !! विशेष म्हणजे हे महाविद्यालय कोण्या एका विचाराचे नाही. सगळ्यांना प्रवेश आहे. नाही तर मला अंबाजोगाईत आज काल ही वैचारिक अस्पृश्यता खूप जाणवते. हे सर्व अनुभवताना मला एक मात्र कमालीचे जाणवत होते की डॉ कल्याण सानप सरांच्या बाबतीत. विद्यार्थी, प्राध्यापक आणि प्राचार्य यांना कमालीचा आदर आहे. आमच्या अंबाजोगाईच्या बहाद्दराने महाविद्यालय आपल्या कामाने जिंकले !! कमालीची गोष्ट अशी की सरांनी सांगितले तर वरिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थी उठाबशा काढतो हे मला विद्यार्थ्यांनी सांगितले !!

आता या महाविद्यालयाच्या संस्थाचालकांच्या बाबत थोडं समजून घेतले पाहिजे. संस्थेचे सचिव ९१ वर्षांचे तरुण. रोज महाविद्यालयात येतात. अगदी आठ तास. रिसर्च कमिटीची बैठक चालू होती. सचिव तिथे आले. त्यांना बैठकीची कल्पना नव्हती. सगळे प्राध्यापक उठून उभारले. सचिवसर एकदम म्हणाले मला माफ करा मी तुमच्या कामात व्यत्यय आणला. अगदी प्रामाणिक माफी मागून ते मागे वळले. आजचे संस्थाचालक हे संस्था मालक आणि राजे. भ्रष्ट्राचारी नसतील तर हुकूनशहा !! इथले सगळेच संस्थेचे पदाधिकारी संस्थेचे सेवक आहेत.मन भरून पावलं. शिक्षणाच्या पंढरीतून आमच्या कल्याण रुपी विठुरायाच्या सोबत परत अंबाजोगाईला निघालो.

महाविद्यालयाचे नाव मुद्दाम लिहिले नाही. आपण मला जरूर सांगा हे महाविद्यालय कोणते ? डॉ कल्याण सावंत सरांचा मोबाईल नंबर ९४०३५९१८४१ जरूर फोन करा.

तुम्हाला नक्कीच एक छान मित्र मिळेल !!



सोलापूर : नवी पेठ येथील नारायण पेठकर यांच्या निवासस्थानासमोर वसुबारसनिमित्त वासरासह गाईचे पूजन करताना महिला.

# दिवाळी धमाका : सोलापुरातील नेत्यांची भाजपा प्रवेशासाठी लागली रांग

## ● दोन माजी उपमहापौरांसह पाच माजी नगरसेवकांचा मुंबईत भाजपात प्रवेश

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ ऑक्टोबर-**

आगामी महापालिका निवडणुकीच्या निमित्ताने भाजपाने दिवाळीपूर्वीच मोठा धमाका केला आहे. शहरात ऑपरेशन लोटस यशस्वी झाले असून गुरुवारी रात्री मुंबईत एका महत्त्वाच्या बैठकीत दोन माजी उपमहापौर, पाच माजी नगरसेवक यांच्यासह मातब्बरांनी भाजपात प्रवेश केला आहे.

काही जणांची घरवापसी झाली आहे. यामुळे भाजपला अधिक बळ मिळाले आहे. मुंबई येथे झालेल्या महत्त्वपूर्ण बैठकीत हा प्रवेश कार्यक्रम पार पडला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची वर्षा निवासस्थानी भेट घेऊन सविस्तर चर्चा केल्यानंतर प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या उपस्थितीत पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या नेतृत्वाखाली हा पक्षप्रवेश करण्यात आला. यावेळी आ. सचिन कल्याणशेट्टी, आ. देवेंद्र कोठे, शहराध्यक्षा रोहिणी तडवळकर, महिला अध्यक्षा रंजीता चाकोते आदी पदाधिकाऱ्यांची उपस्थिती होती. यावेळी माजी उपमहापौर पद्माकर काळे, माजी उपमहापौर दिलीप कोल्हे, माजी सभागृह नेता सुरेश पाटील, बिज्जू प्रधाने, माजी नगरसेवक गुरुशांत धुत्तरगांवकर, माजी नगरसेवक सुभाष डांगे, माजी नगरसेविका मंदाकिनी तोडकरी, मारुती तोडकरी, माजी नगरसेविका कल्पना क्षीरसागर, नागनाथ क्षीरसागर, सुनील भोसले, बिपीन पाटील, मदन क्षीरसागर, रवी काळे, मेघराज कल्याणकर, बाळासाहेब तांबे, सुरेश तोडकरी आदींनी भाजपा मध्ये अधिकृत प्रवेश केला.



### दिलीप माने, राजन पाटील, यशवंत माने, रणजित शिंदे भाजपाच्या वाटेवर...

गुरुवारी रात्री शहरातील काही माजी महापौर, माजी नगरसेवकांसह पदाधिकाऱ्यांनी भाजपात प्रवेश केला. आता माजी आमदार दिलीप माने, राजन पाटील, यशवंत माने यांच्यासह माढ्याचे माजी आमदार बबनदादा शिंदे यांचे चिरंजीव रणजित शिंदे हे देखील भाजपाच्या वाटेवर आहेत. दिलीप माने यांनी आपण भाजपात का चाललो आहे याचे विश्लेषण केलेले असून विधानसभा निवडणुकीनंतर आजतागायत काँग्रेसकडून आपणास कोणतीही विचारणा केलेली नसल्याची खंत व्यक्त केली. कार्यकर्त्यांचा आग्रह असल्याने आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या धडाकेबाज कार्यपध्दतीच्या प्रभावाने आपण भाजपात प्रवेश करीत असल्याचे माने यांनी स्पष्ट केले आहे.

## महत्वाचे...



### समर्थ ज्येष्ठ नागरिक संघाच्या अध्यक्षपदी शिवलिंग शहाबादे

**सोलापूर, दि. १७ ऑक्टोबर-**

समर्थ ज्येष्ठ नागरिक संघाच्या अध्यक्षपदी शिवलिंग शहाबादे यांची निवड झाली. माजी नगरसेवक चंद्रकांत रमणशेट्टी, माजी परिवहन समिती सभापती महादेव पाटील, मार्गदर्शक अशोक खानापुरे, चंद्रकांत बिराजदार यांच्या उपस्थितीत ही निवड प्रक्रिया करण्यात आली. **अन्य पदाधिकारी असे :** सचिव : सुनील पुजारी, उपाध्यक्ष : चंद्रकांत रमणशेट्टी, सहसचिव : अंबादास बिराजदार, कोषाध्यक्ष : शरणाप्पा यारगले, स्वीकृत सदस्य : मल्लिनाथ कट्टे, मल्लिनाथ बताले. कार्यकारणी सदस्य : कस्तुरी अक्कलकोटे, महानंदा बावी, विश्वनाथ कल्याणशेट्टी, काशिनाथ मेलगिरी, आप्पाराव विभुते, महादेव पाटील, अशोक खानापुरे, विजयराव काटोलकर.



### ए. जी. पाटील पॉलिटेक्निक इन्स्टिट्यूटमध्ये वाचन प्रेरणा दिन साजरा

**सोलापूर, दि. १७ ऑक्टोबर-**

माजी राष्ट्रपती डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त ए. जी. पाटील पॉलिटेक्निक इन्स्टिट्यूटमध्ये वाचन प्रेरणा दिन हा अभिनव उपक्रम साजरा करण्यात आला. या अभियांतर्गत महाविद्यालयाच्या ग्रंथालयातील वाचनकक्षेत विद्यार्थ्यांसाठी सामुहिक वाचन घेण्यात आले. यात ग्रंथालयात उपलब्ध अवांतर वाचनाच्या पुस्तकांचे विद्यार्थ्यांनी वाचन केले. विद्यार्थ्यांना निरंतर वाचनाची सवय लागावी यासाठी कोणती पुस्तके वाचावी, कशी वाचावीत याबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी वाचन कौशल्य संवाद कार्यशाळा राबवण्यात आले आहे. यावेळी महाविद्यालयातील प्राध्यापक एन. बी. पवार व प्राध्यापिका एल. एस. बिराजदार यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. महाविदयालयाचे ग्रंथपाल एस. व्ही कस्तुरे यांनी विद्यार्थ्यांना पुस्तक वाचनाचे महत्त्व सांगताना चांगला वाचक हा चांगला लेखक बनू शकतो याबाबत मार्गदर्शन केले. या उपक्रमासाठी संस्थेचे अध्यक्ष एस.ए. पाटील, संस्थेचे सचिव एस एस पाटील, प्राचार्य डॉ एम ए चौगुले व उपप्राचार्य एस.के. मोहिते यांचे मार्गदर्शन लाभले.



### महात्मा बसवेश्वर आयटीआयच्या प्राचार्यपदी मनोज बिडकर

**सोलापूर, दि. १७ ऑक्टोबर-**

सोलापूरच्या विजापूर रोडवरील महात्मा बसवेश्वर शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्या प्र.प्राचार्यपदी मनोज बिडकर यांची बदली झाली असून त्यांनी शुक्रवार दि.१७ ऑक्टोंबर रोजी पदभार घेतला, त्यांचे स्वागत संस्था व्यवस्थापन समितीचे सदस्य पत्रकार दशरथ वडतिले, प्रिती उडानशिव तसेच मंत्री मंगलप्रभात लोढा यांचे पी.ए. संतोष गायकवाड, उपप्राचार्य एस.एस.झणझणे, वरिष्ठ गटनिदेशक सिद्राम गोलेकर, संघटनेचे पदाधिकारी, शिक्षक कर्मचारी आदींनी बिडकर यांचे स्वागत करून त्यांना शुभेछ्या दिल्या. बिडकर हे कल्याण येथून बदलून आले आहेत.विद्यमान प्राचार्य सुरेश भालचीम यांची पुणे येथे बदली झाली आहे. भालचीम यांनी अनेक पदभार सांभाळत वर्षभरात भरीव कामगिरी केली असून, त्यांनी संस्थेचा चेहरामोहरा बदलून टाकला आहे.

### रानडुकाराने शेतकऱ्याचा घेतला चावा

**सोलापूर, दि. १७ ऑक्टोबर-**

शेतात पाणी देत असताना रान डुकराने शेतक-याच्या पायाला चावा घेतला तसेच डोक्याने मारले. ही घटना मोहोळ तालुक्यातील आपटी येथे गुरुवारी सायंकाळी सहाच्या सुमारास घडली.सत्यवान आप्पा कांबळे (वय ३०) असे डुकराने चावा घेतलेल्या शेतक-याचे नाव आकहे. सत्यवान हा गुरुवारी सायंकाळी सहाच्या सुमारास आपटी गावाच्या परिसरातील शेतातील पिकाला पाणी देत होता. तेव्हा अचानक तेथे आलेल्या रान डुकाराने त्यास डोक्याने मारले. त्यानंतर दोन्ही पायाली चावा घेतला. गावातील खासगी रुग्णालयात उपचार करून आई झुंबर यांनी रात्री ११.४५ वाजता शासकीय रुगणालयात दाखल केल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

# बॅक ऑफ महाराष्ट्रच्या खातेधारकांची ३ लाख २८ हजारंची फसवणूक

**अकाऊंट नंबर चुकल्याचे सांगून ड्रॉप बॉक्समधून चेक काढून दुसऱ्या बँकेत वटवून फसवणुक**

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १७ ऑक्टोबर -**

अकौंट नंबर चुकल्याचे सांगून ड्रॉप बॉक्समधून चेक काढून दुसऱ्या बँकेत वटवून बॅक ऑफ महाराष्ट्रमधील खातेधारकांची ३ लाख २८ हजारंची फसवणुक करणाऱ्या दोघांविरुध्द विजापूर नाका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यािबाबत विक्रम कुमार मितलेशप्रसाद सिंग (रा. ज्ञानेश्वर नगर, जुळे सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन दोघांविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

विक्रम कुमार सिंग हे बँक ऑफ महाराष्ट्र च्या जुळे सोलापूर शाखेत कार्यरत आहेत. २४ सप्टेंबर रोजी दुपारी एका अनोळखी व्यक्तीने बँकेच्या शाखेत येऊन त्याने बँकेतील ड्रॉप बॉक्समध्ये जमा केलेल्या चेक स्लीपवरील अकौंट नंबर चुकला आहे, तो दुरूस्त करायचा आहे, तो चेक मला काढून द्या असे सांगून विक्रम कुमार याची दिशाभूल केली. त्यावेळी विक्रम कुमार याने ड्रॉप बॉक्समधील निलकंठ को-ऑप. बँक लि. खाते क्र. ००२०००६०७००००००५६ याचा ३ लाख २८ हजार १८६ रुपयांचा चेक क्रं. ०००२७४ हा घेऊन त्यात फेरफार करून युको बँक खाते क्र. ०३४४०११०६२२३४ यामध्ये वटवून घेऊन रक्कम काढून घेऊन डोअर्स वर्ल्ड यांच्या औंदुबर शिंदे व हरिभाऊ माने यांची फसवणुक केली.

म्हणून विजापूर नाका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस निरीक्षक वराळे पुढील तपास करीत आहेत.

## ● माजी उपसरपंच गोविंद बर्गे आत्महत्या प्रकरण

# नर्तिकी पुजा गायकवाडचा जामीन अर्ज फेटाळला

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १७ ऑक्टोबर -**

माजी उपसरपंच गोविंद जगन्नाथ बर्गे आत्महत्या प्रकरणातील आरोपी नर्तिकी पुजा गायकवाड हिचा जामीन अर्ज जिल्हा व सत्र न्यायाधीश व्ही एस मलकलपत्तेरेड्डी यांनी फेटाळला.

लुखामसला (जि.बीड) येथील माजी सरपंच गोविंद बर्गे हे ठेकेदार आहेत. पारगाव (जि. धाराशिव) येथील तुळजाभवानी कला केंद्रातील नर्तिकी पुजा गायकवाड हिच्याकडे जात होते. ओळखीचे रूपांतर प्रेमात झाले. मी तुमची मालकीण म्हणुन काम करते, परंतु तुम्ही मााझा घरखर्च व माझा घरसंसार पाहायचा, अशी अट पूजाने गोविंदला घातली. हे प्रेमसंबंध सुरू असताना, नर्तिकी पुजा गायकवाड हिने स्वतः साठी व तिच्या नातेवाईकांसाठी महागडे मोबाईल, बुलेट गाडी, घराचे बांधकाम, वैराग येथे प्लॉट, नातेवाईकांच्या नावावर शेतजमीन, सोने-नाणे गोविंद बर्गे यांच्याकडून मिळवल्या. गोविंद बर्गे यांनी गेवराईत मोठा बंगला बांधला होता. तो बंगला तिच्या नावावर करण्याचा तगादा तिने सुरू केला. तो पुजाच्या नावावर करण्यास नकार देत दुसरा बंगला घेवून देण्याचे आश्वासन बर्गे यांनी दिले. तरीसुध्दा, नर्तिकी पुजाने तगादा लावून बर्गे यांना ब्लॅकमेल केले. ५ एकर शेती घेवून देण्याचा आग्रह त्यांचेकडे धरला आणि ते न दिल्यास बर्गे यांच्यावर बलात्काराचा गुन्हा दाखल करण्याची धमकी दिली व बोलणे बंद केले. याचा मानसिक त्रास बर्गे यांना झाला. सदरची बाब बर्गे यांनी मित्राजवळ सांगितली. सरते शेवटी नर्तिकी पुजाच्या आर्थिक, मानसिक व शारीरिक त्रासाला कंटाळून, ९ सप्टेंबर २०२५ रोजी सकाळी ८ च्या सुमारास पिस्टलने डोक्यात गोळी घालून आत्महत्या केली. त्यानंतर बर्गे यांचा मेव्हणा लक्ष्मण जगन्नाथ चव्हाण यांनी वैराग पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. नर्तिकी पुजा गायकवाड हिचेविरूध्द गुन्हा दाखल झाल्यानंतर तिला १० सप्टेंबर रोजी पोलीसांनी अटक केली. नर्तिकी पुजा ही सध्या न्यायालयीन कोठडीत असून तिने जामीनासाठी न्यायालयात अर्ज केला होता. सुनावणीवेळी जिल्हा सरकारी वकिल डॉ. प्रदिपसिंग राजपूत यांनी जामिनास तीव्र विरोध केला. सदर प्रकरणात जर नर्तिकी पुजा हिला जामीन मंजूर झाल्यास समाजामध्ये चुकिचा संदेश जावून नर्तिकी पुजा गायकवाड हिच्यासारख्या महिलांकडून अनेक पुरूषांची आर्थिक, मानसिक व शारीरिक छळ होण्याची शक्यता नाकारता येणार नाही. त्यामुळे, नर्तिकी पुजा हिला जामीन देऊ नये असा युक्तीवाद केला. त्यानुसार न्यायालयाने नर्तिकी पुजाचा जामीन अर्ज फेटाळला. या प्रकरणात जिल्हा सरकारी वकिल डॉ. प्रदिपसिंग राजपूत आरोपीतर्फे ॲड. आर.डी. तारके यांनी काम पाहिले.



# जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते ५०० पूरग्रस्त कुटुंबांना संसारोपयोगी साहित्य वाटप

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ ऑक्टोबर-**

आई प्रतिष्ठानतर्फे पूरग्रस्त गावातील ५०० कुटुंबांना जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांच्या हस्ते संसारोपयोगी साहित्य वाटप करण्यात आले. पुराचा फटका बसलेल्या तेलगाव, पाथरी, तरटगाव, तिर्हे, बोळकवठे आदी अनेक गावातील ५०० कुटुंबांना हे साहित्य देण्यात आले. यात बादली, मग, साडी, टॉवेल, दोन ताट, चार वाट्या, दोन तांब्या, दोन ग्लास, ड्रेस मटेरियल पणत्या, साबण, दिवाळी फराळ अशा अनेक वस्तूंचा समावेश आहे.

याबाबत आई प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष मोहन डांगरे म्हणाले, ज्या गावांमध्ये पुराचे पाणी मोठ्या प्रमाणात शिरले होते अशा गावातील शेतकऱ्यांना दिवाळी साजरी करणे जिकरीचे बनले आहे. याचा विचार करून पूरग्रस्त शेतकऱ्यांनाही दिवाळी सर्वसामान्यांप्रमाणेच साजरी करता यावी याकरिता आई प्रतिष्ठानच्यावतीने ५०० कुटुंबीयांना संसारोपयोगी साहित्य देण्यात आले. पूरग्रस्तांच्या आनंदात आपणही सहभागी व्हावे याकरिता आई प्रतिष्ठानतर्फे हा उपक्रम राबविण्यात आला, असेही आई प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष मोहन डांगरे यांनी सांगितले. यावेळी आई प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष मोहन डांगरे, योगेश डांगरे, राहुल डांगरे, शुभम चिट्याल, व्यंकटेश बंडा, उमेश चिट्याल, समर्थ चिलवेरी आदी उपस्थित होते.



# राष्ट्रवादीने साजरी केली काळी दिवाळी

**● आम्ही येथे शेतकऱ्यांसाठी काळी दिवाळी आंदोलन करत असताना भाजप मात्र प्रवेशोत्सवामध्ये मग्न : खा. धैर्यशील मोहिते-पाटील**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१७ ऑक्टोबर-**

सोलापूर जिल्ह्यात झालेल्या अतिवृष्टी मुळे अनेक तालुक्यात महापूर येऊन सर्व शेत जमीन वाहून गेल्याने बळीराजा चिंताक्रांत झाला आहे. अशा हालाखीच्या आणि दुःखी प्रसंगात सरकारने शेतकऱ्यांना आणि बाधितांना केवळ निधी जाहीर केला. परंतु तो निधी अत्यंत तोकडा असून तो देखील आत्तापर्यंत संबंधित शेतकरी आणि बाधितांच्या खात्यावर वर्ग केला नसल्याने राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरद पवार गटाच्यावतीने यंदाची दिवाळी ही काळी दिवाळी म्हणून साजरी करण्यात आली. सोलापूर जिल्हा परिषद येथे मूक आंदोलनातून राज्य सरकारचा निषेध व्यक्त करण्यात आला.

दरम्यान, या आंदोलनासाठी खा. धैर्यशील मोहिते पाटील, आमदार उत्तम जानकर यांची उपस्थिती होती. यावेळी खासदार धैर्यशील मोहिते पाटील म्हणाले की, एकीकडे शेतकरी आणि पुराने बाधित झालेल्या नागरिकांच्या समोर अनंत अडचणी असताना सत्ताधारी भाजप मुंबईमध्ये प्रवेशोत्सव करण्यात मग्न आहे. मुख्यमंत्र्यांनी राज्यात लक्ष द्यावे. तातडीने शेतकऱ्यांना तसेच बाधित पूरग्रस्तांना कोणतीही अट न लावता सहायता निधी खात्यात वर्ग करावा. यावेळी आ.उत्तम जानकर, शहराध्यक्ष सुधीर खराटमल, जिल्हाध्यक्ष वसंतराव देशमुख, जिल्हा कार्याध्यक्ष रविंद्र पाटील, प्रदेश उपाध्यक्ष भारत जाधव, जनरल सेक्रेटरी चंद्रकांत पवार, महिला अध्यक्ष सुनीता रोटे, माजी मंत्री लक्ष्मण ढोबळे, आदींसह शहर व जिल्ह्यातील पदाधिकारी कार्यकर्ते महिला उपस्थित होते.



# जिल्हा काँग्रेस कमिटीची जम्बो कार्यकारणी जाहीर

**जिल्हाध्यक्ष सातलिंग शटगार यांची माहिती**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ ऑक्टोबर-**

काँग्रेस पक्षाच्या सोलापूर जिल्हा अध्यक्ष पदावर सातलिंग शटगार यांची निवड झाल्यानंतर नव्या कार्यकारणीकडे सोलापूर जिल्ह्याचे लक्ष लागून राहिले होते. नव्या कार्यकारणीमध्ये कोणाला संधी देणार, कोणाला डावलले जाणार आहे. याची उत्सुकता सर्व पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांना लागली होती.

अखेर नूतन जिल्हाध्यक्ष सातलिंग शटगार यांनी ऐन दिवाळीत जम्बो कार्यकारणी जाहीर केली आहे. या जम्बो कार्यकारणीमध्ये तब्बल ११९ जणांना विविध पदावर काम करण्याची संधी देण्यात आली आहे. दरम्यान, या कार्यकारणीत वरिष्ठ उपाध्यक्ष ९, उपाध्यक्ष २५, समन्वयक १, खजिनदार १, संघटक १, प्रसिद्धी प्रमुख १, सरचिटणीस २३, चिटणीस २५, कार्यकारणी सदस्य १३, अशी १०० जणांची कार्यकारणी पत्रकाद्वारे जाहीर करण्यात आली आहे. यांसह ब्लॉक अध्यक्ष १२, आणि शहराध्यक्ष ७ यांची ही निवड करण्यात आली आहे. असे एकूण ११९ सदस्यांची कार्यकारणी नावानिशी जाहीर करण्यात आली असून, सर्व समाजातील पदाधिकारी व कार्यकर्त्यांना या मंदी संधी देण्यात आली असून आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या अनुषंगाने सर्वांनी कार्यरत रहावे असे आवाहन जिल्हाध्यक्ष शटगार यांनी केले आहे.

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तरुण भारत कार्यालय, स्वेतसागर निवास, राजमाता जिजामाता महाविद्यालयजवळ, पत्रकार रोड, शिवनगर, जि. लातूर - ४१३५१२. कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. दूरध्वनी : ९४२२६१२२४५/८८८८८४७२३९ ● मुख्य समुह संपादक : **दिलीप यशवंत पेठे.** ● मुख्य संपादक : **प्रशांत वसंतराव माने** (पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे) दैनिक सोलापूर तरुण भारत. **RNI No. MAHMAR/2023/86477. E-mail starunbharatgmail.com.** ● **Websate:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही.

**Owned by, SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LTD. Printed by, Published by** DILIP SHIVMURTI DULANGE **Printed at** SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LT. 19,20 INDUSTRIAL ESTATE, HOTGI ROAD, SOLAPUR, Dist. SOLAPUR, 413003. **Publised at** TARUN BHARAT OFFICE, SwetSagar Niwas, Near Rajmata Jijamata College, Patrakar Road, Shivnagar, Dist. Latur Pin 413512, **RNI No. MAHMAR/2023/86477**
● **CHIEF GROUP EDITOR :** DILIP YASHWANT PETHE ● **CHIEF EDITOR :** PRASHANT VASANTRAO MANE

# लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## दयानंद विज्ञान महाविद्यालयात प्रश्नमंजुषा स्पर्धा संपन्न

**तभा वृत्तसेवा**
**लातूर, दि.१७ ऑक्टोबर -**

दयानंद शिक्षण संस्था संचलित दयानंद विज्ञान महाविद्यालयात १३ ऑक्टोबर २०२५ रोजी 'निसर्ग जगवा, निसर्ग वाचवा' या विषयावर प्रश्नमंजुषा (क्विझ) स्पर्धेचे आयोजन करण्यात आले.

सदरील स्पर्धा दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष लक्ष्मीरमण लाहोटी, सचिव रमेश बियाणी, शैक्षणिक विकास अधिकारी प्राचार्य डॉ. जयप्रकाश दरगड आणि प्राचार्य डॉ. सिद्धेश्वर बेल्लाळे यांच्या सूचनेनुसार पार पडली. बी.एस्सी. जैवतंत्रज्ञान प्रथम, द्वितीय आणि तृतीय वर्षातील एकूण ५० विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला. संपूर्ण कार्यक्रमाचे मार्गदर्शन विभागप्रमुख प्रा. ए.ए. बिडकर यांनी केले, तर स्पर्धेचे समन्वयक प्रा. एस.एस. गावकरे यांनी उत्कृष्ट नियोजन केले. याशिवाय डॉ. एफ.एस. बिरादार, प्रा. एस.व्ही. मदने, प्रा. ए.डी. शिंदे, प्रा. टी.बी. सोनकांबळे आणि प्रा. आर.बी. दिग्रसकर यांनी स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी महत्त्वपूर्ण योगदान दिले.



## संक्षिप्त वृत्त...

### 'लालबहादूर शास्त्री'त ७५ गरजू विद्यार्थ्यांना अमृत किट व आनंदाचा शिधा वाटप

**उदगीर, दि.१७ ऑक्टोबर -**

लालबहादूर शास्त्री माध्यमिक विद्यालयात विस्तार सेवा कार्य समिती अंतर्गत अमृत किट व आनंदाचा शिधाचे वाटप संपन्न झाले. या उपक्रमांतर्गत आर्थिक दृष्ट्या गरीब, गरजू आणि आई-वडील नसलेल्या ७५ विद्यार्थ्यांच्या कुटुंबांना मदत करण्यात आली. विद्यालयाने या दिवाळीच्या सणाला सर्व विद्यार्थ्यांसाठी आनंदाचे वातावरण निर्माण करण्यासाठी ही परंपरा सुरू ठेवली आहे. कार्यक्रमाच्या प्रसंगी स्थानिक समन्वय समिती कार्यवाह शंकरराव लासूणे, शालेय समिती अध्यक्ष सतनप्पा हूरदळे, भाजपा लातूर जिल्हा महामंत्री अमोल निडवदे, मुख्याध्यापक संजय कुलकर्णी, उपमुख्याध्यापक ज्ञानेश मातेकर, पर्यवेक्षक कृष्णा मारावार, माधव मठवाले, किरण नेमट, उपक्रम प्रमुख किरण नरसिंगे, नीता मोरे, अभ्यास पूरक मंडळ प्रमुख अनिता यलमटे, बबनराव गायकवाड, प्रमोदिनी रेड्डी, संतोष कोले, भानुदास भापकर आदी उपस्थित होते.

### महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालयात वाचन प्रेरणा दिन साजरा

**उदगीर, दि.१७ ऑक्टोबर -**

महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालयात भारतरत्न डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त वाचन प्रेरणा दिन साजरा करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात डॉ. कलाम यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करून करण्यात आली. हा उपक्रम दिनविशेष समितीचे प्रमुख प्रा.डॉ.एम.एस. खांडेकर यांच्या हस्ते प्रतिमा पूजन करून पार पडला. यावेळी ग्रंथपाल डॉ.एल.बी. पेन्सलवार यांनी वाचनाची आवड निर्माण करण्यासाठी लागणारी माहिती विविध माध्यमांतून उपस्थितांना दिली. कार्यक्रमास प्राचार्य डॉ.आर.के. मस्के, उपप्राचार्य डॉ.एस.एन. हल्लाळे, प्राध्यापकवर्ग आणि शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

### दयानंद विज्ञान महाविद्यालयात 'ऊर्जा बचत व संवर्धन' विषयावर निबंध स्पर्धा

**लातूर, दि.१७ ऑक्टोबर -**

दयानंद शिक्षण संस्था संचलित दयानंद विज्ञान महाविद्यालयात १३ ऑक्टोबर रोजी 'ऊर्जा बचत व संवर्धन' या विषयावर निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. स्पर्धेचा उद्देश विद्यार्थ्यांमध्ये ऊर्जा बचत आणि संवर्धनाबाबत जनजागृती करणे व त्याचा समाज व देशाला फायदा होणे असा ठेवण्यात आला होता. सदरील स्पर्धा दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष लक्ष्मीरमण लाहोटी, सचिव रमेश बियाणी, प्राचार्य डॉ. जयप्रकाश दरगड, प्राचार्य डॉ. सिद्धेश्वर बेल्लाळे यांच्या सूचनेनुसार पार पडली. या स्पर्धेत एकूण ९६ विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद नोंदविला. बी.एस्सी. बी.टी. तृतीय वर्षातील ढवारे पर्णवी प्रधान या विद्यार्थीनीने प्रथम क्रमांक पटकावला तर बी.एस्सी. तृतीय वर्षातील स्वामी प्रांजली काशीनाथ या विद्यार्थीनीने द्वितीय क्रमांक मिळविला. प्रथम व द्वितीय क्रमांक मिळालेल्या विद्यार्थ्यांना अनुक्रमे ५०० आणि ३०० रुपये बक्षिस म्हणून देण्यात येणार आहेत.

# उदगीर तालुक्यात अतिवृष्टीमुळे शेती फसली; दिवाळीपूर्वी बाजार थंडावला

## दिवाळी सण दोन दिवसांवर; तरीही बाजारातील उलाढाल थंडावलेलीच ! अतिवृष्टीमुळे खरिपाला फटका : लागवडीचा खर्चही निष्फळ, ग्रामीण अर्थव्यवस्था संकटात

सोलापूर तरुण भारत विशेष...

**तभा वृत्तसेवा / नागेंद्र साबणे**
**उदगीर, दि.१७ ऑक्टोबर -**

मागील पंधरवड्यात तालुक्यात झालेल्या अतिवृष्टीने शेती पिकांचे प्रचंड नुकसान झाले. काही ठिकाणची पिके वाहून गेली. त्यामुळे खरिपाच्या पेरणीचा खर्चही वाया गेला आहे. त्याचा शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणात फटका बसल्याने ग्रामीण अर्थव्यवस्था संकटात सापडली आहे. त्याचा परिणाम शहरी भागातही जाणवू लागला आहे. दिवाळीचा सण दोन दिवसांवर आला असतानाही शहरातील सर्वच बाजारपेठांत सामसुम दिसत आहे.

यावर्षी पावसाने जोरदार सुरुवात केल्याने शेतकऱ्यांनी उत्साहाने खते, महागडी बियाणे खरेदी करून पेरणी उरकली होती. परंतु, ऑगस्ट व सप्टेंबरमध्ये झालेल्या अतिवृष्टीने शेतीचे अतोनात नुकसान झाले. सततच्या मुसळधार पावसामुळे शेतीचे प्रचंड नुकसान झाले. तालुक्यात जवळपास ५४ हजार हेक्टरवरील पिके बाधित झाली आहेत. खरिपातील मुख्य पीक असलेल्या सोयाबीनला सर्वात मोठा फटका बसला आहे. ऐन फळधारणेच्या काळात झालेल्या अतिवृष्टीने शेतकऱ्यांच्या हाती येणारे पीक निसर्गाने हिरावून घेतले आहे. परिणामी, शेतकरी कोलमडून गेला आहे.

सरकारने शेतकऱ्यांना आर्थिक मदतीची घोषणा केली असली तरी ती मदत अतिशय तुटपुंजी ठरणार असल्याने पुढील हंगामापर्यंत खर्चाची तजवीज कशी करावी, अशी चिंता शेतकऱ्यांना लागली आहे.

अतिवृष्टीचा फटका आता शहरातील बाजारपेठेवर जाणवू लागला आहे. शहरातील प्रमुख बाजारपेठ असलेल्या मार्केट यार्डात सोयाबीन, उडीद, मुगासह सर्व शेतमालाची आवक कमी झाली असल्याचे व्यापाऱ्यांनी सांगितले. आडत

शेतकऱ्याचे प्रमुख पीक असलेल्या सोयाबीन पिकावर अक्षरशः पाणी फिरले आहे. फळधारणेच्या काळात पावसाने झोडपून काढल्याने हातात येणारा घास निसर्गाने हिरावून घेतला आहे. त्यामुळे शेतकरी संकटात सापडला आहे. सरकारने शेतकऱ्यांना मदत देण्याचे घोषणा केली असली तरी मिळणारी मदत व प्रत्यक्षात केलेला खर्च याचा ताळमेळ बसत नाही. त्यामुळे मोठ्या प्रमाणात मदत व्हावी, अशी अपेक्षा शेतकरी करीत आहेत.

दरवर्षी दिवाळीपूर्वी नवीन हंगामाला सुरुवात होते. मार्केट यार्डात शेतकरी शेतमाल विक्री करून दिवाळीच्या सणासाठी किराणा साहित्य खरेदी करतात. परंतु, यावर्षी दिवाळी दोन दिवसांवर आली तरी शेतकरी दुकानाकडे फिरकत नाहीत.

गतवर्षी ऑक्टोबरच्या पहिल्या आठवड्यापर्यंत बाजारपेठेत २३ हजार २०० क्विंटल सोयाबीनची आवक झाली होती. यावर्षी केवळ ८ हजार ४०० क्विं. सोयाबीनची आवक झाली असल्याची माहिती देण्यात आली. शेतातील उत्पादनाची शाश्वती नाही.

शेतात चिखल असल्याने काढणीसाठी मजूर मिळत नाहीत. त्यातच सोयाबीन डागी झाल्यामुळे दर कमी मिळणार आहे. शासनाने मदतीची घोषणा केली असली तरी अद्याप खात्यावर जमा झाली नाही.

अतिवृष्टीमुळे शेती उत्पादन नसल्याने मार्केट यार्डातील उलाढाल थंडावली आहे.

त्यामुळे ग्रामीण भागातून येणाऱ्या शेतकऱ्यांची संख्या कमी झाल्याने त्याचा परिणाम शहरातील इतर बाजारपेठेवर झाला आहे. त्यामुळे बाजारात रौनक दिसत नाही.

### ग्राहक नसल्याने शहरातील व्यापारी, दुकानदार चिंतेत...

एकीकडे ग्रामीण भागात चिंतेचे वातावरण निर्माण झाले असताना शहरी भागातील सर्व बाजारपेठेत ग्राहक नसल्याने व्यापारीही चिंतेत आहेत. दरवर्षी दिवाळीच्या अगोदरपासून बाजारपेठेत उलाढाल होण्यास सुरुवात होते. परंतु, खरीप हंगाम शेतकऱ्यांच्या हातून गेल्याने त्याचा फटका शेतकऱ्यांसह व्यापाराला ही बसल्याचे दिसून येत आहे. बाजारात ग्राहक नसल्याने त्याचा परिणाम किराणा, कापड दुकानांसह अन्य बाजारपेठेवर दिसून येत आहे. हातावर पोट असणाऱ्यांची दिवाळी गोड होणार का? सवाल आहे.

## अतिवृष्टीबाधितांना अभय भुतडा फाउंडेशनची ५२ लाखांचा मदत निधी



**तभा वृत्तसेवा**
**उदगीर, दि.१७ ऑक्टोबर -**

जळकोट मतदारसंघात एप्रिल ते सप्टेंबर २०२५ दरम्यान झालेल्या अतिवृष्टीमुळे उदगीर तालुक्यात शेतकरी व नागरिक मोठ्या आर्थिक संकटात सापडले होते. या आपत्तीग्रस्तांना मदत करण्यासाठी प्रसिद्ध उद्योगपती अभय भुतडा यांच्या अभय भुतडा फाउंडेशनने एकूण ५२ लाख १३ हजार ५०० रुपये भरीव मदतीसाठी जाहीर केले.

आज हा निधी हभप. गहिनीनाथ महाराजांच्या हस्ते धनादेश स्वरूपात वितरित करण्यात आला. यावेळी माजी मंत्री संजय बनसोडे यांनी अभय भुतडांना विशेष आभार मानले.

दत यामध्ये मतदार संघातील पाच मयतांना प्रत्येकी ४ लाख, आत्महत्याग्रस्त चार शेतकऱ्यांना प्रत्येकी १ लाख, गायींच्या १४ पशुपालकांना प्रत्येकी ३७,५००, ४0 म्हैशींच्या पशुपालकांना प्रत्येकी ३७,५००, ५ बैलांच्या पशुपालकांना प्रत्येकी ३२,000, ३ गाई व ३ म्हशींच्या वासरुंच्या पशुपालकांना प्रत्येकी २0,000, १२२ शेळी-मेंढीच्या पशुपालकांना प्रत्येकी ४,000 आणि २०५ कोंबडी पालन करणाऱ्यांना प्रत्येकी १०० रुपये वितरित करण्यात आले.

कार्यक्रमात माजी नगराध्यक्ष राजेश्वर निटुरे, माजी जि.प. अध्यक्ष राहुल केंद्रे, माजी सभापती सिद्धेश्वर पाटील, राष्ट्रवादी व भाजपाचे पदाधिकारी व स्थानिक प्रतिनिधी उपस्थित होते.

माजी मंत्री संजय बनसोडे यांनी सांगितले की, मतदार संघातील नुकसानग्रस्त भागाची प्रत्यक्ष पाहणी करून त्यांनी विविध उद्योजकांना मदतीसाठी आवाहन केले होते आणि त्यास अभय भुतडा फाउंडेशनच्या वतीने सकारात्मक प्रतिसाद मिळाला.

## अखिल महाराष्ट्र राज्य स्वस्त धान्य दुकानदार केरोसीन परवाना धारक महासंघ लातूर जिल्हा सचिवपदी दत्तात्रय बेंबडे यांची निवड



**तभा वृत्तसेवा**
**चाकूर, दि.१७ ऑक्टोबर -**

अखिल महाराष्ट्र राज्य स्वस्त धान्य दुकानदार केरोसीन परवाना धारक महासंघाच्या लातूर जिल्हा संघटनेच्या नवीन कार्यकारिणीची निवड झाली आहे. जिल्हा सचिवपदी दत्तात्रय रामदास बेंबडे यांची निवड झाली असून, निवड प्रक्रिया राज्याध्यक्ष राजेश दुसकर यांच्या मार्गदर्शनाखाली आणि जिल्हाध्यक्ष सुधाकर पाटील यांच्या नेतृत्वात पार पडली.

या निवडीनुसार सुगंध काशीनाथ बुकटे यांची चाकूर शहर अध्यक्षपदी, शरद व्यंकटराव हुडगे यांची चाकूर तालुका कोषाध्यक्षपदी, तर बापु हैबती वाघमारे यांची जिल्हा उपाध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे. कार्यक्रमास चाकूर तालुकाध्यक्ष नंदकुमार पवार, उपाध्यक्ष एस.आर. शिंदे, सचिव अनंत कांबळे आणि तालुक्यातील अनेक दुकानदार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

निवडीबाबत बोलताना पदाधिकाऱ्यांनी म्हटले की, महासंघाच्या ध्येय-धोरणाशी प्रामाणिक राहून संघटना सामाजिकदृष्ट्या सक्षम आणि संघटित करण्यासाठी सर्वांनी एकत्र काम करणे आवश्यक आहे.

नव्या कार्यकारिणीच्या निवडीमुळे जिल्ह्यातील संघटनात्मक कामकाजात नवी ऊर्जा संचारेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. नव्या पदाधिकाऱ्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन करण्यात आले आहे.

### मौलाना नजीरसाब मौलाना मानुल्ला यांचे निधन

**तभा वृत्तसेवा**
**वलांडी, दि.१७ ऑक्टोबर -**



दवणहिप्परगा ता. देवणी येथील नजीरसाब मौलाना मानुल्ला (वय ६८) यांचे शुक्रवार, दि. १७ रोजी दुपारी दोन वाजता अल्पशा आजारामुळे निधन झाले. त्यांच्या अंत्यसंस्काराची सोय सायंकाळी करण्यात आली.

त्यांच्यासोबत एक भाऊ, बहीण, मुलगा, मुलगी, नातवंडे असा परिवार आहे. मौलाना मानुल्ला हे सहशिक्षक मौलाना मानुल्ला यांचे पिता होते.

## न समजलेले आई-बाप समजून घ्या : व्याख्याते प्रा. वसंत हंकारे

**तभा वृत्तसेवा**
**देवणी, दि.१७ ऑक्टोबर -**

जनसेवा सेवाभावी प्रतिष्ठान भोपणी यांच्या वतीने संचलित कै. रसिका शैक्षणिक संकुलामध्ये आबासाहेब इंग्लिश स्कूल अँड ज्युनियर कॉलेजच्या वतीने 'न समजलेले आई-बाप समजून घेताना' या विषयावर महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध व्याख्याते प्रा. वसंत हंकारे यांचे प्रेरणादायी व्याख्यान उत्साहात संपन्न झाले.

या कार्यक्रमाचे आयोजन संस्था अध्यक्ष गोविंदराव भोपणीकर व सचिव गजानन भोपणीकर यांनी केले होते. अध्यक्षस्थानी गोविंदराव भोपणीकर होते, तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून प्रा. वसंत हंकारे यांनी उपस्थितांना संवाद साधला.



कार्यक्रमाला देवणी तालुक्याचे तहसीलदार सोमनाथ वाडकर, गटविकास अधिकारी सागर वरंडकर, गटशिक्षणाधिकारी शिंदाळकर, संस्था सहसचिव गीता गजानन भोपणीकर तसेच तालुक्यातील विविध मान्यवर, पदाधिकारी, पत्रकार, शाळांचे मुख्याध्यापक, रसिका महाविद्यालयाचे प्राचार्य व उपप्राचार्य उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात सरस्वती पूजन व कै. आबासाहेब गोविंदराव भोपणीकर यांच्या प्रतिमेला पुष्पांजली अर्पण करून झाली. त्यानंतर उपस्थित मान्यवरांचा शाळेच्या वतीने सत्कार करण्यात आला. यानंतर प्रा. वसंत हंकारे यांनी आपल्या ओजस्वी शैलीत व्याख्यानास सुरुवात केली. 'न समजलेले आई-बाप समजून घेताना' या विषयावर बोलताना त्यांनी विद्यार्थी, पालक आणि शिक्षक या तिन्ही घटकांना भावनिक स्पर्श करणारा संदेश दिला. आपल्या प्रभावी वाणीने त्यांनी तरुणांना मोबाईलच्या अति वापरापासून, व्यसनांपासून आणि गुन्हेगारी प्रवृत्तीपासून दूर राहण्याचे आवाहन केले. तसेच पालकांनी आपल्या मुलांसाठी केलेल्या त्यागाची जाणीव ठेवण्याचे आणि त्यांच्या कर्तृत्वाचा सन्मान करण्याचे आवाहनही केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शुभांगी माने व अंकुश माने यांनी केले, तर आभार प्रदर्शन मॅनेजिंग कोऑर्डिनेटर डॉ. सत्यवान सोनटक्के यांनी केले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी आबासाहेब इंग्लिश स्कूल अँड ज्युनियर कॉलेज देवणीचे सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी विशेष परिश्रम घेतले.

### परिसंवाद आणि विद्यार्थी मंडळाचे उद्घाटन

**लातूर, दि.१७ ऑक्टोबर -**

दयानंद विज्ञान महाविद्यालयातील औद्योगिक रसायनशास्त्र विभागातर्फे ११ ऑक्टोबर २०२५ रोजी '१९४७ ते १९२५ या कालखंडातील औद्योगिक क्रांती' या विषयावर एक दिवसीय परिसंवाद आयोजित करण्यात आला. यावेळी महाविद्यालयाचे प्र. प्राचार्य डॉ. सिद्धेश्वर बेल्लाळे अध्यक्षस्थानी होते.

पाहुणे म्हणून प्रा. प्रसाद कावळे, डॉ. आण्णाराव चौगुले, प्रा. राहुल जाधव, आयक्यूएसी समन्वयक डॉ. जमन अंगुलवार, डॉ. निर्मला चिवडशेट्टी-कोरे यांची प्रमुख उपस्थिती होती.

## रसिका महाविद्यालयात नागरिकांसाठी ग्रंथ प्रदर्शन



**तभा वृत्तसेवा**
**देवणी, दि.१७ ऑक्टोबर -**

कै. रसिका महाविद्यालयात माजी राष्ट्रपती डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त वाचन प्रेरणा दिवस उत्साहात साजरा करण्यात आला. या निमित्ताने वाचन संस्कृतीचा प्रसार व नागरिकांमध्ये वाचनाची आवड निर्माण व्हावी या उद्देशाने १५ ऑक्टोबर २०२५ रोजी देवणी शहरातील नागरिकांसाठी ग्रंथ प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले.

या प्रदर्शनाचे उद्घाटन महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध व्याख्याते प्रा. वसंत हंकारे यांच्या शुभहस्ते करण्यात आले.

या प्रसंगी संस्थेचे अध्यक्ष गोविंदराव भोपणीकर, सचिव गजानन भोपणीकर, सहसचिव गीतांजली गजानन भोपणीकर, संचालिका कविता बिरादार तसेच तहसीलदार सोमनाथ वाडकर, गटविकास अधिकारी सागर वरंडेकर, गटशिक्षणाधिकारी शिंदाळकर, अनुराधा वाडकर, कालिदास देवणे, दत्ता हुरुंचनाळे, सुप्रसिद्ध फिजिओथेरपिस्ट डॉ. झैद, सेवानिवृत्त वैद्यकीय अधिकारी डॉ. झैद मोहम्मद, प्रफुलचंद्र दारमुळे, दयानंद रणदिवे, पत्रकार दत्ता पाटील, प्रताप कोयले, बालाजी टाळीकोटे, पठाण अहमद खान, गिरिधर गायकवाड, लक्ष्मण रणदिवे आदी मान्यवर उपस्थित होते.

या ग्रंथ प्रदर्शनाचा अनेक प्रतिष्ठित नागरिक व वाचनप्रेमींनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत लाभ घेतला. प्रदर्शनात विविध विषयांवरील पुस्तके व मराठी साहित्यिकांचे ग्रंथ वाचकांसाठी उपलब्ध करून देण्यात आले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य डॉ. चंद्रकांत जावळे यांनी केले. सूत्रसंचालन उपप्राचार्य तथा ग्रंथपाल डॉ. शिवाजी सोनटक्के यांनी केले, तर आभार प्रदर्शन डॉ. गोपाल सोमानी यांनी केले.

## निलंगा आश्रमशाळेत पालक मेळावा संपन्न, पालकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**तभा वृत्तसेवा**
**निलंगा, दि.१७ ऑक्टोबर -**

श्रमिक विकास संस्था संचलित वेणुताई यशवंतराव चव्हाण प्राथमिक आश्रम शाळा आणि प्रतिभाताई पवार माध्यमिक आश्रम शाळा येथे बुधवार, दि. १५ ऑक्टोबर रोजी पालक मेळावा मोठ्या उत्साहात संपन्न झाला. मेळाव्याचे आयोजन इतर मागास बहुजन कल्याण विभाग लातूर च्या मार्गदर्शनाखाली गुणवत्ता वाढ व संवर्धन उपक्रम अंतर्गत करण्यात आले होते.

पालक मेळाव्याचे उद्घाटन प्रतिमा पूजन व दीपप्रज्वलन करून करण्यात आले. अध्यक्षस्थानी कलावती विलासराव माने, संस्थेचे सचिव विकास माने, उपाध्यक्ष उषा जाधव, कोषाध्यक्ष आशा जाधव, प्राथमिक




आश्रम शाळेच्या मुख्याध्यापिका सुनीला पंडित, माध्यमिक आश्रम शाळेचे मुख्याध्यापक विष्णुकांत गणेशवाडे, पर्यवेक्षक दशरथ जाधव आदी उपस्थित होते.

मुख्याध्यापकांनी शाळेच्या प्रगतीचा आढावा दिला, तसेच राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती पालकांसमोर मांडली. विद्यार्थ्यांनी जी.एस. बिराजदार यांच्या मार्गदर्शनाखाली नृत्य आणि गीत सादर करून उपस्थित पालकांचे मन जिंकले. श्रीशैल बिराजदार यांनी पालकांना मार्गदर्शन करताना विद्यार्थ्यांच्या प्रगतीत पालकांची भूमिका, अडचणी आणि उपाययोजना याबाबत चर्चा केली.

त्यांनी शिक्षक व पालकांमध्ये सातत्यपूर्ण संवाद आणि समन्वय आवश्यक असल्याचे सांगितले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अजय पाटील यांनी केले तर आभार बी.टी. पवार यांनी मानले.

मेळाव्यासाठी शाळेतील शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, पालक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# कापुस उत्पादक शेतकऱ्यांच्या प्रश्नावर आमदार केराम दिल्ली दरबारी

**तभा वृतसेवा**
**किनवट, दि. १७ ऑक्टोबर-**

किनवट व माहुर या आदिवासी बहुल मतदारसंघातील शेतकऱ्यांना आपल्या कापुस या पिकाची शासकीय हमीभावाने शासनाच्या खरेदी केंद्रावर विक्री करता यावे यासाठी आमदार भीमराव केराम यांनी थेट दिल्ली गाठुन हा प्रश्न सोडवण्यासाठी पुढाकार घेतला आहे.

किनवट व माहुर तालुक्यातील कापुस उत्पादक शेतकऱ्यांना आपले कापसाचे पिक तेलंगणा राज्यातील आदिलाबाद येथील CCI (Cotton Corporation of India) केंद्रावर विक्री करण्याची परवानगी मिळावी अशी मागणी किनवट माहुर विधानसभा क्षेत्रातील प्रतिष्ठीत नागरीक व प्रगतिशिल शेतक-यांनी केली असता नागरीकांची समस्या सोडवण्याच्या दृष्टीने, आमदार भिमराव केराम यांनी राष्ट्रीय अनुसूचित जमाती आयोगाकडे (National Commission for Scheduled Tribes) तक्रार दाखल केली होती.

या प्रकरणाची सुनावणी (दि. १६ ऑक्टोबर) दिल्ली येथील आयोगाच्या कार्यालयात झाली. आयोगाचे अध्यक्ष आंतरसिंग आर्या यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या सुनावणीत



उउख चे जनरल मॅनेजर ललित गुप्ता उपस्थित होते. सुनावणीदरम्यान आयोगाने गंभीर दखल घेत महाराष्ट्र व तेलंगण राज्यांच्या पनन व मार्केटिंग सचिवांना नोटीस बजावण्याचे आदेश दिले आहेत. आयोगाने पुढील सुनावणी दि. २९ ऑक्टोबर २०२५ रोजी ठेवली असून त्या दिवशी संबंधित दोन्ही राज्य सरकारांकडून अहवाल सादर करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. या सुनावणी मुळे किनवट व माहुर परिसरातील हजारो शेतकऱ्यांना दिलासा मिळणार असून, राष्ट्रीय अनुसूचित जमाती आयोगाच्या पुढील सुनावणीत हा प्रश्न निकाली लागला तर किनवट माहुर विधानसभा क्षेत्रातील कापुस उत्पादक शेतकरी आपला कापूस हे पिक तेलंगणा राज्याच्या उ.उ.ख. च्या आदिलाबाद केंद्रावर विक्री करू शकतील, अशी आशा व्यक्त केली जात आहे.

आमदार केराम यांनी या निर्णयाचे स्वागत करताना सांगितले की, किनवट माहुर विधानसभा क्षेत्रातील सर्व सामान्य व आदिवासी शेतकऱ्यांना त्यांच्या कापसाला योग्य दर आणि योग्य बाजारपेठ मिळावी, यासाठीच मी हा लढा दिला आहे. आयोगाने तत्काळ कारवाई करून संबंधित सचिवांना नोटीस बजावल्यामुळे आमच्या शेतकऱ्यांच्या कापुस या पिकांच्या विक्री संदर्भातील समस्या लवकरच मार्गी निघेल असाआत्मविश्वास आता आमचा वाढला आहे.

किनवट परिसरातील शेतकऱ्यांनी आमदार भिमराव केराम यांनी केलेल्या प्रयत्नां बद्दल आभार मानत आनंद साजरा केला आहे, हा निर्णय पुर्नत्वात आला तर तो किनवट माहुर विधानसभा क्षेत्रातील कापुस उत्पादक शेतकऱ्यांसाठी खुप मोठा दिलासा देणारा आणि न्याय मिळवून देणारा ठरेल, अशी प्रतिक्रिया प्रगतिशिल शेतकरी मुकुंद नेम्मानिवार यांनी दिली आहे.

## पक्षश्रेष्ठीने संधी दिल्यास संधीचे सोने करू : उद्धव शिंदे

**नवीन नांदेड** -जिल्हा परिषद निवडणुका २०२५ चे वातावरण वरच्यावर तापत असल्याने विविध पक्षात रसिखेच सुरू झालेले आहे.



जिल्हा परिषद धनेगाव सर्कल नव्याने झाल्याने व सर्वसाधारण महिलेस सुटले आहे तेव्हा या ठिकाणी शिवसेना शिंदे गटाचे निष्ठावंत कार्यकर्ते उद्धव पाटील शिंदे यांनी येथील दावेदार आपणच असल्याचे सांगितले आसुन धनेगाव सर्कल मधून पक्षश्रेष्ठीने संधी दिल्यास संधीचे सोने करू असे मत त्यांनी व्यक्त केले. जिल्हा परिषद धनेगाव सर्कल येथील दावेदार उमेदवार शिवसेना शिंदे गटाचे उद्धव पाटील शिंदे हे गेल्या ३५ वर्षापासून आ. हेमंत पाटील यांच्या खांद्याला खांदा लावून अहोरात्र एकनिष्ठेने पक्षाचे कार्य केले आहे. शाखाप्रमुख, सर्कल प्रमुख, तालुकाप्रमुख या सर्व पदावरून आजपर्यंत मी काम केले आहे. तेव्हां आज मला एक संधी मिळाली आहे. ते पक्षश्रेष्ठींनी माझ्यासारख्या निष्ठावंत कार्यकर्त्यास संधी दिल्यास माझ्यासारख्या कार्यकर्त्याचे मनोबल उंचावून अधिकच्या जोमाने पक्षाचे कार्य करून संधीचे सोने करू असे ते म्हणाले या ठिकाणी मांडले उपऱ्यांना संधी देऊ नये अशी माझी पक्षश्रेष्ठीकडे मागणी आहे. शिवसेना पक्षाकडून जिल्हा परिषद धनेगाव सर्कल मधून निवडणूक लढवण्यास आपण सक्षम असल्याचे सांगून येथे आपणच दावेदार असल्याचे पक्षश्रेष्ठीकडे सांगण्याचा प्रयत्न उद्धव पाटील शिंदे यांनी केला आहे.

## ज्येष्ठ समाजसेविका आशाताई शिंदे यांची आनंद दत्तधाम आश्रमास भेट



**माहूर** - लोहा-कंधारचे शेतकरी कामगार पक्षाचे माजी आमदार तसेच माजी सनदी अधिकारी श्यामसुंदर दगडूजी शिंदे यांच्या सुविद्य पत्नी तथा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे आमदार प्रताप पाटील चिखलीकर यांच्या भगिनी ज्येष्ठ समाजसेविका सौ. आशाताई श्यामसुंदर शिंदे यांनी आपल्या अनेक महिला भगिनी व कार्यकर्त्यांसह आज शुक्रवार १७ ऑक्टोबर रोजी माहूरच्या आनंद दत्तधाम आश्रमास भेट देऊन मठाधिपती सद्गुरु दभप राष्ट्रसंत तथा महाराष्ट्र शासनाचे स्वच्छता दूत साईनाथ महाराज वसमतकर यांचा आशिर्वाद घेतला. यावेळी महाराजांनी त्यांचा यथोचित सन्मान-सत्कार केला. नांदेड येथील अनेक महिला भगिनींसह सौ. आशाताई शिंदे ह्यांनी आज शुक्रवारी माहूर येथे देवदर्शनाला आल्या होत्या. यावेळी त्यांनी येथील धार्मिक व प्रबोधनात्मक कार्यक्रमासह विविध जनकल्याणकारी उपक्रम राबविण्यासाठी ख्यातनाम असलेल्या आनंद दत्त धाम आश्रमाला भेट देऊन महाराष्ट्र शासनाचे स्वच्छता दूत मठाधिपती राष्ट्रसंत साईनाथ महाराज वसमतकर यांचा आशिर्वाद घेतला. या प्रसंगी महाराष्ट्राचे ब्रँड अँबेसिडर स्वच्छता दूत राष्ट्रसंत सद्गुरू साईनाथ महाराज वसमतकर यांच्या शुभहस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी सत्काराला उत्तर देताना आशाताई शिंदे यांनी साईनाथ महाराजांचे कार्य हे सर्वांसाठीच प्रेरणादायी असल्याचे, प्रशंसोद्गार काढले. या कार्यक्रमास किन्हाळकर गायकवाड, शेटकार,जाधव आदी मान्यवरांची उपस्थिती लाभली होती. उपस्थित सर्वांनी सौ. आशाताईंच्या समाजकार्यातील योगदानाचे मनःपूर्वक कौतुक केले. सोबतच आश्रमाच्या प्रगतीसाठी शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे संचलन व आभार शेषराव पाटील यांनी मानले. यावेळी पुंडलिक हुंम्बे, पंजाब माने, संतोष मते, अनिल सुरोशे, कलाने,आव्हाड, सोनोने, गजानन मुकाडे यांची उपस्थिती होती.

## भवानी तांड्यावर आरोग्य देवता धन्वंतरी पूजन व मोफत आरोग्य शिबिर

**बाऱ्हाळी** -स्व. शंकरराव पवार प्रतिष्ठान आणि आरोग्य उपकेंद्र सुगाव यांच्या संयुक्त विद्यमाने आरोग्य देवता श्री धन्वंतरी पूजन आणि मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन दि. १८ ऑक्टोबर २०२५ रोजी, शनिवार, सकाळी १० ते दुपारी २ वाजेपर्यंत भवानी तांडा येथे करण्यात आले आहे. या उपक्रमाचा लाभ नागरिकांनी मोठ्या संख्येने घ्यावा, असे आवाहन तालुका आरोग्य अधिकारी डॉ.आकाश देशमुख व प्रतिष्ठानचे अध्यक्ष अजित शंकरराव पवार (पत्रकार) यांनी केले आहे. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान डॉ. अशोक कौरवार (MD मेडिसिन, अध्यक्ष IM मुखेड) यांनी भूषविले असून, उद्घाटक म्हणून डॉ. आकाश देशमुख (तालुका आरोग्य अधिकारी, मुखेड) हे उपस्थित राहणार आहेत.

या आरोग्य शिबिराला विविध क्षेत्रातील मान्यवर डॉक्टरांची उपस्थिती लाभणार आहे: डॉ. रामराव श्रीरामे बालरोग तज्ज्ञ, अध्यक्ष तडच् मुखेड, प्रसिद्ध रेडिओलॉजिस्ट डॉ. श्रीहरी बुडगेमवार ,डॉ. प्राजक्त झरीकर ,डॉ. शिवसांब वडेर ,डॉ. प्रिया खंडागळे स्त्री रोग तज्ञ,डॉ. पांडुरंग श्रीरामे दंत रोग तज्ञ,डॉ. किरण चिवडे ,डॉ. पृथ्वीदास पत्की या शिबिरात सामान्य आरोग्य तपासणी, महिलांसाठी विशेष तपासणी, बालरोग, दंतरोग, आणि इतर आवश्यक वैद्यकीय सेवा मोफत दिल्या जाणार आहेत. नागरिकांनी या सुवर्णसंधीचा लाभ घ्यावा आणि आपल्या आरोग्याची काळजी घ्यावी, असे समुदाय आरोग्य अधिकारी सुगाव (बु) डॉ. शिवसांब वडेर यांनी कळवले आहे.

## दहावी-बारावीच्या परीक्षा फेब्रुवारी-मार्च मध्ये

**नांदेड** -महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्यावतीने पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, लातूर व कोकण या नऊ विभागीय मंडळामार्फत आगामी फेब्रुवारी-मार्च २०२६ मधील उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) व माध्यमिक शालांन्त प्रमाणपत्र (इ. १० वी) परीक्षेच्या लेखी, प्रात्यक्षिक व इतर परीक्षा पुढील तारखांना आयोजित करण्यात येत आहे.

## विष्णुपुरी येथे रस्ता सुरक्षा जनजागृती अभियान कार्यक्रम

**तभा वृतसेवा**
**नवीन नांदेड, दि. १७ ऑक्टोबर-**

प्रादेशिक परिवहन कार्यालय नांदेड व कै. गणपतराव पाटील बहुउद्देशीय सेवाभावी संस्था मांजरम,यांच्या संयुक्त विद्यमाने पीएमश्री जिल्हा परिषद हायस्कूल विष्णुपुरी येथे दिनांक १६ ऑक्टोबर २०२५ रोजी 'रस्ता सुरक्षा जनजागृती अभियान कार्यक्रम ' पार पडला.

पीएमश्री जिल्हा परिषद हायस्कूल विष्णुपुरी येथे रस्ता सुरक्षा जनजागृती अभियान अंतर्गत कार्यक्रम पार पडला यावेळी सुरुवातीला मान्यवरांचा प्रशालेच्या वतीने स्वागत करण्यात आला,कार्यक्रमाचे अध्यक्ष पंकज कंतेवार साहेब, सहाय्यक मोटर वाहन निरीक्षक, प्रादेशिक परिवहन कार्यालय नांदेड, यांनी पाद चाऱ्यांसाठी रस्ता सुरक्षा टिपा व वॉक ऑन राईट संकल्पना मांडून वाहतूक चिन्हांची माहिती आणि रस्ते अपघातांची कारणे विद्यार्थ्यांना पटवून सांगितली. हेमंत साळुंखे साहेब, सहाय्यक मोटर परिवहन निरीक्षक यांनी बचावात्मक पद्धतीने वाहन चालवणे, व हेल्मेट व सीट बिल चे महत्व सांगून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे संयोजक श्रीपात पाटील शिंदे मांजरमकर अध्यक्ष कै. गणपतराव पाटील बहुउद्देशीय सेवाभावी संस्था मांजरम, यांनी विद्यार्थ्यांना अपघातग्रस्तांना मदत कशी करावी, हेल्मेट न वापरल्याने त्याचे होणारे परिणाम, अपघातामुळे दरवर्षी दीड लाख लोक मृत्युमुखी पडतात असे सांगून वाहतुकीचे धडे दिले, आणि रस्ते की पाठशाला ही पुस्तक १२०० विद्यार्थ्यांना संस्थेतर्फे मोफत वाटप करून रस्ता सुरक्षेचे महत्त्व सांगून संस्थेच्या कामगिरीचे वर्णन केले. या प्रसंगी शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष राजूभाऊ हंबर्डे, माजी जि प सदस्य साहेबरावजी हंबर्डे, विश्वनाथ रावजी हंबर्डे, व इतर मान्यवर उपस्थित होते. या कार्यक्रमाला यशस्वी करण्यासाठी शाळेतील शिक्षक उदय हंबर्डे, शिवाजी वेदपाठक, कृष्णा बिरादार, आनंद बळगे, पाटील सर, इमनेलू सर, विकास दिग्रसकर, यांचे विशेष योगदान होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन एम. ए. खदीर यांनी केले तर मान्यवरांचे आभार प्रशालेच्या मुख्याध्यापिका सौ उज्वलाताई जाधव मॅडम यांनी मानले .

## उपविभागीय पोलीस अधिकाऱ्यांनी पकडला ट्रॅक्टर

**तभा वृतसेवा**
**माहूर, दि. १७ ऑक्टोबर-**

माहूर तालुक्याला उपविभागीय अधिकारी पोलीस अधिकारी म्हणून नव्याने रुजू झालेले किरण भोंडवे यांनी तालुक्यातील ईवळेश्वर रस्त्यावर कुठल्याही प्रकारची परवानगी नसताना अवैधरित्या ट्रॅक्टर मध्ये वाळू भरून नेत असताना रात्रीला पाठलाग करून ट्रॅक्टर पकडून जप्त करत माहूर पोलीस ठाण्यात आणून जमा केल्याची धाडसी कारवाई केल्याची खळबळजनक घटना दि.१६ ऑक्टोबर रोजी सायंकाळी साडेसात वाजता घडली. या धडक कारवाईमुळे वाळू तस्करांमध्ये खळबळ उडाली आहे.



पावसाळा संपण्याआधीच वाळू तस्करांनी नांग्या वर काढून नदी नाले ओढ्यातून वाळू तस्करी सुरू केल्याची चर्चा होत असतानाच नव्याने रुजू झालेले तरुण तडफदार उपविभागीय पोलीस अधिकारी किरण भोंडवे यांना माहिती मिळाल्याने वानोळा परिसरात गस्तीवर असताना कुपटी ते इवळेश्वर रस्त्यावर एक ट्रॅक्टर लाईट बंद करून जातानाचा आवाज आल्याने त्यांनी त्याचा पाठलाग केला. इवळेश्वर जवळ त्यास अडवून तपासणी केली असता ट्रॅक्टर क्रमांक एम एच २९ बी व्ही ४११५ आढळून आला. त्यामध्ये वाळू भरून दिसल्याने त्यांनी सोबतच्या पोलिसांना त्यास माहूर पोलीस स्टेशनमध्ये आणण्याचे सांगून पोलीस ठाण्यात आणल्यानंतर त्यावर कायदेशीर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या कार्यवाहीत उपविभागीय पोलीस अधिकारी किरण भोंडवे यांचेसह पोउपनी शरद घोडके, सपोउपनी पालसिंग ब्राह्मण, पोका अवधूत कावडे, नवनाथ कोरडे, परमेश्वर मामीलवाड,दत्तात्रय सोनटक्के,यांचे सह पोलिसांनी सहभाग घेतला. उपविभागीय पोलीस अधिकारी किरण भोंडवे यांनी आल्या आल्याच लपून-छपून सुरू असलेल्या अवैध व्यवसायांवर प्रहार करणे सुरू करून वाळू तस्करांनाही दणका दिल्याने, उपविभागीय पोलीस अधिकारी किरण भोंडवे यांचे कायदा व शांतताप्रिय नागरिकांमधून अभिनंदन होत आहे.

## जिल्ह्यात उत्कृष्ट कामगिरी; पो. नि. चिंचोलकर व टीमचा गौरव

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. १७ ऑक्टोबर-**

मागील सप्टेंबर महिन्यामध्ये नांदेड जिल्यात मध्ये ३६ पोलीस स्टेशन पैकी उत्कृष्ट कामगिरी बाबत नांदेड ग्रामीण पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर व त्यांच्या टिमचा उत्कृष्ट कामा बाबत दोन प्रशस्तीपत्र देऊन विशेष पोलीस उप महानिरीक्षक शहाजी उमाप गौरव केला आहे.



नांदेड जिल्ह्यामध्ये कौतुकास्पद कामगिरी मध्ये अनेक गुन्हेगारांना प्रतिबंध करून त्यांना एक वर्षासाठी जेलमध्ये पाठवले, अनेक गुन्हेगारांना हद्दपार केले, इतर गुन्हेगार व दारू विक्रेते यांच्यावर उत्कृष्ट प्रतिबंधक कारवाई करण्यात आली. तसेच नांदेड ग्रामीण हद्दीतील जास्तीत जास्त समन्स बजावणी करून ९२ टक्के पेक्षा जास्त समन्स बजावणी केली व जास्तीत जास्त साक्षीदार यांना न्यायलयात हजर करण्यात आले. या कामगिरी बद्दल पो.नि. चिंचोलकर, पो. हवा. मुंडे, पो.हवा. जगताप, पो. हवा जाधव यांना प्रशस्तीपत्र देऊन गौरव करण्यात आला.

चालू वर्षात पोलीस अधीक्षक अविनाश कुमार यांनी ग्रामीण पोलिसांच्या विविध हेड खालील उत्कृष्ट कामगिरी संबंधाने चार वेळा प्रशस्ती पत्र देऊन गौरव केलेला आहे.

दरम्यान पो.नि. चिंचोलकर यांच्या कार्यकाळामध्ये ग्रामीण पोलीस स्टेशन मधील गुन्हेगारांवर वचक बसली असून गुन्हेगारी कमी झालेली आहे.

## बारड येथे सामाजिक बाधिलकी व शैक्षणिक विकासाकरिता सहविचार सभा

**तभा वृतसेवा**
**मुदखेड, दि. १७ ऑक्टोबर-**

मुदखेड तालुक्यातील बारड ग्रामपंचायत, व्यापारी संघटना, व स्वामी विवेकानंद शिक्षण प्रसारक मंडळ बारड यांच्या संयुक्त विद्यमाने दि.१६ ऑक्टोबर रोजी विठ्ठलरुक्मिणी मंदिर या ठिकाणी सामाजिक बांधिलकी व शैक्षणिक समस्या या संदर्भात चर्चासत्र आयोजित केलेले होते या बैठकीस कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून संजयराव देशमुख बारडकर तर प्रमुख पाहुणे: बाळासाहेब देशमुख बारडकर (माजी सरपंच) आनंदराव गादीलवाड (माजी पंचायत समिती सभापती मुदखेड) सौ शुभांगी तळणकर मॅडम (मुख्याध्यापिका जि.प.हा. बारड )



दिगंबरराव गुरुजी, हरिश्चंद्र देशमुख,बन्सीलाल बिहारी दरक,ओम प्रकाश गोविंदराव कवळे,राजगोपाल बाहेती,संजय रघुनाथराव देशमुख,गजानन कचरे,कैलास पुलकुंटवार,साजिद पठाण,दिलीप कल्याणकर,आशिष देशमुख, डॉ. शिंदे, डॉ. चिंतले, डॉ. एस एन देशमुख, डॉ. कस्तुरे, डॉ सुरज शिदे, यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये सरस्वती मातेच्या प्रतिमेचे पूजन करून विचार सभेला सुरुवात झाली कार्यक्रमाच्या प्रास्ताविकातून प्रा.डॉ.पंजाब शिंदे यांनी कार्यक्रमाचा उद्देश सांगताना गावागावांतील लोप पावत चाललेला एकोपा राजकारणामुळे होत अडलेली टोकाची दुही, गावात जरब असलेल्या माणसाचा अभाव, शिक्षणामध्ये विद्यार्थ्यांची उदासीनता, पालकांचे दुर्लक्ष, विद्यार्थ्यांकडून गैरवर्तन होत असताना समाजाची होत असलेली डोळेझाक, यासंदर्भानेच उपस्थित होत असलेल्या प्रश्नांना वाचा फोडण्यासाठी कार्यक्रम ठरल्याचे सांगितले.

उपस्थित सुजान नागरिकांसमोर सेवानिवृत शिक्षक दिगंबरराव कदम गुरुजी यांनी दीर्घ मार्गदर्शनात आपल्या असलेल्या सामाजिक बांधिलकी व त्यातून उत्तराई होण्यासाठी आपले कर्तव्य तसेच शिक्षणाप्रती पालकांनी सजग कसे असावे यासंदर्भात मार्गदर्शन केले. सौ तळणकर मॅडम यांनी विद्यार्थी पालक शिक्षक या त्रिकोणाबरोबरच चौथा कोण समाज म्हणून आपली ही तितकीच महत्त्वाची भूमिका विद्यार्थ्यांच्या शिक्षणामध्ये असून त्यांना आधुनिक शिक्षणाच्या प्रवाहामध्ये तारून जाण्यासाठी जिद्दीने अभ्यास करण्यासाठी पालकांनी लक्ष द्यावे व सकारात्मक विचाराची पेरणी विद्यार्थ्यांमध्ये कशी करावी यासंदर्भात मार्गदर्शन केले.

अध्यक्ष समारोपमध्ये संजय देशमुख बारडकर यांनी बारड गावातील व पंचक्रोशीतील वैभवशाली इतिहास सांगताना जाती धर्मातील असलेला सलोखा,एकमेकावर असलेली नैतिक जबाबदारी, त्याचबरोबरच सामाजिक भान याचा उलगडा करताना जुन्या गावाचे चित्र सर्वांच्या डोळ्यासमोर उभे केले. त्याबरोबरच राजकीय पटलावर क्रांतीवीरांपासून ते राजकीय क्षेत्रात उतुंग कार्य करणाऱ्या कै. रंगराव देशमुख, कै. माजी आ. साहेबराव बापू, राजाराम देशमुख, शंकरराव देशमुख बारडकर यांची राजकीय कारकिर्दी सांगितली व बारडच्या विकासात व्यापारी वर्गाचे महत्त्व यावरही प्रकाश टाकला, नागरिकांना व पालकांना आपल्या जबाबदाऱ्यांची आठवण करून दिली याप्रसंगी गावातील प्रतिष्ठित व्यापारी सुजाण नागरिक शेतकरी पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. मनोहर ओसावार यांनी केले तर आभार प्रदर्शन प्रा.कैलास खानसोळे यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी ग्रामपंचायत बारड,व्यापारी संघटना व स्वामी विवेकानंद शिक्षण प्रसारक मंडळ चे कार्यकारी संचालक मंडळांनी योगदान दिले.

## शासकीय रुग्णालयातील उपकरणे रुग्णसेवा पारदर्शकतेसाठी कठोर कायदा होणार

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. १७ ऑक्टोबर-**

ग्रामीण भागातील आरोग्याचा कणा म्हणून ओळखल्या जाणाऱ्या शासकीय रुग्णालयामधील उपकरणांची बऱ्याच वेळा मोठ्या प्रमाणात धूळखात पडतात , नासधूस होत असते किंबहुंना अनेक वेळा असे साहित्य चोरीस जाते , अडगळीला पडते , नादुरुस्त होते त्यामुळे गोरगरीब रुग्णांना योग्य उपचार मिळत नाहीत . ही बाब लक्षात घेता खा. डॉ. अजित गोपछडे यांनी शासकीय रुग्णालयामध्ये वैद्यकीय उपकरणांची नियमित आणि कार्यक्षम देखभाल करण्यासाठी कठोर कायदा करून केंद्रीय पोर्टल स्थापन करावे अशी मागणी केली होती या मागणीनुसार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महत्त्वपूर्ण निर्णय घेत असे कठोर कायदा करत वेब पोर्टल तयार करण्याचे अनुषंगाने संबंधित विभागाला आदेश दिले आहेत.



ग्रामीण भागातील सर्वसामान्य नागरिकांच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी शासकीय रुग्णालये काम करतात . या ठिकाणी असलेल्या वैद्यकीय उपकरणांची नियमित आणि कार्यक्षम देखभाल करणे अत्यंत आवश्यक असते. तांत्रिक सहाय्य व साधनसामग्रीची मर्यादा लक्षात घेता उपकरणे वेळेवर दुरुस्त होणे कठीण जात असल्याचे अनेकवेळा निदर्शनास आले आहे. नादुरुस्त किंवा अडगळीत पडलेल्या तांत्रिक साधनसामग्रीचा थेट परिणाम रुग्ण सेवेवर होतो आहे . एक्सरे , सिटी स्कॅन , एम आर आय मशीन , सोनी ग्राफी अशी महत्वाची उपकरण असूनही बंद आहेत असे सांगितले जाते . त्यामुळे गोरगरीब रुग्णांची मोठी हेळसांड होते. या पार्श्वभूमीवर शासकीय रुग्णालयामधील उपकरणांच्या देखभालीसाठी एक मजबूत आणि सुसंगत यंत्रणा उभी करणे आवश्यक आहे . त्यासाठी सर्व शासकीय रुग्णालयातील उपकरणांची सविस्तर माहिती नोंदवण्यासाठी एक केंद्रीकृत वेब पोर्टल सुरू करण्याबाबत आणि कठोर कायदा करण्यासाठी खा. डॉ. अजित गोपछडे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना दिनांक २४ जुलै २०२५ रोजी पत्र लिहिले होते. या पत्राची दखल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गंभीरपणे घेतली असून आरोग्य विभाग लवकरच एक केंद्रीकृत वेब पोर्टल तयार करेल असे आदेश काढले आहेत. केंद्रीकृत वेब पोर्टल आणि कठोर कायदा झाल्यानंतर संबंधित सर्व शासकीय रुग्णालयातील उपकरणांची संपूर्ण माहिती या पोर्टलवर उपलब्ध होणार आहे . त्यामुळे कोणत्या शासकीय रुग्णालयात कोणत्या उपकरणांची तुट आहे .उणीव आहे , ती उपकरण नादुरुस्त आहेत किंवा संबंधित साहित्य चोरीस गेले आहे याबाबत ही माहिती मिळणार आहे. यावर उपाययोजना करण्यास मोठी मदत मिळणार आहे. परिणामी तांत्रिक साधनसामुग्रीचे केंद्रीकरण होऊन गोरगरीब सामान्य रुग्णांना अधिकाधिक आरोग्य सेवा मिळण्यास मदत होईल याबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे खा. डॉ. अजित गोपछडे यांनी आभार व्यक्त केले आहेत.

## दिवाळी पहाट कार्यक्रम रद्द करण्याची पत्रकार कृती समितीची मागणी

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. १७ ऑक्टोबर-**

नांदेड जिल्ह्यात यावर्षी अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांवर मोठे संकट ओढावले आहे. पूरपरिस्थितीमुळे शेतीचे आणि घरांचे प्रचंड नुकसान झाले असून अनेक शेतकरी आर्थिक विवंचनेत सापडले आहेत. अशा परिस्थितीत जिल्हा प्रशासनाने आयोजित केलेल्या दिवाळी पहाट कार्यक्रमाला विरोध करत नांदेड जिल्हा पत्रकार कृती समितीने हा कार्यक्रम रद्द करण्याची मागणी केली आहे.



निवासी उपजिल्हाधिकारी यांना दिलेल्या निवेदनात पत्रकार कृती समितीने स्पष्टपणे नमूद केले आहे की जगाचा पोशिंदा असलेला शेतकरी सध्या अडचणीत आहे. पुरामुळे त्यांचे संसार उघड्यावर आले असून आर्थिक नुकसान भरून काढण्यासाठी शासनाची मदत अपुरी आहे. अशा स्थितीत जिल्हा प्रशासनाने दिवाळी पहाट सारखा मनोरंजनात्मक कार्यक्रम आयोजित करणे हे शेतकऱ्यांच्या जखमांवर मीठ चोळण्यासारखे आहे असा आरोप निवेदनात करण्यात आला आहे.

पत्रकार कृती समितीने यावेळी सुचवले आहे की दिवाळी पहाट कार्यक्रमासाठी नियोजित केलेला निधी शेतकऱ्यांच्या मदतीसाठी वापरावा. विशेषतः ज्या शेतकऱ्यांना तांत्रिक अडचणींमुळे अद्याप मदत मिळालेली नाही, अशा शेतकऱ्यांना या निधीतून मदत करण्यात यावी, अशी विनंती समितीने केली आहे.

या निवेदनाद्वारे पत्रकारांनी जिल्हा प्रशासनाकडून सामाजिक भान ठेवण्याची अपेक्षा व्यक्त केली आहे. संकटग्रस्त शेतकऱ्यांना सावरण्यासाठी प्रशासनाने पुढाकार घेणे गरजेचे आहे आणि त्याऐवजी अशा कार्यक्रमांवर खर्च करणे ही असंवेदनशीलता आहे असेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे.





अतिवृष्टीमुळे शेतकरी आर्थिक संकटात असला तरी आपली हिंदू संस्कृती जपण्यासाठी दिवाळी सण उत्साहात साजरा करण्यासाठी काही प्रमाणात का होईना दिवाळीचे आकाश दिवे, पणत्या बाजार पेठेत विक्रीसाठी उपलब्ध झाले आहेत. (छाया–कृष्णा शिंदे)

# राष्ट्रवादीच्या बैठकीत प्रवेशासाठी गर्दी; खा.सोनवणेंकडून कार्यकर्त्यांना ताकद देण्याचा शब्द

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१७ ऑक्टोबर**

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या अनुषंगाने दि.१६ ऑक्टोबर रोजी राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष केज तालुक्यातील प्रमुख पदाधिकारी व कार्यकर्त्यांची महत्त्वपूर्ण बैठक येडेश्वरी साखर कारखाना युनिट नं.१, आनंदगाव (सा.) येथे संपन्न झाली. यावेळी बैठकीत कार्यकर्त्यांनी प्रवेशासाठी अक्षरश: रांग लागली होती. यावेळी आगामी निवडणूक कार्यकर्त्यांची निवडणूक असल्याने कार्यकर्त्यांच्या पाठिशी उभा राहून ताकद देऊ, असा विश्वास खा.बजरंग सोनवणे यांनी दिला.

येडेश्वरी साखर कारखाना येथील बैठकीत बनसारोळा येथील माजी जि.प.सदस्य अशोक गायकवाड, माजी सरपंच युवराज काका काकडे, चिंचोलीमाळी येथील लहुजी वस्ताद सेवाभावी संस्था चे अध्यक्ष विठ्ठल झाडे, पिसेगाव येथील नवनाथ नेहरकर, आनेगावचे माजी सरपंच आप्पासाहेब हंडीबाग, श्री. एकनाथ हंडीबाग, विष्णू इंगळे, बिभीषण राऊत, विक्रम हंडीबाग, भैरवनाथ हंडीबाग, श्रीधर हंडीबाग, लक्ष्मण हंडीबाग, श्री. जिवराज हंडीबाग, श्री. नरसिंग हंडीबाग, नवनाथ हंडीबाग, अशोक हंडीबाग, नानासाहेब हंडीबाग, ज्ञानेश्वर खोडसे, श्री. दशरथ हंडीबाग, श्री. तुकाराम इंगळे, युसूफ वडगाव येथील युवा कार्यकर्ते विजय भूमकर, शिवानंद खरबड, शांतिलिंग खरबड तसेच असंख्य कार्यकर्त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरदचंद्र पवार) पक्षात प्रवेश केला. बैठकीस राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरद चंद्र पवार) पक्षाचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष पक्षाच्या प्रदेश उपाध्यक्षा मा.आ.संगिता ठोंबरे, मा.आ.पृथ्वीराज साठे, पं.स.केज माजी सभापती अशोक तात्या तारळकर, खरेदी विक्री संघ केजचे अध्यक्ष बालासाहेब दादा बोराडे, मा.जि.प.सदस्य युवराज गोरे, माजी अध्यक्ष विलास जोगदंड, पंचायत समिती केजचे माजी सभापती ज्ञानेश्वर चवरे, केज तालुकाध्यक्ष शंकर जाधव, महिला तालुकाध्यक्ष तसलीम इनामदार, केज शहराध्यक्ष शब्दो खतीब माजी पं.स.सदस्य बंडू चौधरी, पिंटू ठोंबरे, गुंडाप्पा भुसारी, प्रेमचंद कोकाटे, न.पं.केजचे नगरसेवक भाऊसाहेब गुंड, बालासाहेब जाधव, माजी नगरसेवक कपिल मस्के, शरीफ सय्यद, शितल लांडगे, विमल जोगदंड, व पंचक्रोशितील सर्व सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य, सेवा सहकारी सोसायटीचे चेअरमन, व्हा.चेअरमन, संचालक तसेच असंख्य कार्यकर्ते उपस्थित होते.

# राज्यस्तरीय व विभागस्तरीय व्हॉलीबॉल क्रीडा स्पर्धांसाठी तयारीला वेग

## जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली पूर्वतयारी नियोजन बैठक संपन्न

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१७ ऑक्टोबर**

राज्यस्तरीय तसेच विभागस्तरीय क्रीडा स्पर्धांचे यंदाचे आयोजन भव्य स्वरूपात करण्यात येणार असून त्याच्या यशस्वी आयोजनासाठी जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालयाच्या प्रगती सभागृहा पूर्वतयारी बैठक संपन्न झाली.

या बैठकीस जिल्हा क्रीडा अधिकारी, पोलीस अधीक्षक प्रतिनिधी, आरोग्य विभागाचे अधिकारी, शिक्षण विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग तसेच विविध क्रीडा संघटनांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

या बैठकीत जिल्हाधिकारी यांनी सांगितले की, ही स्पर्धा म्हणजे जिल्ह्यातील तरुणाईसाठी एक उत्तम व्यासपीठ आहे. खेळाडूंना योग्य सुविधा, निवास, भोजन व वैद्यकीय सुविधा वेळेवर उपलब्ध होणं आवश्यक आहे. त्यांनी सर्व संबंधित विभागांना समन्वयाने काम करून स्पर्धेच्या तयारीत कोणतीही कमतरता राहू न देण्याचे निर्देश दिले.तसेच क्रीडा स्पर्धेत उत्कृष्ट आलेल्या खेळाडूंना उत्तम प्रकारची ट्रॉफी, प्रमाणपत्र देऊन त्यांचा उत्साहा वाढावा यादृष्टीने त्यांचा यथोचित गौरव करण्यात यावा.

या स्पधेत १७ वर्षे मुले व मुली. सहभागी होऊ शकतील. या स्पर्धा दि. २९ ते ३१ ऑक्टोबर या दरम्यान बीड येथे छत्रपती संभाजी मैदान येथे व्हॉलीबॉल स्पर्धा आयोजन करण्यात येणार आहेत.

जिल्हाभरातून आणि विभागातील विविध तालुक्यांतून खेळाडू सहभाग घेणार आहेत.

महत्त्वाचे निर्णय:

सर्व खेळांच्या मैदानांची साफसफाई व आवश्यक दुरुस्ती तत्काळ पूर्ण करण्याचे आदेश सार्वजनिक बांधकाम विभागाला देण्यात आले.आरोग्य विभागाने वैद्यकीय पथकाची नियुक्ती करावी, तसेच प्रत्येक मैदानावर प्राथमिक उपचार किट उपलब्ध ठेवण्यात यावे.पोलीस विभागाने वाहतूक व सुरक्षेच्या दृष्टीने नियोजन करावे. स्थानिक विद्यालये व महाविद्यालयांच्या विद्यार्थ्यांची स्वयंसेवक म्हणून नेमणूक करण्यात यावी.

बैठकीच्या शेवटी जिल्हाधिकारी यांनी सर्व विभागांना समन्वयाने काम करून ही स्पर्धा एक आदर्श आयोजन ठरेल, यासाठी प्रयत्न करण्याचे आवाहन केले.

युवा महोत्सव सांस्कृतीक नवोक्रम व विकसीत भारत

जिल्हास्तर व विभागस्तर युवा महोत्सव आयोजन समिती यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या विकसित भारत सांस्कृतिक नवोपक्रम विकसित भारत सांस्कृतिक नवोपक्रमासाठी जिल्हा व विभागस्तरीय युवा महोत्सव

जिल्हा व विभागस्तर युवा महोत्सव आयोजन समिती यांच्या अध्यक्षतेखाली विकसित भारत २०४७ या संकल्पनेवर आधारित सांस्कृतिक नवोपक्रम बैठकीत युवा महोत्सवाच्या आयोजनासाठी आवश्यक असलेल्या विविध बाबींवरही सविस्तर चर्चा करण्यात आली. यात सांस्कृतिक कार्यक्रमांचे नियोजन, युवक–युवतींची निवड प्रक्रिया, पारंपरिक व आधुनिक कलांच्या सादरीकरणाची रूपरेषा, प्रचार व प्रसाराचे माध्यम, तसेच आयोजनासाठी लागणाऱ्या सुविधांची पूर्वतयारी यावरही चर्चा करण्यात आली.

विकसित भारताचे स्वप्न साकार करण्यासाठी युवकांचे योगदान महत्त्वाचे आहे. या महोत्सवाच्या माध्यमातून नवोदित कलाकारांना व्यासपीठ मिळेल आणि त्यांच्यातील कलागुणांना चालना मिळेल.

तसेच, सर्व संबंधित विभागांनी परस्पर सहकार्याने नियोजन वेळेत पूर्ण करण्याचे निर्देश देण्यात आले.या महोत्सवातून केवळ सांस्कृतिक उन्नतीच नव्हे, तर सामाजिक एकात्मता, पर्यावरण संवर्धन, डिजिटल साक्षरता अशा अनेक विषयांचा समावेश असणार आहे.शेवटी सर्व उपस्थितांनी उत्साहपूर्वक सहभाग देत कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी पूर्ण सहकार्याचे आश्वासन दिले.शशबैठकीपूर्व जिल्हा क्रिडा अधिकारी अरविंद विद्यागर यांनी प्रस्ताविक केले.

# आरोग्य कर्मचारी महासंघाच्या बीड जिल्हाध्यक्षपदी अशोक ठोसर तर उपाध्यक्षपदी करणकुमार जोगदंड



**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१७ ऑक्टोबर**

आरोग्य कर्मचारी महासंघाच्या जिल्हाध्यक्षपदी अशोक ठोसर तर उपाध्यक्षपदी करणकुमार जोगदंड यांची निवड करण्यात आली.

आरोग्य कर्मचारी महासंघाचे राज्याध्यक्ष विजय मोहरकर आणि राज्यउपाध्यक्ष शेळके व बाबासाहेब राख यांच्या विशेष उपस्थितीत आरोग्य कर्मचारी महासंघ बीड जिल्हा कार्यकारिणीची निवड करण्यासाठी बैठक घेण्यात आली. यात जिल्हाध्यक्षपदी अशोक रामनाथ ठोसर यांची तर जिल्हा उपाध्यक्षपदी करणकुमार जोगदंड यांची सर्वांमध्ये निवड जाहीर करण्यात आली. यावेळी जिल्हा हिवताप अधिकारी विजयसिंह शिंदे, सुनिल गायकवाड, जीवन सानप, एस. पी कुलकर्णी, सुधाकर कुलकर्णी, राजेश कोलुगडे यांनी उपस्थित राहून नवनियुक्त पदाधिकाऱ्यांना शुभेच्छा दिल्या. संघटनेच्या कामाला गती देण्यासाठी आणि आरोग्य कर्मचाऱ्यांचे प्रश्न प्रभावीपणे मांडण्यासाठी ही निवड महत्त्वाची ठरणार आहे. नवनियुक्त जिल्हाध्यक्ष अशोक ठोसर यांनी कर्मचाऱ्यांच्या हितासाठी महासंघ कटीबद्ध राहील असे आश्वासन दिले याप्रसंगी महासंघाचे पदाधिकारी, सदस्य उपस्थित होते.

# प्रा.डॉ.सिद्धार्थ मस्के यांचा गुजरात उच्च शिक्षण विभागाकडून गौरव

**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.१७ ऑक्टोबर**

केसापुरी वसाहत येथील प्रा.डॉ.सिद्धार्थ श्रीहरी मस्के (डउजझए) सोसायटी फॉर क्रियेशन अपोर्च्युनिटी थ्रू प्रोफीशीयंसी इन इंग्लिश प्रकल्प उच्च शिक्षण विभाग गुजरात आणि केंब्रिज विद्यापीठ,यू.के.यांच्या संयुक्त उपक्रमा अंतर्गत दक्षिण गुजरात विभागातून गर्वनमेंट आर्टस् अँड कॉमर्स कॉलेज,अहवा जि. डांग यास पहिली रँक प्राप्त झाल्याबद्दल या विशेष कामगिरीसाठी उच्च शिक्षण विभाग,गुजरात द्वारा गर्वनमेंट आर्टस् अँड कॉमर्स कॉलेजचे प्राचार्य डॉ.यु.के.गांगुर्डे व आहवाचे स्कोप समन्वयक डॉ.सिद्धार्थ श्रीहरी मस्के यांना प्रमाणपत्र तसेच कॉलेजला मोमेंटो देऊन गौरव करण्यात आला.तसेच उत्तीर्ण विदयार्थ्यांना केंब्रिज विद्यापीठचे प्रमाणपत्र प्रदान करण्यात आला असून त्यांना सौ.वृंदावणी श्रीहरी मस्के, डॉ.सविता सिद्धार्थ मस्के,पदमीन सिताराम मस्के,संध्या विजय मस्के,सुनील मस्के,अनिल मस्के,कलावती श्रीकांत मस्के,प्रा.शिवदास घाडगे,उत्तमराव वाघमारे,प्रा. प्रसेंजित मस्के,भागवत सिरसट,ऍड.रविकांत उघडे यांच्यासह सर्वस्तरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.




# प्रा.नरेशकुमार जैस्वाल यांना पीएचडी प्राप्त

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१७ ऑक्टोबर**



श्री बालाजी शिक्षण प्रसारक मंडळ अंबाजोगाई संचलित फार्मसी कॉलेज अंबाजोगाई येथील प्रा. नरेशकुमार जैस्वाल यांना मध्यप्रदेश विद्यापीठाकडून नुकतीच पीएचडी पदवी प्राप्त झाली आहे. प्रा नरेशकुमार जैस्वाल यांनी मानसरोवर ग्लोबल युनिव्हर्सिटी, मध्य प्रदेश. मधून फार्मासुटिकल सायन्स या विषयात पीएचडी मिळवली आहे.

एनहांसमेंट ऑफ सोलुबीलीटी फोर प्युअरली सोल्यूबल ड्रग्स हा त्यांच्या प्रबंधाचा विषय होता. या विषयात जैस्वाल यांनी सखोल अभ्यास करून व त्यावर अनेक बाबींवर संशोधन करून आपाला प्रबंध मध्यप्रदेश विद्यापीठास दाखल केला होता. दाखल केलेल्या प्रबंधाचा विचार व अभ्यास करून मानसरोवर ग्लोबल युनिव्हर्सिटी मध्यप्रदेशच्या वतीने प्रा नरेशकुमार जैस्वाल यांना नुकतीच त्या विष्यायावर पीएचडी प्रदान केली आहे. या पीएचडी साठी त्यांना डॉ. अमित कुमार अग्रवाल यांचे बहुमोल असे मार्गदर्शन लाभले. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत प्रा नरेशकुमार जैस्वाल यांनी हे यश संपादित केले आहे. श्री बालाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थापक राजकिशोर मोदी, अध्यक्ष भूषण मोदी, कार्यकारी संचालक संकेत मोदी, प्रा. वसंत चव्हाण, डॉ. डी.एच. थोरात , टी. बी. गिरवलकर कॉलेज ऑफ इंजीनियरिंग चे प्राचार्य डॉ. बी. आय. खडकभावी, प्रा बिराजदार , प्रा राजमाने सर, प्राचार्य डॉ. संतोष तरके यांच्यासह महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक वृंद, मित्र परिवाराच्या वतीने प्रा नरेशकुमार जैस्वाल यांचे अभिनंदन करत त्यांना पुढील कार्यासाठी शुभेच्छा देण्यात येत आहेत.

# कपिलधारवाडीतील सर्पदर्शमुळे गायीचा मृत्यू

## गावकऱ्यांची शासनाकडे मदतीची मागणी

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१७ ऑक्टोबर**



बीड तालुक्यातील कपिलधारवाडी येथे घडलेल्या दुर्दैवी घटनेने ग्रामस्थांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. शेतकरी सुंदरराव बलभीम शिंदे यांच्या दुभत्या गायीचा सर्पदर्शनामुळे मृत्यू झाला असून, या घटनेने शिंदे कुटुंब आर्थिक संकटात सापडले आहे.गावातील भूस्खलन आणि घरांना तडे गेल्याने महावितरणकडून वीजपुरवठा बंद करण्यात आला आहे. त्यामुळे गाव अंधारात बुडालेले असताना, सर्पाने गोठ्यात प्रवेश करून गायीवर हल्ला केल्याचे समजते.शेतकरी शिंदे यांचे मुख्य उत्पन्न दुभत्या गायींच्या दुधावर अवलंबून आहे. त्यामुळे या गायीच्या मृत्यूमुळे कुटुंबावर उपासमारीची वेळ आली आहे. याशिवाय वीज नसल्याने गुरांसाठी पाण्याची टंचाई निर्माण झाली आहे.गावकऱ्यांचे म्हणणे आहे की, वीज व पाणी व्यवस्थेच्या अभावामुळे गुरे व शेतकरी मोठ्या संकटात सापडले आहेत. त्यांनी शासनाकडे तातडीने वीजपुरवठा सुरू करण्याची व गुराढोरांसाठी पाणी उपलब्ध करून देण्याची मागणी केली आहे.

सध्या कपिलधारवाडीतील काही कुटुंबे स्थलांतरित झाली आहेत, तर उर्वरित ग्रामस्थ शासनाच्या मदतीची वाट पाहत आहेत. गावकऱ्यांचे मत आहे की, प्रशासनाने योग्य ती उपाययोजना न केल्यास अशा घटना पुन्हा घडू शकतात.

शेतकऱ्यास नुकसानभरपाईची मागणी

ग्रामस्थांनी प्रशासनाकडे पंचनामा करून शिंदे यांना योग्य नुकसानभरपाई देण्याची मागणी केली आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार, शासनाने तत्काळ मदत न केल्यास शेतकरी व पशुसंवर्धन क्षेत्र दोन्हीवर गंभीर परिणाम होऊ शकतो.

# प्रकाशाचा विजय : २०२५ च्या सावल्यांतून उगवणारी दीपावली

अंधाराचा अंत हाच प्रकाशाचा जन्म असतो – ही ओळ २०२५ च्या जगाला अगदी साजेशी वाटते . युद्ध , नैसर्गिक आपत्ती , आर्थिक चढउतार , आणि तंत्रज्ञानाच्या वेगवान लाटेमुळे जग आज एका विचित्र द्वंद्वातून जात आहे . माणूस प्रगतीच्या प्रकाशात पुढे जातोय , पण मनाच्या गाभाऱ्यात थकलेला दिसतो . अशा पार्श्वभूमीवर दीपावली पुन्हा एकदा सांगते – आशेचा दिवा कधीही विझू देऊ नकोस .




दीपावली हा फक्त सण नाही , तर भारतीय संस्कृतीचा श्वास आहे . प्रत्येक दिवा म्हणजे उजेडाची प्रार्थना , प्रत्येक रांगोळी म्हणजे आनंदाचे चित्र , आणि प्रत्येक फुलबाजीतून उमटणारी चमक म्हणजे आशेचा ठिणगा . परंपरेने हा सण अंधारावर प्रकाशाचा , असत्यावर सत्याचा आणि दुःखावर आनंदाचा विजय साजरा करणारा आहे.

दीपावली पर्व – पाच दिवसांचा प्रकाशोत्सव

भारतामध्ये दीपावली हा एक दिवसाचा नव्हे , तर पाच दिवसांचा प्रकाशोत्सव आहे. या प्रत्येक दिवसाचा एक सुंदर अर्थ आहे .

पहिला दिवस – धनत्रयोदशी : आरोग्य आणि संपत्तीचे प्रतीक , या दिवशी धन्वंतरी देवतेची पूजा होते.

दुसरा दिवस – नरक चतुर्दशी (लहान दिवाळी) : श्रीकृष्णाने असुर नरकासुराचा वध केला , म्हणून हा दिवस वाईटावर चांगुलपणाचा विजय म्हणून साजरा होतो .

तिसरा दिवस – लक्ष्मीपूजन (मुख्य दिवाळी) : या रात्री लक्ष्मीदेवीची आराधना केली जाते . घराघरांत दिव्यांची रांग , सुगंधी फुले , रांगोळ्या आणि गोडधोड पदार्थांची रेलचेल असते .

चौथा दिवस – पाडवा (बलिप्रतिपदा) : राजा बळी आणि विष्णू यांची कथा स्मरून कृतज्ञतेचा सण म्हणून पती–पत्नी एकमेकांप्रती स्नेह व्यक्त करतात .

पाचवा दिवस – भाऊबीज : भाऊ–बहिणींच्या प्रेमाचा उत्सव . बहिण भावाला आरती करून दीर्घायुष्याची प्रार्थना करते .

ही परंपरा केवळ धार्मिक नाही , तर भारतीय कुटुंब व्यवस्थेतील आपुलकी आणि ऐक्य यांचे प्रतीक आहे .

२०२५ हे वर्ष विरोधाभासांनी भरलेले ठरले . युरोपमध्ये युद्धाचे सावट , मध्यपूर्वेतील संघर्ष , आणि आफ्रिकेतील दुष्काळ – या सर्वांनी मानवतेच्या मुळावर घाव घातला . तुर्कीतील भूकंपाने हजारो कुटुंबे उद्ध्वस्त झाली , तर हवामान बदलामुळे जगभरात नैसर्गिक आपत्तींची मालिका सुरू राहिली . परंतु या अंधारातही काही उजेडाचे किरण होते – कृत्रिम बुद्धिमत्तेतील प्रगती , आरोग्य क्षेत्रातील नवे संशोधन , आणि अवकाशात झेप घेणारा भारत . चांद्रयान – ३ च्या यशानंतर आता मंगळयान – २ ची तयारी सुरू आहे . ‘ मेड इन इंडिया ’च्या बळावर भारताने आत्मनिर्भरतेचा नवा अध्याय लिहिला आहे .

आजची दीपावली परंपरा आणि आधुनिकतेचा सुंदर संगम घडवते . शहरांत स्मार्ट दिवे , इको–फ्रेंडली रांगोळ्या आणि डिजिटल शुभेच्छा , तर गावांत मातीच्या दिव्यांचा मंद उजेड आणि श्रद्धेचा सुगंध . लक्ष्मीपूजनाच्या रात्री घराघरांत दिव्यांची माळ झळकते , पण खरा प्रकाश माणसाच्या अंतःकरणात झिरपतो . दिवा जळतो तो दुसऱ्यांसाठी ही म्हण आजही तितकीच खरी आहे . पाडव्याच्या दिवशी पती–पत्नीतील स्नेहाचे बंध दृढ होतात , तर भाऊबीजेच्या ओवाळ्यात भाव–बहिणींचे नाते उजळते .

जगभरातही दीपावलीचा प्रकाश पसरला आहे . लंडन , न्यूयॉर्क , सिंगापूर , मॉरिशस , आणि कॅनडा येथे ‘ फेस्टिवल ऑफ लाइट्स ’ म्हणून भारतीय संस्कृतीचा हा उत्सव साजरा होतो . २०२५ मध्ये लंडनच्या ट्रॅफल्गार स्केअरवर सस्टेनेबल दिवाळी या संकल्पनेखाली प्लास्टिकविरहित सजावट आणि एकत्रित प्रार्थना करण्यात आली . तमसो मा ज्योतिर्गमय या मंत्राचा अर्थ जग आता अनुभवत आहे .

फटाक्यांच्या धुरात हरवणाऱ्या आकाशाने आपल्याला विचार करायला लावले आहे . त्यामुळे हरित दिवाळीचा संकल्प अधिक बळावतोय . दिवे लाव , पण मनही उजळव – हा संदेश आजची तरुण पिढी सोशल मीडियावर ट्रेंड बनवतेय . रांगोळ्यांच्या रंगांबरोबर विचारांचे रंगही उमटत आहेत .

या वर्षी अनेक दुःखद घटना घडल्या असल्या तरी , मदतीचा हात पुढे करणारे लोकच या जगाचा खरा प्रकाश आहेत . भारतीय स्वयंसेवी संस्था , डॉक्टर्स आणि युवकांनी आपत्तीग्रस्त भागात जाऊन मदतीचा दिवा पेटवला . दीप तोच खरा , जो दुसऱ्याच्या अंधारात उजेड करतो – या वाक्यात या वर्षीची दिवाळी जिवंत आहे .

२०२५ च्या या दीपावलीत भारत नव्या आत्मविश्वासाने उजळला आहे . विज्ञानात पुढे , संस्कृतीत ठाम , आणि मानवतेत तेजस्वी – हीच खरी प्रगती . अंधार कितीही गडद असो , एका छोट्याशा दिव्याने तो हरवता येतो .

दीप जळत राहो , मन उजळत राहो , आणि माणुसकीचा प्रकाश कधीच विझू नये – हीच प्रार्थना , हीच खरी दीपावली .

दीपावलीच्या हार्दिक शुभेच्छा !
चंद्रकांत सरस्वती प्रकाश शेळके
तहसीलदार , बीड

धाराशिव
दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## एकलव्याच्या मुलींनी साकारल्या सुबक पणत्या आणि शुभेच्छा संदेश कार्ड

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.१७ ऑक्टोबर**

एकलव्य विद्या संकुल शबरी माता कन्या वस्तीगृहातील मुलींनी दीपावलीनिमित्त हितचिंतकांना शुभेच्छा संदेश देण्यासाठी दरवर्षीप्रमाणे शुभेच्छा संदेश कार्डसह अतिशय सुबक रंगरंगोटी पणत्या तयार केले आहेत. शाळेतील मुलींनी ३५०



शुभेच्छा संदेश कार्ड तयार केले आहेत. तसेच पाचशे पणत्या तयार करून त्यांना सुबक अशी रंगरंगोटी केली आहे. शाळेच्या हितचिंतकांना, मान्यवरांना तसेच विद्यार्थी पालकांना हे शुभेच्छा कार्ड व पणत्या भेट देण्यात येणार आहेत. वसतिगृह अधीक्षिका संगीता पाचंगे, कार्यवाह विवेक अयाचीत, मुख्याध्यापक विठ्ठल म्हेत्रे, अण्णासाहेब कोल्हटकर यांच्या मार्गदर्शनाखाली इयत्ता सातवी ते दहावीतील ६० मुलींनी सहभाग घेतला.



## संक्षिप्त वृत्त...




### जिल्हास्तरीय योगासन स्पर्धेत वाशीच्या विद्यार्थ्यांचा चमकदार यश

**वाशी, दि.१७ ऑक्टोबर -**

तुळजापूर येथे पार पडलेल्या जिल्हास्तरीय योगासन स्पर्धेमध्ये जि. प. केंद्र प्राथमिक शाळा, वाशी येथील विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट कामगिरी करून शाळेचा लौकिक वाढविला आहे. या स्पर्धेत शाळेचा विद्यार्थी राजवीर रणजीत पोद्दार याने दोन सुवर्ण (गोल्ड) पदके मिळवली, तर सानवी धनंजय राऊत हिने दोन रौप्य (सिल्वर) पदके मिळवून आपले कौशल्य सिद्ध केले. विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षकवृंद तसेच शाळा व्यवस्थापन समिती यांनी दोघांचे अभिनंदन केले.



### समीर पानगावकरचे आंतरमहाविद्यालयीन टेबल टेनिस स्पर्धेत यश

**वाशी, दि.१७ ऑक्टोबर -**

बीड येथे नुकत्याच पार पडलेल्या आंतरमहाविद्यालयीन टेबल टेनिस स्पर्धेमध्ये वाशी (धाराशिव) येथील महाविद्यालयाचा विद्यार्थी समीर आनंद पानगावकर यांनी उल्लेखनीय कामगिरी करत उज्वल यश संपादन केले आहे. त्यांच्या उत्कृष्ट खेळामुळे विद्यापीठ संघात त्याची निवड करण्यात आली आहे. या यशाच्या पार्श्वभूमीवर महाविद्यालयात समीरचा सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला होता. या वेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अशोक कदम, वरिष्ठ विभागाचे क्रीडा विभागप्रमुख, प्राध्यापकवृंद व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्राचार्य कदम यांनी समीरचे अभिनंदन करत त्याच्या पुढील स्पर्धांसाठी शुभेच्छा दिल्या. त्यांनी सांगितले की, समीरचे यश इतर विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी असून, महाविद्यालयाचा क्रीडा क्षेत्रातील लौकिक वाढवणारे आहे.




### मामासाहेब जगदाळे महाविद्यालयात डॉ. ए.पी.जे. कलाम यांची जयंती साजरी

**वाशी, दि.१७ ऑक्टोबर -**

कर्मवीर मामासाहेब जगदाळे महाविद्यालय, वाशी येथे भारताचे माजी राष्ट्रपती आणि भारतरत्न डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. या प्रसंगी विद्यार्थ्यांनी विविध उपक्रमांद्वारे डॉ. कलाम यांच्या विचारांचे स्मरण करून त्यांचा आदर्श जीवनमार्ग आत्मसात करण्याचा संकल्प व्यक्त केला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अशोक कदम होते. त्यांनी आपल्या भाषणात डॉ. कलाम यांचे जीवनचरित्र, त्यांचे वैज्ञानिक योगदान आणि तरुणांना दिलेली प्रेरणा यावर प्रकाश टाकला. त्यांनी सांगितले की, डॉ. कलाम यांचे जीवन हे प्रत्येक विद्यार्थ्यासाठी प्रेरणादायी आहे. त्यांनी स्वप्न बघण्याचे आणि ते साकार करण्याचे धैर्य दिले. यावेळी प्राध्यापकवृंद, कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते.

### शेतरस्त्यांसाठी निधीची मागणी

**धाराशिव, दि.१७ ऑक्टोबर -**

जिल्ह्यातील अतिवृष्टीमुळे शेतातील पिके, माती आणि पशुधन मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याची माहिती मिळाली आहे. याबाबत शिवसेना जिल्हाप्रमुख सुरज साळुंके यांनी राज्याचे रोजगार हमी योजना व फलोत्पादन मंत्री भरतशेठ गोगावले यांची प्रत्यक्ष भेट घेऊन शेतरस्त्यांच्या दुरुस्ती साठी निधी उपलब्ध करून देण्याची मागणी केली.

# सप्टेंबरमधील धाराशिव जिल्ह्यातील नुकसानीचे २९२ कोटी मंजूर

**आजवर ४८१ कोटी प्राप्त... मदतीचा तिसरा टप्पा अद्याप बाकी... आमदार राणाजगजितसिंह पाटील यांची माहिती...**

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१७ ऑक्टोबर -**

जिल्ह्यात अतिवृष्टी आणि महापुरामुळे अभुतपूर्व नुकसान झाले आहे. त्या पार्श्वभूमीवर आपल्या महायुती सरकारने जुलै-ऑगस्ट महिन्यात झालेल्या नुकसानीपोटी १८९ कोटी यापूर्वीच उपलब्ध करून दिले आहेत. त्याचे वितरणही युद्धपातळीवर सुरू आहे. गुरुवारी दुसऱ्या टप्प्यातील २९२ कोटी रुपयांच्या मंजुरीचा शासन आदेशही निघाला आहे. ही रक्कमही बाधित शेतकरी बांधवांच्या खात्यात तातडीने वितरित करण्याच्या सूचना प्रशासनाला दिल्या आहेत. खरवडून गेलेल्या जमिनीसाठी ४० कोटी रुपयांचा शासन आदेश आज निर्गमित होणे अपेक्षित आहे. याव्यतिरिक्त दोन हेक्टरपेक्षा अधिक तीन हेक्टर पर्यंत ज्यांचे नुकसान झालेले आहे त्यांना दिवाळीनंतर तिसऱ्या टप्प्यातील अनुदान मिळणार असल्याची माहिती आ. राणाजगजितसिंह पाटील यांनी दिली आहे.



जुलै आणि ऑगस्ट महिन्यात झालेल्या नुकसानीपोटी आपल्या महायुती सरकारने १८९ कोटी रुपये उपलब्ध करून दिले आहेत. त्याचे वितरणही सुरू आहे. अद्यापही काही ठिकाणी ही रक्कम प्राप्त झाली नसल्याच्या तक्रारी आपल्यापर्यंत येत आहेत. मात्र जिल्ह्यातील शेतकरी बांधवांनी अस्वस्थ होऊ नये आणखी वितरण प्रक्रिया सुरू आहे. त्यामुळे लवकरच रक्कम आपल्या थेट खात्यात जमा होणार आहे. या पहिल्या मदतीच्या टप्प्यापाठोपाठ सप्टेंबर महिन्यात झालेल्या नुकसानीपोटी दुसरा टप्प्यातील मदतीचे वितरणही आता लवकरच सुरू होईल.

त्यासाठी गुरुवारी २९२ कोटी ४९ लाख २१ हजार ४६० रुपयांच्या मदतीचा शासन निर्णय निघाला आहे. जिल्ह्यात सप्टेंबर महिन्यात झालेल्या अतिवृष्टी आणि महापुरामुळे तीन लाख ११ हजार २९१ हेक्टर २३ आर एवढे क्षेत्र बाधित झाले आहे. त्यामुळे चार लाख चार हजार ६५६ शेतकरी बांधवांना त्याचा फटका बसला आहे. त्यांना या नैसर्गिक संकटाच्या जोखडात बाहेर काढण्यासाठी २९२ कोटी ४९ लाख २१ हजार ४६० रुपयांच्या मदतीचा प्रस्ताव जिल्हा प्रशासनाच्या माध्यमातून १३ ऑक्टोबर रोजी विभागीय आयुक्तांना सादर करण्यात आला होता. तातडीने या सगळ्या बाबींचा पाठपुरावा करून काल १६ ऑक्टोबर रोजी म्हणजे तीन दिवसात आपण शासन आदेश काढून २९२ कोटी रुपयांच्या मदतीचा दुसरा टप्पा मंजूर करवून घेतला असल्याचे आ. राणाजगजितसिंह पाटील यांनी सांगितले आहे.



विभागीय आयुक्तांना सादर करण्यात आलेल्या प्रस्तावात जिल्ह्यात महापुरामुळे शेतजमीन खरवडून जाणे, जमीन खचणे, नदीपात्रातील जमीन वाहून जाणे आणि गाळ साचणे हे सगळे नुकसान भरून काढण्यासाठी ४० कोटी ४८ लाख दोन हजार ३५० रुपयांचा निधी अपेक्षित असल्याचे जिल्हा प्रशासनाने नमूद केले आहे. जिल्ह्यातील ३३ हजार २६३ शेतकरी बांधवांचे आठ हजार ७७४ हेक्टर ४५ आर एवढ्या क्षेत्राला फटका बसला आहे. त्यासाठी आपल्या महायुती सरकारने जाहीर केल्याप्रमाणे (खरडून गेलेल्या जमिनीसाठी रु.४७ हजार हेक्टर प्रमाणे व जमिनीत वाळूचा, गाळाचा ३ इंच थर जमा झाला असेल त्यासाठी रु.१८००० प्रति हेक्टर) ४० कोटी ४८ लाख दोन हजार ३५० रुपयांच्या अनुदान मंजुरीचा शासन निर्णय आज अपेक्षित आहे.

त्याव्यतिरिक्त रोजगार हमी योजनेच्या माध्यमातून या सगळ्या जमिनी पूर्ववत करण्यासाठी प्रति हेक्टर तीन लाख रुपये याप्रमाणे साधारणतः २७० कोटी रुपये आपल्या जिल्ह्यासाठी उपलब्ध होणार आहेत.

## लोटस पोदार लर्न स्कूल, उमरग्याचे तीन विद्यार्थी राज्यस्तरीय रायफल शूटिंग स्पर्धेसाठी निवड

**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.१७ ऑक्टोबर -**

महाराष्ट्र राज्य क्रीडा व युवा सेवा संचालनालयांतर्गत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, लातूर यांच्या वतीने आयोजित विभागीय रायफल शूटिंग स्पर्धा नुकत्याच उत्साहात पार पडल्या. या स्पर्धेत उमरग्यातील लोटस पोदार लर्न स्कूलच्या विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय कामगिरी करत शाळेचा गौरव वाढविला आहे.



स्पर्धेत परीक्षित निकम १४ वर्षे मुलांच्या गटात सुवर्णपदक, आनंदी पांचाळ १४ वर्षे मुलींच्या गटात सुवर्णपदक, शर्वरी माने १७ वर्षे मुलींच्या गटात सुवर्णपदक. या तिन्ही विद्यार्थ्यांची कामगिरी अत्युत्तम ठरली आणि त्यांना राज्यस्तरीय रायफल शूटिंग स्पर्धेसाठी नागपूरमध्ये निवड करण्यात आली आहे.

शाळेच्या वतीने अध्यक्ष व्यंकट अरगडे, उपाध्यक्ष युवराज गायकवाड, सचिव विशाल कोकरे, सर्व संचालक, प्राचार्य बी.पी. सिंह, उपप्राचार्य अतुल फावडे, तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी तिन्ही विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून पुढील स्पर्धेसाठी हार्दिक शुभेच्छा दिल्या.

## विद्युत तारेच्या धक्क्याने दुभती म्हैस ठार

**शेतकऱ्याचे मोठे नुकसान**

**तभा वृत्तसेवा**
**इटकळ, दि.१७ ऑक्टोबर -**

इटकळ येथे गुरुवार, दि.१६ ऑक्टोबर रोजी दुपारी सुमारास झालेल्या दुर्दैवी घटनेत विद्युत तारेच्या धक्क्याने दुभती म्हैस जागीच ठार झाली. ही घटना धायफुले मिलच्या पाठीमागील विद्युत पोलजवळ घडली.

मिळालेल्या माहितीनुसार, इटकळ येथील शेतकरी गौस मुजावर यांनी शेतीला पूरक व्यवसाय म्हणून दुभती म्हैस पाळली होती. दररोज सुमारे पाच लिटर दूध देणाऱ्या या म्हशीच्या उत्पन्नातून त्यांच्या घरखर्चाला थोडाफार आधार मिळत होता. मात्र, गुरुवारी नेहमीप्रमाणे म्हैस चारण्यासाठी सोडल्यावर ती चरत असताना विद्युत पोलजवळून जात असताना तुटलेल्या तारेला स्पर्श झाल्याने तीला जोराचा विजेचा धक्का बसला आणि ती जागीच ठार झाली. घटनेची माहिती मिळताच महावितरणचे लाईनमन कोळी यांनी घटनास्थळी येऊन पाहणी केली व पंचनामा केला. तसेच पशुवैद्यकीय अधिकारी यांनी घटनास्थळी येऊन म्हशीचे पोस्टमार्टेम केले. यावेळी शेतकरी गौस मुजावर, पोलीस पाटील विनोद सलगरे, तलाठी गोरोबा तोडकरी, लियाकत खुदादे, तसेच गावातील शेतकरी उपस्थित होते.



आधीच अतिवृष्टीमुळे खरीप हंगामातील नुकसान झालेल्या शेतकऱ्याला आता या अपघातामुळे आणखी आर्थिक फटका बसला आहे.

गावकऱ्यांनी महावितरण कंपनीच्या गलथान कारभाराविरोधात नाराजी व्यक्त करत, शेतकरी गौस मुजावर यांना झालेल्या नुकसानीची योग्य ती भरपाई देण्याची मागणी केली आहे.

## पुण्याच्या डेव्हलपमेंट सपोर्ट टीमतर्फे १५० कुटुंबाला किटचे वाटप




**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१७ ऑक्टोबर -**

तालुक्यातील बोरणा व हरणा नदी काठावरील गावाला मागील ५ महीने झालेल्या अतिवृष्टीमुळे पिकाचे, शेतीचे, जनावराचे व काही गावांमध्ये घराचे नुकसान झालेल्या शेतकरी कुटुंबांसह एकल गरीब महीला, निराधार व भुमिहिन कुटुंबातील महिलाना लोकप्रबोधन विविध कलागुणदर्शन कला मंच आरळी बुद्रुक यांच्या माध्यमातून पुणे येथिल डेव्हलपमेंट सपोर्ट टीम यांच्या सौजन्याने १५० कुटुंबाला किराणा किटचे वाटप करण्यात आले.

यामध्ये आरळी बुद्रुक, आरळी खुर्द बसवंतवाडी, चिंचोली, चिवरी, देवसिंगा, कारला, मेसाई जवळगा येथिल अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या १५० कुटुंबाला संसारोपयोगी शिधा वाटप करण्यात आला. याप्रसंगी पुण्याच्या डेव्हलपमेंट सपोर्ट टीमचे शिरिष कुलकर्णी आणि लक्ष्मीकांत झांवर, आरळी बुद्रुक सरपंच किरण व्हरकट, लोकप्रबोधन संस्थेचे धनाजी धोतरकर, प्रशांत जगताप, दादाराव पारवे, सगांपा उकरडे, सुरेश चव्हाण, सुधाकर कदम, सिद्राम तावनडे, लक्ष्मण कचरे, ग्रा.प. सदस्या मधुमालती पारवे, आनुराधा धोतरकर, मिरा पारवे, अनिता जवळे, लतिका शिंदे आदी नागरिक उपस्थित होते.

## प्रधानमंत्री जीवन ज्योती विमा योजनेअंतर्गत ग्राहकाच्या कुटुंबाला २ लाख रुपयांचा धनादेश प्रदान

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.१७ ऑक्टोबर -**

नळदुर्ग येथील स्टेट बँक ऑफ इंडियाच्या ग्राहक दिगंबर अर्जुन बाबर यांचे हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाल्यानंतर त्यांच्या पत्नी आशा दिगंबर बाबर (रा. गुळहळळी, ता. तुळजापूर) यांना प्रधानमंत्री जीवन ज्योती विमा योजनेअंतर्गत २ लाख रुपयांचा धनादेश बँकेचे व्यवस्थापक कल्पेश घोडके यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.



दिगंबर अर्जुन बाबर यांनी बँकेमार्फत राबविण्यात येणाऱ्या प्रधानमंत्री जीवन ज्योती विमा योजनेअंतर्गत विमा घेतला होता. दि. १३ फेब्रुवारी २०२३ रोजी त्यांचा अपघात झाला होता, त्यानंतर हृदयविकाराच्या झटक्याने त्यांचे निधन झाले. त्यांच्या आकस्मिक निधनानंतर विमा योजनेचा लाभ त्यांच्या कुटुंबाला मिळाला आहे. दि.१७ ऑक्टोबर रोजी झालेल्या कार्यक्रमात बँकेचे सेवा प्रबंधक प्रविण साठवणे, सहाय्यक उत्कर्ष धोटे यांच्या उपस्थितीत आशा दिगंबर बाबर यांना धनादेश सुपूर्द करण्यात आला.

यावेळी बोलताना व्यवस्थापक कल्पेश घोडके म्हणाले की, प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजना व प्रधानमंत्री जीवन ज्योती विमा योजना या दोन्ही योजना ग्राहकांसाठी अत्यंत उपयुक्त आहेत. सर्व नागरिकांनी या योजनांचा लाभ घ्यावा. तसेच त्यांनी सांगितले की, स्टेट बँक ऑफ इंडिया आपल्या ग्राहकांसाठी विशेष योजना राबवत असून वार्षिक फक्त २ हजार रुपयांमध्ये ४० लाख रुपयांपर्यंत अपघात मृत्यू विमा कव्हर उपलब्ध आहे. याचा जास्तीत जास्त ग्राहकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले.

**सोलापूर तरुण भारत विशेष...**

# तेरखेडा नगरीत दिवाळीच्या सणासाठी फटाक्यांचा व्यवसाय जोमात




**तभा वृत्तसेवा / सुधीर घोलप**
**वाशी, दि.१७ ऑक्टोबर -**

दवाळीच्या सणाच्या पार्श्वभूमीवर, महाराष्ट्रातील धाराशिव जिल्ह्यातील तेरखेडा नगरीत फटाक्यांच्या व्यापाराला जोरदार चालना मिळत आहे. विशेषतः दिवाळीच्या सणासाठी फटाक्यांच्या खरेदी-विक्रीची गडबड मोठ्या प्रमाणावर वाढली असून, राज्यभरातील आणि परराज्यांतील ग्राहक तेरखेडा येथे फटाके खरेदी करण्यासाठी मोठ्या संख्येने येत आहेत.






**राज्यासह परराज्यातील व्यापारी दाखल...**

दिवाळीच्या सणाच्या आगमनाबरोबरच तेरखेडा नगरीत फटाक्यांच्या बाजारात व्यापारी आणि ग्राहकांची प्रचंड गर्दी सुरू झाली आहे. घराघरात लक्ष्मीपूजन आणि आकाशातील फटाक्यांच्या सणाची तयारी जोरात सुरू असताना, ग्राहक विविध प्रकारचे फटाके खरेदी करण्यासाठी तेरखेडा येथील बाजारात येत आहेत. खासकरून फुलबाजे आणि तोफ यांना मोठी मागणी आहे.

दिवाळीच्या सणाचे महत्त्व प्रत्येक भारतीय कुटुंबासाठी अनमोल आहे. या सणाच्या पार्श्वभूमीवर तेरखेडा येथील व्यापाऱ्यांनी पारंपरिक आणि आधुनिक फटाके उत्पादन व विक्रीसाठी सज्ज केले आहेत. शिवकाशी तेरखेडा येथील उत्पादन क्षमता व गुणवत्ता यामुळे इतर राज्यांतील, विशेषतः गुजरात, उत्तर प्रदेश, राजस्थान येथील ग्राहक मोठ्या संख्येने येत आहेत. फटाके फोडताना सुरक्षा व पर्यावरणाचे संरक्षण अत्यंत महत्त्वाचे आहे. सरकार व विविध सामाजिक संस्था यांद्वारे फटाक्यांवरील नियंत्रण आणि पर्यावरणासहित सुरक्षा जागरूकता अभियान राबवले जात आहेत.

आग, ध्वनी प्रदूषण आणि पर्यावरणासंबंधी योग्य मार्गदर्शन देण्यात येत असून, पर्यावरणपूरक आणि कमी आवाज करणारे फटाके वापरण्याचे आवाहन केले जात आहे. तेरखेडा नगरी फक्त आर्थिक केंद्र नाही तर सांस्कृतिक केंद्र देखील आहे. येथील फटाके इतर राज्यांतील ग्राहकांसाठी विशेष आकर्षण ठरतात. उत्पादनापासून विक्रीपर्यंत सर्व प्रक्रिया व्यवस्थित पार पडत असल्याने व्यापारी, ग्राहक आणि स्थानिक प्रशासन यांच्यात आदान-प्रदान आणि सहयोग दिसून येतो. दिवाळीच्या सणाच्या आरंभाशी, तेरखेडा नगरीतील फटाक्यांच्या बाजारपेठेतील लहान-मोठ्या व्यावसायिकांना नवीन जोम मिळतो आणि हे आर्थिक संधीचे एक मोठे केंद्र ठरते.

फटाक्यांचा व्यवसाय तेरखेडा येथे सणाच्या आनंदाचा एक महत्त्वाचा भाग आहे.

### शिवकाशी तेरखेडा : फटाक्यांचा केंद्रबिंदू

मराठवाड्यातील धाराशिव जिल्ह्यातील तेरखेडा नगरी फटाक्यांच्या व्यवसायासाठी सुप्रसिद्ध आहे. शिवकाशी तेरखेडा म्हणून ओळखली जाणारी ही नगरी, महाराष्ट्राबरोबरच इतर राज्यांमध्ये आणि परदेशातही आपल्या फटाक्यांसाठी प्रसिद्ध आहे. येथे सुतळी बॉम्ब, तोफ, फुलबाजे, बुरणळे यांसारख्या विविध फटाक्यांची उत्पादन क्षमता मोठ्या प्रमाणावर आहे आणि या फटाक्यांची मागणी राज्यासह परराज्यात आहे.